सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित


लातूर | शुक्रवार, २६ डिसेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक २९६ | पाने १२ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



### अटलजींचा दृढनिश्चय सर्वांसाठी आदर्श : पंतप्रधान

**लखनौ** : माजी पंतप्रधान दिवंगत अटल बिहारी वाजपेयींची जयंती हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून प्रेरणा घेण्याचा एक विशेष प्रसंग आहे. त्यांचे आचरण, विचार आणि अढळ दृढनिश्चय हे सर्वांसाठी आदर्श आहे, असे वक्तव्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे.

### विचारपुष्प



आपल्या मनात जर पुढे जायचा संकल्प असेल तसेच त्यासाठी परिश्रम करण्याची तयारी असेल तर मदत निश्चित मिळेल. आपण निवडलेला मार्ग बरोबर आहे की नाही हे वारंवार पडताळून पाहणे हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे.

**- हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह



# मुंबईमध्ये महायुतीची सत्ता आणून अटलजींचे कार्य पुढे न्यायचे आहे

## मुख्यमंत्री फडणवीस : १६ जानेवारीला अटलजींना हिच खरी आदरांजली द्यायची

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २५ डिसेंबर:**

भारतमातेचे महान सुपुत्र अटलबिहारी वाजपेयी यांनी जवळपास ५ दशकांपर्यंत या देशाला दिशा देण्याचा यशस्वी प्रयत्न केला, त्यांनी ज्या प्रकारे भाजपा मुंबईमध्ये सुरुवात करून दिली होती त्याचप्रमाणे, पुन्हा एका मुंबईच्या महानगरपालिकेमध्ये महायुतीची सत्ता आणून त्यांचे कार्य पुढे न्यायचे आहे. आज त्यांना आदरांजली देतोच आहोत पण १६ जानेवारीला आपण त्यांना खरी आदरांजली द्यायची आहे., असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी केले.

माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त मुंबई भाजपातर्फे चित्र-चरित्र प्रदर्शनीचे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.अटलबिहारी यांच्या कार्याचा आढावा घेऊन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले,आपली लढाई ही मुंबईकरांची लढाई आहे. पारदर्शी आणि प्रामाणिकतेतून मुंबईची महानगरपालिका चालली पाहिजे, हा संकल्प घेऊन आम्ही या निवडणूकीत उतरलो आहोत. देशामध्ये पंतप्रधान म्हणून अटलजींनी केलेलं कार्य हे अविस्मरणीय आहे. ते नेहमी म्हणायाचे रस्ते हे देशाला एकात्मतेकडे नेतात आणि त्यांच्याच संकल्पनेतून देशाला वर्ल्डक्लास हायवे पाहायला मिळाले. त्यांनी पहिल्यांदा प्रधानमंत्री ग्रामसडक योजना देशात सुरु केली. ज्यामुळे शहरे गावांशी जोडली गेली. भारत देश अणुसंपन्न करण्याचं काम त्यांनी केलं. मोठ्या राष्ट्रांकडून दबाव येत असताना अटलजी त्यांच्या निर्णायावर ठाम राहिले आणि आज भारत एक बलवान देश म्हणून उभा आहे. अणुस्फोटानंतर जगाने बहिष्कृत केलेल्या आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला ठामपणे उभं करणारे अटलजी होते. याप्रसंगी राष्ट्रीय सहसंगठन महामंत्री शिवप्रकाशजी, कॅबिनेट मंत्री मंगलप्रभात लोढा, आ. कालिदास कोळंबकर, आ. विद्या ठाकूर, राजहंस सिंह, सरचिटणीस आचार्य पवन त्रिपाठी, श्वेता परुळकर आदी उपस्थित होते.

## बांगलादेशात पुन्हा हिंदू तरुणाची केली हत्या

**ढाका** : बांगलादेशात अल्पसंख्याक हिंदूवरील हल्ल्यांचे सत्र सुरूच असून, दीपू चंद्र दास यांच्या निर्घृण हत्येनंतर आता आणखी एका हिंदू तरुणाची जमावाने बेदम मारहाण करून हत्या केल्याची घटना समोर आली आहे. राजधानी ढाकापासून साडेतीन तासांच्या अंतरावर असलेल्या राजबारी जिल्ह्यातील पांगशा उपजिल्हा परिसरात ही घटना घडली. अमृत मोंडल ऊर्फ सम्राट (२९) असे मृत तरुणाचे नाव आहे.






CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# आज प्रत्येक महान व्यक्तीचा होतोय् सन्मान : पंतप्रधान मोदी

## लखनौमध्ये राष्ट्र प्रेरणा स्थळाचे उद्घाटन

## अटल बिहारी वाजपेयींच्या जयंतीचे औचित्य



राष्ट्र प्रेरणा स्थळाचे पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी उपस्थित उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल, संरक्षण मंत्री राजनाथसिंह, युपी भाजपाध्यक्ष पंकज चौधरी, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ व मान्यवर

**◆ लखनौ, २५ डिसेंबर**

उत्तरप्रदेशात अशी स्थिती होती की, आधी एका कुटुंबाचे पुतळे लावले जात होते. आज प्रत्येक महान व्यक्तीला सन्मान मिळत आहे. आधी एकाच कुटुंबाचे गौरव-गान होत असे. भाजपाने प्रत्येकाच्या योगदानाचा सन्मान केला, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.

पंतप्रधान मोदी यांनी गुरुवारी लखनौमध्ये राष्ट्र प्रेरणा स्थळाचे उद्घाटन केले. याप्रसंगी ते बोलत होते. पंतप्रधान म्हणाले, आज नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा पुतळा दिल्लीच्या कर्तव्य पथावर आहे. अंदमानमध्ये नेताजींनी जिथे तिरंगा फडकवला, तिथे त्यांचा पुतळा आहे. डॉ. आंबेडकरांचा वारसा मिटवण्याचा प्रयत्न केला गेला, हे कोणीही विसरू शकत नाही. दिल्लीच्या शाही कुटुंबाने तो मिटवण्याचा प्रयत्न केला. येथे सपानेही असेच केले, पण भाजपाने ते मिटू दिले नाही.

हे स्थळ लखनौच्या भूमीच्या नवीन प्रेरणेची साक्ष देते. आज, अटलजींच्या जयंतीनिमित्त, सुशासन साजरे करण्याचा दिवस देखील आहे. बऱ्याच काळापासून 'गरिबी हटाव' सारख्या घोषणा सुशासन मानल्या जात होत्या, परंतु अटलजींनी खऱ्या अर्थाने सुशासन अंमलात आणले. आज ज्या डिजिटल ओळखीची खूप चर्चा आहे, ती अटलजींच्या सरकारनेच घातली होती.

प्रेरणा स्थळावर ६५-६५ फूट उंच दीनदयाल उपाध्याय, श्यामा प्रसाद मुखर्जी आणि अटल बिहारी वाजपेयी यांचे पुतळे उभारण्यात आले आहेत. प्रत्येक पुतळा ४२ टन वजनाचा आहे. प्रेरणा स्थळ ६५ एकर क्षेत्रात २३० कोटी रुपये खर्चून विकसित करण्यात आले आहे. २०२२ साली याचे बांधकाम सुरू झाले होते.

**राष्ट प्रेरणा स्थळ स्वाभिमान, एकता, सेवाभावनेचे प्रतीक**

पंतप्रधान मोदी म्हणाले की, राष्ट्रीय राष्ट प्रेरणा स्थळ हे भारताला स्वाभिमान, एकता आणि सेवेचा मार्ग दाखवणाऱ्या भावनेचे प्रतीक आहे. २५ डिसेंबर रोजी महाराजा बिजली पासी यांची जयंती देखील आहे.

महाराजा बिजली पासी यांनी सोडलेला शौर्य, सुशासन आणि समावेशाचा वारसा आपल्या पासी समुदायाने अभिमानाने पुढे नेला आहे. २००० मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांनी महाराजा बिजली पासी यांच्या सन्मानार्थ टपाल तिकिट जारी केले हा देखील एक योगायोग आहे. या महत्त्वपूर्ण दिवशी, मी महामना मालवीय, अटलबिहारी वाजपेयी आणि महाराजा बिजली पासी यांना आदरपूर्वक श्रद्धांजली आणि आदर अर्पण करतो. ◂(वृत्तसंस्था)

# खलिदांचे पुत्र तारिक मायदेशी परतले

## ढाका विमानतळावर जंगी स्वागत, बीएनपी पक्षाचे शक्तिप्रदर्शन

**◆ ढाका, २५ डिसेंबर**

बांगलादेशमध्ये गेल्या काही दिवसांपासून कट्टरवाद्यांचा सुरू असलेल्या उन्माद आणि राजकीय गदारोळाच्या पृष्ठभूमीवर गुरुवारी बांगलादेशचे माजी राष्ट्रपती झियाउर रहमान आणि माजी पंतप्रधान खालिदा झिया यांचे पुत्र तारिक रहमान लंडनमध्ये निर्वासित म्हणून राहिल्यानंतर तब्बल १७ वर्षांनी मायदेशी परतले.

ढाका विमानतळावर आगमन होताच त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी बांगलादेश नॅशनल पार्टी अर्थात् बीएनपीच्या हजारो समर्थकांनी रस्त्यावर उतरत जोरदार शक्तिप्रदर्शन केले. तारिक रहमान बांगलादेशात पोहोचताच बीएनपी समर्थक आणि पक्षाच्या कार्यकर्त्यांनी बनानी मार्गापासून ढाका विमानतळापर्यंत पायी रॅली काढली. त्यात पाच लाख कार्यकर्ते सहभागी झाले होते. अनेक वर्षे निर्वासित म्हणून आयुष्य जगल्यानंतर आता निवडणूक लढवण्यासाठी तारिक रहमान बांगलादेशमध्ये परतले आहेत. या घटनेकडे मोठी राजकीय घटना म्हणून पाहिले जात आहे. देशाचे भावी पंतप्रधान म्हणून देखील त्यांच्याकडे पाहिले जात आहे. रॅलीत कार्यकर्त्यांनी भावी पंतप्रधान असे



फलक हातात घेतले होते. विमानतळापासून काही अंतरावर रॅलीला संबोधित करताना तारिक म्हणाले, हा माझ्यासाठी अतिशय भावूक क्षण आहे. लंडन येथून परतताना मी विचारदेखील केला नव्हता की, लाखोंच्या संख्येने लोक माझ्या स्वागतासाठी एकत्र येईल. देशाला नव्या दिशेने नेण्यासाठी आपल्याला काम करायचे आहे. दरम्यान तारिक यांच्या आगमनाने सार्वत्रिक निवडणुकीत बीएनपी पक्षाला लक्षणीय यश मिळण्याची अपेक्षा आहे.

**भ्रष्टाचाराच्या आरोपानंतर सोडला होता देश**

२००८ ते २०२५ च्या अखेरपर्यंत रहमान हे स्वत:हून निर्वासित म्हणून लंडन येथे राहिले. भ्रष्टाचाराच्या आरोपानंतर त्यांच्यावर दाखल झालेल्या खटल्यानंतर त्यांनी सप्टेंबर २००८ मध्ये बांगलादेश सोडला होता. तारिक यांनी लंडनमध्ये व्हाईट अँड ब्लू कन्सल्टंट्स नावाने एक खाजगी पीआर कंपनीची सुरू केली होती. ◂(वृत्तसंस्था)

### सुरक्षित बांगलादेश निर्माण करणार : रहमान

तारिक रहमान यांनी संबोधित करताना म्हटले की, बांगलादेश मुस्लिम, हिंदू, बौद्ध आणि ख्रिश्चनांचा आहे. बीएनपी पक्षाचे शांतता आणि सुरक्षिततेला प्राधान्य आहे. महिला, पुरुष आणि मुलांचा बांगलादेशच्या विकासात सहभाग करून घेण्यासाठी माझ्याकडे एक योजना आहे. जनतेची साथ मिळाल्यास मी ती प्रत्यक्षात आणेल. देशात लोकशाही स्थापन करण्यासाठी सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे. आज, बीएनपीसोबत, समविचारी राजकीय पक्षांचे नेते व्यासपीठावर उपस्थित आहेत. सर्वांना देशवासीयांसोबत एकत्र काम करून शांततापूर्ण बांगलादेश निर्माण करायचा आहे.

## महत्त्वाचे

### तीन तासांत धनादेश वटण्याचा नियम पुढे ढकलला



**नवी दिल्ली :** रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने चेक क्लिअरन्सला गती देणारी फेज २ योजना पुढे ढकलली आहे. ही योजना ३ जानेवारी २०२६ पासून सुरू होणार होती. या टप्प्यात बँकांना चेकची इमेज मिळाल्यानंतर तीन तासांच्या आत त्याला मंजुरी द्यायची होती किंवा नाकारायचे होते. आता ती पुढील तारखेपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. रिझर्व्ह बँकेने २४ डिसेंबर रोजी परिपत्रक जारी करून सांगितले की, फेज २ पुढे ढकलण्यात आला आहे. फेज १ सुरूच राहील. चेक प्रेझेंटेशन विंडो (चेक जमा करण्याची वेळ) सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत खुली राहील. तर, बँका सकाळी ९ ते संध्याकाळी ७ वाजेदरम्यान चेकची पुष्टी किंवा नाकारू शकतील.

### चांदी जगातील तिसरी मौल्यवान मालमत्ता

**नवी दिल्ली :** सोने आणि एनव्हीडियानंतर चांदी आता जगातील तिसरी सर्वात मौल्यवान मालमत्ता बनली असून, चांदीने आयफोन निर्मिती करणारी कंपनी ॲपलला मागे टाकले आहे. या वर्षात चांदीच्या किमतींमध्ये सातत्याने वाढ होत आहे. फ्युचर्सने प्रति औंस ७१ डॉलरचा टप्पा ओलांडल्यामुळे, चांदीने वर्षभरात गुंतवणूकदारांना जवळपास १५० टक्के परतावा दिला आहे. मंगळवारी वॉल स्ट्रीटवरील बाजार बंद झाल्यानंतर, चांदीचे बाजार भांडवल ४.०४ ट्रिलियन डॉलर होते, जे ॲपलच्या ४.०२ ट्रिलियन डॉलरच्या मूल्यांकनापेक्षा थोडेसे जास्त आहे. चांदीचा वापर इलेक्ट्रॉनिक्स, सौर पॅनेल आणि वैद्यकीय उपकरणांसाठी मोठ्या प्रमाणावर केला जातो. त्यामुळे औद्योगिक मागणी आणि ईटीएफमधील मजबूत गुंतवणुकीमुळे चांदीच्या किमती उच्च पातळीवर टिकून आहेत.

### रिलायन्स पुन्हा सुरू करणार रशियन तेलाची आयात

जामनगर : मुकेश अंबानींच्या रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडने पुन्हा एकदा रशियाकडून कच्च्या तेलाची आयात सुरू केली आहे. ब्लूमबर्गच्या अहवालानुसार, कंपनीने गुजरातच्या जामनगर येथील आपल्या जगातील सर्वात मोठ्या रिफायनरीसाठी रशियन तेलाची खरेदी पुन्हा सुरू केली आहे. विशेष बाब म्हणजे, रिलायन्सला यासाठी अमेरिकेकडून एका महिन्याची विशेष सूट मिळाली आहे. ही बातमी अशा वेळी आली आहे, जेव्हा अलीकडेच पाश्चात्य देशांच्या निर्बंधांच्या भीतीमुळे रिलायन्सने रशियन तेलाची आयात मर्यादित केली होती.

### दिल्लीत पाच रुपयांत मिळेल जेवण

नवी दिल्ली : दिल्ली सरकारने माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त 'अटल कॅन्टीन' योजनेची सुरुवात केली. या योजनेअंतर्गत शहरात १०० ठिकाणी ५ रुपयांत एक प्लेट जेवण मिळेल. प्रत्येक कॅन्टीनमध्ये सुमारे ५०० लोकांना जेवण उपलब्ध करून दिले जाईल. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता म्हणाल्या, अटल कॅन्टीन दिल्लीचा आत्मा बनेल, हे असे ठिकाण असेल जिथे कोणालाही उपाशी झोपावे लागणार नाही.

### दहाव्या मजल्यावरून पडला आठव्या मजल्यावर अडकला

**सुरत :** गुजरातच्या सुरतमध्ये गुरुवारी ५७ वर्षांचा एक व्यक्ती घराच्या खिडकीतून खाली पडला. तो इमारतीच्या १०व्या मजल्यावरून घसरून ८व्या मजल्याच्या खिडकीत अडकला. सुमारे एक तास लटकल्यानंतर अग्निशमन दलाच्या पथकाने बचावकार्य करून त्याचे प्राण वाचवले. नितीनभाई आडिया सुरतमधील जहांगीराबाद परिसरातील गॅलेक्सी अपार्टमेंटच्या १०व्या मजल्यावर राहतात. सकाळी सुमारे आठ वाजता ते त्यांच्या घराच्या खिडकीजवळ झोपले होते.

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विद्यापीठ तंत्रज्ञान संस्थेचे उद्घाटन उद्या

**◆ गडचिरोली, २५ डिसेंबर**

गोंडवाना विद्यापीठाचे मेसर्स लॉयड्स मेटल्स ॲण्ड एनर्जी लिमिटेड समवेत सार्वजनिक खाजगी-भागीदारी तत्त्वावर आयोजित 'विद्यापीठ तंत्रज्ञान संस्था' गडचिरोलीचे उद्घाटन २७ डिसेंबर रोजी दुपारी ३.३० वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अडपल्ली येथे होणार आहे.

समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून वित्त, नियोजन राज्यमंत्री तथा गडचिरोलीचे सहपालकमंत्री आशिष जयस्वाल, विशेष अतिथी म्हणून गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, लॉयड्स मेटल्स ॲण्ड एनर्जी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन्, खासदार डॉ. नामदेव किरसान, प्रतिभा धानोरकर, आमदार अभिजित वंजारी, सुधाकर अडबाले, सुधीर मुनगंटीवार, विजय वडेट्टीवार, धर्मरावबाबा आत्राम, किर्तीकुमार भांगडीया, किशोर जोरगेवार, रामदास मसराम, देवराव भोंगळे, करण देवतळे, डॉ. मिलिंद नरोटे, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, पोलिस अधीक्षक नीलोत्पल, लॉयड्स



मेटल्स ॲण्ड एनर्जी लिमिटेडचे लेफ्टनंट कर्नल विक्रम मेहता, कार्यकारी संचालक व्यंकटेश सौंदर्यराजन, लॉईस मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडचे निवासी संचालक हिंम्मत सिंग बेदला, प्र-कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे उपस्थित राहणार आहेत. विशेष म्हणजे विद्यापीठ तंत्रज्ञान संस्थेत प्रवेशित विद्यार्थ्यांना विदेशी विद्यापीठात शिकण्याची संधी प्राप्त होणार आहे. ही तंत्रज्ञान संस्था गडचिरोली या मागास जिल्ह्यातील होतकरू व गुणवंत युवकांच्या तंत्र कौशल्य शिक्षणासाठी महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

### अवामी लीगला निवडणूक लढण्याची परवानगी नाही

**◆ ढाका, २५ डिसेंबर**

बांगलादेशच्या अंतरिम सरकारने शेख हसीना यांचा पक्ष अवामी लीगला फेब्रुवारीमध्ये होणाऱ्या निवडणुका लढवण्याची परवानगी दिली जाणार नसल्याचे गुरुवारी अधिकृतरित्या स्पष्ट केले आहे. बांगलादेश अंतरिम सरकारच्या मुख्य सल्लागारांचे सचिव शफीकुल आलम यांनी ढाका येथे प्रसार माध्यमांना संबोधित करताना, सांगितले की, अवामी लीगबाबत सरकारची भूमिका पूर्वी होती तीच राहणार आहे. पक्षावरील बंदी कायम राहणार असून, त्यांना निवडणूक लढवण्याची परवानगी नाही. १७ नोव्हेंबर रोजी आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणाने शेख हसीना आणि माजी गृहमंत्री असदुज्जमान खान कमाल यांना मृत्युदंडाची आणि दोन दिवसांपूर्वी त्यांना एका प्रकरणात १७ वर्षांची शिक्षा सुनावली आहे. देशातील परिस्थितीसाठी अवामी लीग पक्ष जबाबदार आहे. ◂(वृत्तसंस्था)

# दोन मुलींना फासावर लटकवत विवाहितेने घेतला गळफास

## वंशाला दिवा दिला नसल्याच्या कारणाने होत होता छळ

**◆ लोणार, २५ डिसेंबर**

तालुक्यातील वढव येथील २५ वर्षीय विवाहितेने आपल्या दोन मुलींना गळफास देऊन लटकविले व स्वतः गळफास घेत आत्महत्या केली. मात्र, दैव बलवत्तर म्हणून मुली फासातून खाली पडल्याने बचावल्या. विवाहितेचा मृत्यू झाला. या संदर्भात पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

प्राप्त माहितीनुसार, वढव येथील कांचन अमोल सोनवणे हिचे पतीसोबत वाद झाल्याच्या कारणाने रागाच्या भरात कांचनने आपली आकांक्षा (३) आणि प्रांजल (६) महिने यांना बुधवारी दुपारी घरातील अँगलला गळफासावर लावले व स्वतः गळफास घेतला.

मात्र, दोन्ही मुलींचा घरातून रडण्याचा आवाज ऐकताच गावकऱ्यांनी घराचा दरवाजा तोडला असता, त्यांना कांचनने गळफास घेतल्याचे दिसून आले, तर दोन मुली जवळपास आढळून आल्या. यात मुलींना तातडीने रुग्णालयात भरती करण्यात आले. त्यांच्या गळ्याला दोराचा वळ होता.

मृत कांचनला, तू वंशाचा दिवा दिला नाही, असे हिणवत शारीरिक व मानसिक त्रास तिचा पती देत होते. वेळोवेळी मारहाण करीत चारित्र्यावर संशय घेऊन पैशाची मागणी करीत होते. मात्र, कांचनच्या माहेरकडील गरीब असल्याने पैशाची मागणी पूर्ण करू शकले नाही. अशा प्रकारच्या शारीरिक व मानसिक त्रासाला कंटाळून कांचनने आत्महत्या केल्याची फिर्याद नंदा भीमराव घुगे यांनी लोणार पोलिस स्टेशनला दिली आहे.


या फिर्यादीवरून अमोल विश्वनाथ सोनुने (पती), विश्वनाथ रामा सोनुने (सासरा), रामकोर सोनुने व सोनु कांगणे, शिवकन्या आघाव यांच्या विरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. ◂(तभा वृत्तसेवा)

# राम मंदिराचा दुसरा वर्धापन दिन बुधवारी

**◆ अयोध्या, २५ डिसेंबर**

२८ डिसेंबर २०२५ ते ०२ जानेवारी २०२६ पर्यंत राम मंदिराचा दुसरा वर्धापन साजरा केला जाणार आहे. २२ जानेवारी २०२४ रोजी पौष शुक्ल द्वादशी तिथीला पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी रामललाची प्राणप्रतिष्ठा करून राम मंदिराचे लोकार्पण केले होते. यंदा हा दिवस ३१ डिसेंबर २०२५ रोजी येत आहे. गेल्या वर्षी हा दिवस ११ जानेवारी २०२५ रोजी साजरा करण्यात आला होता. ३१ डिसेंबर २०२५ रोजी राम मंदिराचा दुसरा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार आहे.

अयोध्येत प्राणप्रतिष्ठा द्वादशीनिमित्त राम मंदिर परिसरात पाच दिवसांचा सांस्कृतिक आणि धार्मिक विधी होणार आहे. राम मंदिराच्या बाहेर पडण्याच्या ठिकाणी म्हणजेच अंगद टीला येथे सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. सामान्य रामभक्त यात सहभागी होऊ शकणार आहेत. ३१ डिसेंबर रोजी राम मंदिर आणि श्रीरामांचा दरबार नेहमीप्रमाणे रामभक्तांच्या दर्शनासाठी खुला राहील. ३१ तारखेला रामभक्तांना रामललाची विशेष पूजा आणि आरास पाहायला मिळू शकेल. राम मंदिर ट्रस्टने यासाठी व्यापक तयारी केली आहे. यावर्षी हा दिवस ३१ डिसेंबर रोजी आहे. सकाळी ९.३० वाजता विशेष पूजन होणार आहे. नेहमीप्रमाणे रामभक्तांना त्या दिवशीही दर्शन घेता येईल. भाविक अयोध्येत येऊ शकत नसतील, तर ते त्यांच्या घरातून राम मंदिरातील रामललाची पूजा पाहू शकतात. ◂(वृत्तसंस्था)



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर गुरुवारी व्यावसायिक विमानसेवेला सुरुवात झाली. इंडिगो कंपनीचे बंगळूरूहून आलेले पहिले विमान सकाळी ८ वाजता धावपट्टीवर उतरल्यानंतर 'वॉटर कॅनन सॅल्यूट' ने त्याचे स्वागत करण्यात आले

# सेंगरच्या शिक्षेविरोधात सीबीआय सर्वोच्च न्यायालयात जाणार

## उन्नाव बलात्कार प्रकरण

**◆ नवी दिल्ली, २५ डिसेंबर**

उन्नाव बलात्कार प्रकरणातील मुख्य आरोपी भाजपाचे माजी आमदार कुलदीप सिंह सेंगर याची आजन्म कारावासाची शिक्षा रद्द करण्याच्या निर्णयाला सीबीआय सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणार आहे. याबाबतची माहिती सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी दिली.

दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरूद्ध सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने सेंगरला जामीन मंजूर केला असून त्याची आजन्म कारावासाची शिक्षा देखील निलंबित करण्यात आली आहे.

याबाबत बोलताना सीबीआयचे प्रवक्त्यांनी सांगितले की, सेंगर हा अजूनही तुरुंगवासातच राहणार आहे. कारण तो अजून बलात्कार पीडित तरुणीच्या वडिलांच्या मृत्यू प्रकरणात दहा वर्षे कारावास भोगत आहे. सेंगरला २०१७ मध्ये मुलीचे अपहरण करून बलात्कार केल्याप्रकरणी दोषी ठरवण्यात आले होते. त्यावेळी ती पीडिता अल्पवयीन होती. त्यानंतर सेंगरने त्याच्या आजन्म कारावासाच्या शिक्षेविरूद्ध उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्याला सीबीआय आणि कुटुंबियांनी जोरदार विरोध केला होता.

दरम्यान, दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर सीबीआयने प्रतिक्रिया दिली की, सीबीआयने या प्रकरणात वेळेत आपले म्हणणे आणि युक्तिवाद लेखी स्वरूपात मांडले होते. सीबीआय उच्च न्यायालयाच्या निर्णयाला त्वरित आव्हान देणार आहे. ◂(वृत्तसंस्था)



**सराफा**

| | |
|---|---|
| **सोने** (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,३७,००० |
| **चांदी** (प्रतिकिलो) | रु. २,२०,२०० |

**मो. 9373107772**

**तापमान**

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३०.४ | १५.१ |
| अमरावती | ३१.२ | १२.४ |
| भंडारा | २७.० | १०.० |
| बुलडाणा | २९.० | १३.० |
| चंद्रपूर | २९.८ | १२.४ |
| गडचिरोली | २९.२ | १०.२ |
| गोंदिया | २६.९ | १०.५ |
| नागपूर | २८.४ | ११.२ |
| वर्धा | २९.० | १०.२ |
| वाशीम | ३१.० | ११.४ |
| यवतमाळ | २९.० | १०.० |

# टीजेएसबीच्या दिनदर्शिकेचे आशिष शेलारांच्या हस्ते प्रकाशन

## युनेस्कोच्या वारसास्थळ किल्ल्यांना समर्पित

**◆ ठाणे, २५ डिसेंबर**

टीजेएसबी सहकारी बँकेच्या २०२६ च्या दिनदर्शिकेचे सांस्कृतिक आणि माहिती तंत्रज्ञानमंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते नुकतेच प्रकाशन करण्यात आले.



यावेळी टीजेएसबी सहकारी बँकेचे अध्यक्ष शरद गांगल, उपाध्यक्ष सीए वैभव सिंघवी, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी निखिल आरेकर, दिनदर्शिकेचे मार्गदर्शक प्रवीण जाधव आणि एजीएम स्नेहा फडके यांची उपस्थिती होती.

ज्ञान, माहिती आणि प्रबोधन यांच्या आधारे टीजेएसबी सहकारी बँक दरवर्षी आपली दिनदर्शिका प्रसिद्ध करत असते. मराठीसह इंग्रजी, कन्नड, गुजराथी आणि हिंदी अशा पाच भाषांतून टीजेएसबी बँकेची दिनदर्शिका प्रसिद्ध केली जाते. दिनदर्शिका उपयुक्त आणि संग्राह्य ठरावी याला प्राधान्य देत वर्ष दोन हजार सव्वीसची दिनदर्शिका बारा ऐतिहासिक किल्ल्यांना युनेस्कोने जागतिक वारसास्थळ म्हणून दिलेल्या मान्यतेला समर्पित आहे. प्रत्येक किल्ल्यासोबत संक्षिप्त माहिती तसेच क्यूआर कोड देण्यात आला आहे. हा क्यूआर कोड स्कॅन केल्यावर संबंधित किल्ल्याचा इतिहास, वास्तुरचना आणि महत्त्व याबाबत सविस्तर ध्वनिमुद्रित माहिती उपलब्ध होते. ही दिनदर्शिका विचारांना चालना देणारी असून गौरवशाली इतिहासाबद्दल अभिमान निर्माण करणारी आहे. वा

# आता 'चहा'ची व्याख्या बदलली

## ग्रीन टी किंवा हर्बल आता 'चहा' नव्हे

**◆ नवी दिल्ली, २५ डिसेंबर**

केंद्र सरकारने आता चहाची व्याख्या बदलली आहे. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने (एफएसएसएआय) स्पष्ट केले आहे की चहा ही केवळ कॅमेलिया सायनेन्सिस वनस्पतीपासून बनवलेले उत्पादन म्हणून परिभाषित केली जाऊ शकते. शिवाय, एफएसएसएआयने अन्न व्यवसाय संचालकांना कडक इशारा दिला आहे की औषधी वनस्पती किंवा फुलांपासून बनवलेल्या पेयांना चहा म्हणून लेबल करणे बेकायदेशीर आहे. त्यामुळे हर्बल किंवा ग्रीन टीला चहा म्हणून ब्रँड करणे दिशाभूल करणारी जाहिरात आणि चुकीचे 'लेबलिंग' होईल.



जारी केलेल्या निर्देशात एफएसएसएआयने म्हटले आहे की अनेक कंपन्या हर्बल टी, रुइबोस टी आणि फ्लॉवर टी सारखी उत्पादने विकत आहेत, जी प्रत्यक्षात चहा नाहीत. कारण ती चहाच्या वनस्पतीपासून बनवलेली नाहीत. नियमांनुसार, चहा हा शब्द फक्त कॅमेलिया सायनेन्सिसपासून बनवलेल्या पेयांसाठी वापरला जाऊ शकतो. यामध्ये कांगडा चहा, ग्रीन टी आणि इन्स्टंट टी सारख्या जातींचा समावेश आहे.

एफएसएएसएआयने स्पष्टपणे म्हटले आहे की कॅमेलिया सायनेन्सिस या वनस्पतीपासून न बनवलेल्या हर्बल किंवा वनस्पती-आधारित पेयांना चहा म्हणणे चुकीचे आणि दिशाभूल करणारे आहे आणि अन्न सुरक्षा तसेच मानके कायदा, २००६ चे उल्लंघन आहे. प्राधिकरणाने उत्पादन, पॅकेजिंग, विपणन, आयात, विक्री आणि ई-कॉमर्समध्ये गुंतलेल्या सर्व व्यवसायांना अशा उत्पादनांसाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे चहा हा शब्द वापरण्यापासून परावृत्त करण्याचे निर्देश दिले आहेत. एफएसएसआयने राज्य अधिकाऱ्यांना ऑनलाइन विक्रेत्यांसह सर्वांद्वारे नियमांचे काटेकोरपणे पालन सुनिश्चित करण्याचे आदेश देखील दिले आहेत. ◂(वृत्तसंस्था)

### तर पेयांची नावे बदलावी लागतील का?

अशा परिस्थितीत, हर्बल टी, डिटॉक्स टी आणि फ्लॉवर टी सारख्या पेयांची नावे आता बदलावी लागतील. ही पेये उपलब्ध राहतील, परंतु त्यांची विक्री आता चहा म्हणून केली जाणार नाही. एफएसएसएआयच्या या पावलामुळे चहाच्या व्याख्येबाबत बाजारपेठेत सुरू असलेल्या गोंधळाचे निराकरण होईल आणि ग्राहकांना त्यांच्या कपमधील पेय खरा चहा आहे की फक्त हर्बल इंफ्यूजन आहे हे समजण्यास मदत होईल.

# गुरुवार ठरला अपघातवार

# झोपेतच गाठले मृत्यूने



## कर्नाटक, तामिळनाडूत ३२ प्रवाशांचा मृत्यू

### ट्रकच्या धडकेनंतर बस जळाली; कुड्डालोरजवळ टायर फुटून बसचा अपघात

◆ **बंगळुरू/ चेन्नई, २५ डिसेंबर**

कर्नाटक आणि तामिळनाडू राज्यांत गुरुवारी पहाटे ४ ते ५ वाजताच्या सुमारास खाजगी बस आणि सरकारी बसच्या झालेल्या अपघातात ३७ प्रवाशांना झोपेतच मृत्यूने गाठले, तर ३५ जण जखमी झाले आहेत.

कर्नाटकातील चित्रदुर्ग जिल्ह्यात हिरीयुरजवळ भरधाव कंटेनर ट्रकने एका खाजगी लक्झरी स्लीपर बसला धडक दिली. यानंतर बसला आग लागली. घटनेच्या वेळी प्रवासी गाढ झोपेत असल्याने होरपळून २२ प्रवाशांचा मृत्यू झाला, तर २० जण जखमी आहे. दुसरीकडे तामिळनाडूत तरुचिरापल्लीहून चेन्नईला जाणाऱ्या राज्य परिवहनच्या बसचा टायर फुटला, आणि बस दुभाजक ओलांडून दरीत कोसळली. या घटनेत १० प्रवाशांचा मृत्यू झाला, तर १५ जण जखमी आहे. होरपळून मृत झालेल्या प्रवाशांची ओळख अद्याप पटलेली नसल्याने त्यांची डीएनए चाचणी करण्यात येणार आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले की, खाजगी बस राष्ट्रीय महामार्ग ४८ वरून बंगळुरूहून शिवमोगाला जात असताना चित्रदुर्ग जिल्ह्यात हिरीयुर गावाजवळ विरुद्ध दिशेने येणारा एक अनियंत्रित ट्रक दुभाजक ओलांडून बसवर धडकला. यानंतर बसची डिझेल टँक फुटली आणि आगीचा भडका उडाला.

◂(वृत्तसंस्था)

**आपत्कालीन दरवाजा उघडलाच नाही**

आग इतकी वेगाने पसरली की, अनेक प्रवाशांना बाहेर पडण्यासाठी वेळच मिळाला नाही. यावेळी आपत्कालीन दरवाजा उघडलाच नाही, त्यामुळे प्रवासी बसमध्ये अडकले. घटनेची माहिती मिळताच पोलिस आणि अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी आगीवर नियंत्रण मिळवत अपघातग्रस्तांना चित्रदुर्ग येथील रुग्णालयात पोहोचविले असता, डॉक्टरांनी २२ प्रवाशांना मृत घोषित केले, २० जणांवर उपचार सुरू आहे. अपघाताच्या सखोल चौकशीचे आदेश संबंधित विभागाला दिले आहे. ■

**विद्यार्थ्यांची बस थोडक्यात वाचली**

अपघात झालेल्या बसच्याच मागे विद्यार्थ्यांना घेऊन येणारी बस होती. ही बस बेंगलुरू येथून दांडेलीकडे जात होती. या बसचा चालक आदित्यने या भीषण अपघाताबद्दल सांगितले की, दुभाजक ओलांडून ट्रक बसच्या थेट डिझेल टँकला धडकला. माझी बस मागेच होती. धडक बसताच मी बसचा वेग कमी केला आणि वाहन डावीकडे वळविले. मी धाव घेत सात जणांना वाचविले. काही क्षणांनंतर अचानक स्फोट झाल्याने बसला आगीने वेढले. लोक किंचाळत होते पण कुणीही त्यांच्या मदतीला जाऊ शकले नाहीत. ■

**चालकाचे नियंत्रण सुटल्याने झाला घात**

एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, तामिळनाडूच्या कुड्डालोर जिल्ह्यात तिरुचिरापल्लीहून चेन्नईला जाणाऱ्या राज्य परिवहनच्या बसचा टायर फुटला आणि त्यानंतर चालकाचे नियंत्रण सुटून बस दुभाजक ओलांडून दोन कारला धडक देत रस्त्याच्या पलीकडे दरीत कोसळली. घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी पोहोचले. त्यांनी अपघातग्रस्तांनी रुग्णालयात नेले असता, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी १० प्रवाशांना मृत घोषित केले, तर १५ जणांवर उपचार सुरू आहे. बसची धडक इतकी भीषण होती की दोन्ही कार पूर्णपणे उद्ध्वस्त झाली. अपघातानंतर, राष्ट्रीय महामार्गावरील वाहनांची वाहतूक काही काळासाठी विस्कळीत झाली होती. ■

## कार पुलावरून कोसळली, ४ महिला ठार

**५ जण गंभीर जखमी**

**सोंडो गावाजवळ भीषण अपघात**

◆ **राजुरा, २५ डिसेंबर**

नागपूरहून कागजनगरकडे जात असलेली कार राजुरा-तेलंगाना मार्गावरच्या सोंडो गावानजीक पुलाखाली कोसळली. या भीषण अपघातात माय-लेकीसह ४ महिलांचा जागीच मृत्यू झाला, तर ५ जण गंभीर जखमी झालेत. ही घटना बुधवारी मध्यरात्रीनंतर दीडच्या सुमारास घडली.

तेलंगणातील कागजनगर येथील निजामुद्दीन वसाहतीतील रहिवासी असलेले मृतक व जखमी हे नागपूर येथील रुग्णालयात उपचार घेत असलेल्या बहिणीची प्रकृती बघायला २३ डिसेंबरला किरायाच्या आर्टीका कारने गेले होते. बहिणीची प्रकृती बघून ते सर्व २४ डिसेंबरला नागपूर येथून कागजनगरकडे परतत असतानाच, राजुरा-तेलंगणा मार्गावर सोंडो गावाजवळील पुलावर चालकाचे वाहनावरून नियंत्रण सुटल्याने वाहन पुलावरून खाली कोसळले. यात ४ महिलांचा जागीच मृत्यू झाला. तर ५ जण गंभीर जखमी आहेत. यात एकाच घरातील माय-लेकींचा समावेश आहे. मृतांमध्ये आई सलमा बेगम, मुलगी अक्सा शबरीन या मायलेकीसह अफजल बेगम, साहिरा बेगम यांचा समावेश आहे. गंभीर जखमी असलेल्या नुसरत बेगम, नजहत बेगम, शाहीन निशा, अब्दुल अरहान व वाहन चालक अब्दुल रहमान यांना चंद्रपूर जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले.




सोंडो गावाजवळ पुलाखाली कोसळलेली कार

घटनेची माहिती कळताच राजुरा पोलिसांनी घटनास्थळ गाठून जखमी व मृतांना राजुरा येथील उप जिल्हा रुग्णालयात दाखल केले. काहींची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना चंद्रपूर येथील रुग्णालयात पाठविण्यात आले. वाहन चालक अब्दुल रहमान याच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास राजुरा पोलिस करीत आहे.

**राष्ट्रीय महामार्गावरील ढिसाळ नियोजनाचे बळी**

गेल्या अनेक दिवसांपासून राष्ट्रीय महामार्गाचे काम दिवस-रात्र सुरू आहे. परंतु, कंत्राटदाराच्या ढिसाळ नियोजनाने प्रवाशांचा बळी जात असल्याचा आरोप होत आहे. रस्त्यांवर योग्य दिशादर्शक फलक नाहीत, कुठेही कसेही काम सुरू असते, धुळीने तर मागचे पुढचे काहीच दिसत नाही, कित्येकदा मोठमोठ्या यंत्रामुळे वाहतूक व्यवस्थेची कोंडी होते. रस्त्याच्या दोन्ही बाजूला मर्यादा ठरविणारे फलक किंवा सीमांकन नसल्याने अनेकदा वाहतुकीचा रस्ता लक्षात येत नाही. या महामार्ग बांधकामात कोणाचे नियंत्रण आहे की नाही, असा सवाल नागरिक करीत आहे.

◂(तभा वृत्तसेवा)

## चालत्या कारला आग लागून तीन ठार

◆ **नारनौल, २५ डिसेंबर**

हरियाणातील नारनौल येथे राष्ट्रीय महामार्गावर बुधवारी रात्री उशिरा झालेल्या भीषण अपघातात तिघांचा जागीच मृत्यू झाला. राष्ट्रीय महामार्ग १५२-डी वरील टोल प्लाझापासून काही अंतरावर एका वेगवान ट्रकने एका कारला धडक दिली. यामुळे कार लगेचच पेटली. या घटनेत माजी जिल्हा परिषद सदस्य आणि वकील राजकुमार यदुवंशी, कापड व्यापारी रवी दत्त उर्फ दारा सिंग आणि टॅक्सी चालक प्रवीण उर्फ पौमी यांचा मृत्यू झाला.

अपघात रात्री सुमारे २:३० वाजता झाला. अपघातग्रस्त कार किआ क्रेनने एका कामावरून परतत होती. ट्रकच्या धडकेनंतर कार आणि ट्रक दोघांनाही आग लागली. कॅन्टर चालक स्वतःला वाचवण्यासाठी पळाला तर कारमध्ये अडकलेल्या तिघांनाही बचावासाठी वेळ मिळाला नाही. अग्निशमन दल, पोलिस आणि रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाली. अग्निशामन दलाला आग आटोक्यात आणण्यात यश मिळाले.

◂(वृत्तसंस्था)

## समृद्धी महामार्गावर भीषण अपघातात दोघांचा मृत्यू

◆ **कारंजा लाड, २५ डिसेंबर**

समृद्धी महामार्गावरील लोकेशन क्रमांक १९७ वर गुरुवारी पहाटे चारच्या दरम्यान दोन ट्रकचा भीषण अपघात झाला. दुरुस्तीसाठी रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला मागून येणाऱ्या दुसऱ्या ट्रकने जोरदार धडक दिली. यात दोघांचा मृत्यू, तर एक जण गंभीर जखमी झाला. संतोष सिंग व सुभाष वाघ अशी मृतांची नावे आहेत. अनिकेत सिंग हा गंभीर जखमी झाला. ट्रक दुरुस्तीसाठी रस्त्याच्या कडेला उभा असताना मागून येणाऱ्या दुसऱ्या ट्रकने उभ्या ट्रकला मागून धडक दिली. अपघाताची माहिती मिळताच श्री गुरूमंदिर रुग्णवाहिकेचे रुग्णसेवक रमेश देशमुख यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली.

याचवेळी शेलूबाजार १०८ समृद्धी महामार्ग येथून रुग्णवाहिका पायलट आतिश चव्हाण व डॉ. गणेश यांच्यासह घटनास्थळी दाखल झाली. जखमींना तातडीने कारंजा उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. डॉ. स्नेहलता चव्हाण यांनी दोघांना मृत घोषित केले, तर एका जखमीवर प्राथमिक उपचार करण्यात आले. अपघातानंतर महामार्गावर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.



रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला मागून धडकलेला ट्रक

◂(तभा वृत्तसेवा)

## ख्रिसमसला नरेंद्र मोदी चर्चमध्ये उपस्थित



◆ **नवी दिल्ली, २५ डिसेंबर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ख्रिसमसनिमित्त दिल्लीतील 'कॅथेड्रल चर्च ऑफ द रिडेम्पशन'मध्ये पोहोचले आणि तिथे प्रार्थना सभेत भाग घेतला. दिल्लीतील ऐतिहासिक कॅथेड्रल चर्च हे सर्वात जुन्या चर्चपैकी एक आहे. याठिकाणी पंतप्रधान मोदी यांनी भेट देत ख्रिसमसच्या शुभेच्छा दिल्या. त्यावेळी चर्चमध्ये मोदींसह अनेक लोक उपस्थित होते. हे चर्च सेंट्रल सेक्रेटेरिएट मेट्रो स्टेशनजवळच आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या समाज माध्यम अकाऊंटवर हे फोटो पोस्ट करत म्हटले आहे की, दिल्लीतील 'कॅथेड्रल चर्च ऑफ द रिडेम्पशन'मध्ये नाताळच्या सकाळी होणाऱ्या प्रार्थनेत सहभागी झालो. ही प्रार्थना प्रेम, शांती आणि करुणेचा शाश्वत संदेशाचे प्रतिक आहे. नाताळची भावना आपल्या समाजात सुसंवाद आणि बंधुता आणेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पंतप्रधान मोदी यांच्या स्वागतासाठी येथे फार विशेष आयोजन करण्यात आले नाही.

पंतप्रधान शांततेत त्या ठिकाणी पोहचले. सर्वसामान्यासारखे ते प्रार्थनेत सहभागी झाले. त्यानंतर कॅरल्समध्येही ते हजर होते असे येथील बिशप पॉल स्वरूप यांनी सांगितले.

◂(वृत्तसंस्था)

## भारताशी आमचे संबंध धोरणात्मक

### अमेरिकेच्या अहवालामुळे चीन संतापला, द्विपक्षीय संबंधात अडथळा आणण्याचा डाव

◆ **बीजिंग, २५ डिसेंबर**

चीन भारतासोबतच्या संबंधांना धोरणात्मक आणि दीर्घकालीन दृष्टिकोनातून पाहत असून, कोणत्याही देशाच्या भागावर ताबा मिळविण्याचा अथवा त्यासाठी संघर्ष करण्याची आमची भूमिका नसल्याचे स्पष्ट करीत चीनने अमेरिकेच्या संरक्षण विभाग पेंटागॉनने प्रसिद्ध केलेल्या अहवालावर टीका केली.

चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते लिन जियान यांनी पत्रपरिषदेत सांगितले की, अमेरिकेच्या अहवालात अमेरिका-भारत संबंधांना आणखी मजबूत होण्यापासून रोखण्यासाठी चीन सीमेवरील तणाव कमी करण्याचा दिखावा करीत असल्याचा उल्लेख म्हणजे द्विपक्षीय संबंधांना अडथळा आणण्याचा प्रयत्न आहे. आमच्यासाठी भारताशी असलेले संबंध धोरणात्मक आणि दीर्घकालीन दृष्टिकोनावर आधारित आहेत. सीमा प्रश्न हा चीन



आणि भारत यांच्यातील मुद्दा आहे आणि या विषयावर कोणत्याही देशाने भाष्य केल्यास आम्ही त्याचा विरोध करतो. पेंटागॉनचा अहवाल केवळ तर्कावर आधारित आहे. चीन भारताशी संवाद मजबूत करण्यास, परस्पर विश्वास वाढविण्यास आणि द्विपक्षीय संबंध स्थिर, निरोगी आणि शाश्वत विकासाकडे नेण्यास तयार आहे. आमचा हेतू कोणत्याही देशाच्या भागावर ताबा मिळविण्याचा नाही, तर शांततेने तोडगा काढून संबंध मजबूत करण्याचे आमचे धोरण आहे. अमेरिका स्वतःचे हितसंबंधाला पूरक अहवाल तयार करतो, त्यांच्याकडे पुरावे असल्यास जगासमोर आणावे. अमेरिकेचा अहवाल चीनच्या संरक्षण धोरणाचे चुकीचे प्रतिनिधित्व करतो आणि अनावश्यक अटकळ निर्माण करतो. चीनने नेहमीच शांततापूर्ण विकास आणि बचावात्मक संरक्षण धोरणावर भर दिला आहे.◂(वृत्तसंस्था)

## कर्नाटक मंत्र्यांच्या घरात सापडली १४ कोटी रोख

**बंगळुरू** : कर्नाटक सरकारमधील अल्पसंख्यक विभागाचे मंत्री आणि काँग्रेस नेते झमीर अहमद आणि त्यांच्या स्वीय सचिवांच्या घरावर गुरुवारी लोकायुक्तांनी छापा टाकला. या कारवाईत १४ कोटींची रोख जप्त करण्यात आली. स्थानिक लोकायुक्त पोलिस ठाण्यात बेहिशेबी मालमत्ता बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लोकायुक्त अधिकाऱ्याने सांगितले की, बंगळुरू येथील सहकार संचालनालयातून गृहनिर्माण विभागात प्रतिनियुक्तीवर असलेले आणि मंत्री झमीर अहमद यांचे स्वीय सचिव सरदार सरफराज खान आणि मंत्री अहमद यांचे घर आणि कार्यालयावर छापे टाकण्यात आले. ■

## सैनिकांना इंस्टाग्रामवर पोस्ट करण्यास बंदी

◆ **नवी दिल्ली, २५ डिसेंबर**

भारतीय लष्कराने समाज माध्यमाच्या वापराबाबत आपल्या धोरणात महत्त्वाचा बदल केला आहे. नव्या निर्देशांनुसार आता लष्करातील जवान आणि अधिकारी इंस्टाग्रामचा वापर केवळ पाहणी आणि निरीक्षणापुरताच करू शकणार आहेत. ते कोणतीही पोस्ट टाकू शकणार नाहीत, तसेच कोणत्याही पोस्टला लाईक किंवा त्यावर टिप्पणी करण्याचीही त्यांना मुभा नसेल.

सूत्रांच्या माहितीनुसार, डिजिटल व्यवहारांबाबत आधीपासून लागू असलेले इतर सर्व नियम कायम राहणार असून हे नवे आदेश सेनेच्या सर्व युनिट्स आणि विभागांना जारी करण्यात आले आहेत.

या धोरणामागील उद्देश असा आहे की जवानांनी समाज माध्यमांवर फिरणारी माहिती पाहावी, त्याबाबत जागरूक राहावे आणि खोटी, दिशाभूल करणारी किंवा संशयास्पद सामग्री ओळखता यावी. अशा प्रकारची कोणतीही पोस्ट आढळल्यास ती त्वरित वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणण्याची मुभा जवानांना देण्यात आली आहे. यामुळे माहिती युद्ध आणि दुष्प्रचाराविरोधात सेनेची अंतर्गत सतर्कता अधिक मजबूत होण्यास मदत होणार आहे. भारतीय सेना यापूर्वीही फेसबुक, एक्स आणि इंस्टाग्रामसारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या वापरावर वेळोवेळी मार्गदर्शक सूचना जारी करत आली आहे.

**'हनी ट्रॅप'मध्ये अडकण्याची भीती**

सुरक्षेच्या कारणास्तव यापूर्वी या माध्यमांवर कडक निर्बंध घालण्यात आले होते. काही प्रकरणांमध्ये परदेशी गुप्तचर यंत्रणांनी रचलेल्या 'हनी ट्रॅप'मध्ये अडकून काही जवानांकडून नकळत संवेदनशील माहिती लीक झाल्याच्या घटना समोर आल्या होत्या.

◂(वृत्तसंस्था)

## विवेक भावसार यांना राईट वॉटर प्रकरणी न्यायालयाची मनाई

**भाजपा प्रदेश सहमुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांना दिलासा**

**नागपूर, दि.२५ डिसेंबर-**

नागपूर स्थित राईट वॉटर सोल्युशन्स या कंपनीस भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सहमुख्य प्रवक्ते व महावितरणचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक यांच्यामुळे लाभ झाला अशा बदनामीकारक बातम्या ताबडतोब वेबसाईटवरून हटवाव्यात आणि कंपनीविरोधात कोणताही मजकूर प्रकाशित करू नये, अशा स्वरुपाचा मनाई आदेश नागपूर मधील न्यायालयाने द न्यूज २१ डॉट कॉम आणि द राजकारण डॉट कॉम या वेबसाईटचे संपादक विवेक भावसार यांना बुधवारी दिला. यामुळे विश्वास पाठक यांना दिलासा मिळाला आहे.

मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेत निवडक कंत्राटदारांना पंप बसविण्याची कामे मिळाली असून त्या कंपन्यांपैकी एक असलेल्या राईट वॉटर या कंपनीस मा. विश्वास पाठक यांच्यामुळे लाभ झाल्याचा दावा करणाऱ्या बातम्या विवेक भावसार यांनी त्यांच्या वेबसाईटवर प्रसिद्ध केल्या होत्या. ट्विटर व व्हॉट्स ॲपवरून त्याला अधिक प्रसिद्धी दिली होती. या बदनामीच्या विरोधात राईट वॉटरने नागपूरमधील न्यायालयात धाव घेतली. विश्वास पाठक यांचे राईट वॉटरमध्ये अल्प समभाग असून त्यांचा कंपनीच्या दैनंदिन कामाशी काही संबंध नाही, राईट वॉटरला महावितरणच्या टेंडर प्रक्रियेतून स्पर्धात्मक व पारदर्शी पद्धतीने पंप बसविण्याची कामे मिळाली आहेत व महावितरणच्या संचालक मंडळात राईट वॉटरविषयी निर्णय होत असताना मा. विश्वास पाठक त्या निर्णयप्रक्रियेपासून दूर राहिले होते, असे मुद्दे राईट वॉटरने मांडले. या याचिकेची दखल घेऊन जॉईंट सिव्हिल जज (सिनिअर डिव्हिजन) न्या. आनंद करभाजन यांनी विवेक भावसार यांच्याविरोधात मनाई हुकूम बजावला. न्यायालयाच्या आदेशात म्हटले आहे की, राईट वॉटरच्या संदर्भातील चार बातम्या प्रसिद्ध करण्यास, पुन्हा प्रसिद्ध करण्यास, वितरित करण्यास अथवा कोणत्याही प्रकारे उपलब्ध करण्यास मनाई करण्यात येत आहे. तसेच कंपनीच्या विरोधातील कोणत्याही स्वरुपातील बदनामीकारक मजकूर प्रसिद्ध करण्यास तात्पुरती मनाई करण्यात येत आहे.

आदेशात असेही म्हटले आहे की, या प्रकरणी पुढील सुनावणी होईपर्यंत विवेक भावसार आणि वेबसाईटची प्रकाशक कंपनी कल्पक डिजिटल मीडिया यांनी संबंधित बातम्या आपल्या वेबसाईटवरून हटवाव्यात तसेच त्यांच्या नियंत्रणातील सर्व सोशल मीडिया हँडल्स आणि अन्य प्लॅटफॉर्मवरूनही हटवाव्यात. या बातम्यांमधील छायाचित्रे व शब्दांकन ध्यानात घेता असे दिसते की, त्या अपुऱ्या माहितीवर आधारित आहेत तसेच त्यामध्ये राईट वॉटरने दिलेल्या नोटिशीला उत्तरही दिलेले नसून कंपनी यशस्वी झालेल्या निविदा प्रक्रियेत अडथळा आणणाऱ्या व असंतोष निर्माण करणाऱ्या आहेत. अपुऱ्या माहितीवर आधारित या वृत्तलेखांमुळे कंपनीचा लौकिक धोक्यात आला आहे व त्यामुळे न्यायालयाचा हस्तक्षेप आवश्यक आहे. पाठक यांनी सांगितले, 'न्यायालयाने राईट वॉटर कंपनीबाबत विवेक भावसार यांना मनाई हुकूम दिल्याबद्दल आपण समाधानी आहोत. नागपूरमधील एक मराठी तरूण पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देणारा उद्योग उभा करत असल्याने मी या कंपनीत अनेक वर्षांपूर्वी छोटी गुंतवणूक केली होती.

सौर कृषिपंप बसविणाऱ्या अनेक कंपन्यांपैकी केवळ राईट वॉटर कंपनीला टार्गेट करून त्या आधारे कंपनीसोबत माझीही बदनामी करण्यात येत होती. न्यायालयाच्या पुढील सुनावणीत सत्य समाजासमोर येईल व बदनामी करणाऱ्या संबंधितांना शिक्षा होईल, अशी मला आशा आहे.' विवेक भावसार यांनी राईट वॉटरविषयी बदनामीकारक मजकूर प्रसिद्ध करण्यास न्यायालयाने मनाई केली असून संबंधित बातम्या हटविण्यास सांगितले आहे. अन्य कोणी या बातम्यांना अथवा तशा मजकुराला वृत्तपत्रे, वेबसाईट, व्हॉट्स ॲप इत्यादी सोशल मीडियावर प्रसिद्धी दिली तर त्यामुळेही न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होईल. त्यामुळे पत्रकार मित्रांनी या बाबतीत काळजी घ्यावी, असे आवाहन विश्वास पाठक यांनी केले.

## १९६५ पूर्वीच्या जुन्या हिंदी गाण्यांवर कोणाचाही मालकी हक्क नाही

**दिल्ली उच्च न्यायालयाचा महत्त्वाचा निर्णय**

◆ **नवी दिल्ली, २५ डिसेंबर**

लता मंगेशकर, मोहम्मद रफी, किशोर कुमार, आशा भोसले यांसारख्या दिग्गज गायकांनी गायलेली हिंदी चित्रपटसृष्टीची सुवर्णकाळातील गाणी आजही हॉटेल्स, कार्यक्रम, टीव्ही आणि डिजिटल प्लॅटफॉर्मवर मोठ्या प्रमाणात ऐकली जातात. ही गाणी प्रामुख्याने सारेगामा इंडिया लिमिटेडशी संबंधित असली, तरी त्यांचे कॉपीराइट कायमस्वरूपी नसतात, हा महत्त्वाचा मुद्दा आता समोर आला आहे.

भारतातील कॉपीराइट कायदा १९५७ मधील कलम २७ नुसार, एखाद्या साउंड रेकॉर्डिंगचा कॉपीराइट हा त्याच्या पहिल्या प्रकाशनानंतरच्या वर्षापासून ६० वर्षे असतो. ही मुदत संपल्यानंतर ते गाणे पब्लिक डोमेनमध्ये जाते. म्हणजेच, अशा गाण्यांचा वापर करण्यासाठी कोणताही परवाना (लायसन्स) घेण्याची गरज नाही. उदाहरणार्थ, १९६५ साली प्रसिद्ध झालेल्या गाण्यांचा कॉपीराइट २०२५ च्या अखेरीस संपतो. त्यामुळे १९५० आणि १९६० च्या सुरुवातीला आलेली अनेक लोकप्रिय हिंदी गाणी लवकरच सार्वजनिक वापरासाठी खुली होत आहेत.



**न्यायालयात नेमके काय घडले?**

ऑक्टोबर २०२५ मध्ये बिग्नेट सोल्यूशन्स एलएलपी या संस्थेला एका खाजगी कार्यक्रमात काही जुनी हिंदी गाणी वाजवण्यासाठी नोव्हेक्स कम्युनिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेडकडून परवाना घेण्यास सांगण्यात आले. याविरोधात बिग्नेटने दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली.

१० ऑक्टोबर २०२५ रोजी न्यायालयाने स्पष्ट केले की, नोव्हेक्स ज्या गाण्यांचे मालक नाही किंवा जी गाणी आधीच पब्लिक डोमेनमध्ये आहेत, त्यांच्यावर कोणताही हक्क सांगत नाही. यानंतर बिग्नेटने फक्त १९६५ पूर्वीची गाणी वाजवण्याची हमी दिली आणि कार्यक्रम कोणत्याही अडथळ्याशिवाय पार पडला. २१ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या सुनावणीत, नोव्हेक्सने पुन्हा सांगितले की, १९६५ पूर्वी प्रकाशित झालेल्या साउंड रेकॉर्डिंगवर ते कॉपीराइटचा दावा करत नाहीत. कार्यक्रम शांततेत पार पडल्याने, न्यायालयाने ही केस निकाली काढली. या निर्णयामुळे एक महत्त्वाचा मुद्दा समोर आला आहे. दरवर्षी अनेक जुनी गाणी कॉपीराइटमुक्त होत आहेत.

◂(वृत्तसंस्था)

## नायजेरियात मशिदीत स्फोट

## ५ ठार, ३० जखमी

### नमाज पठणाच्या वेळी घटना

◆ **अबुजा, २५ डिसेंबर**

नायजेरियातील ईशान्येकडील मैदुगुरी शहरातील एका मशिदीत बुधवारी रात्री एका मशिदीत नमाज पठणाच्या वेळी शक्तिशाली स्फोट झाला, ज्यामध्ये पाच जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आणि ३० हून अधिक जण गंभीर जखमी झाले. हा स्फोट आत्मघातकी हल्ला असल्याचे तपासात उघड झाले आहे.

बोर्नो पोलिस कमांडचे प्रवक्ते नहूम यांनी सांगितले की, प्राथमिक तपासात आत्मघातकी बॉम्बस्फोट असल्याचे समोर आले. घटनास्थळावरून स्फोट घडविणाऱ्याचे जॅकेटचे तुकडे सापडले तथापि, घटनेचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही. मशिदीवरील बॉम्बस्फोटाची जबाबदारी अद्याप कोणीही स्वीकारलेली नसली तरी, अशा आत्मघाती हल्ल्यांचा संबंध अनेकदा बोको हरामशी जोडला जातो, ज्याने यापूर्वी नायजेरियात असेच अनेक हल्ले केले आहेत.

हल्ला नायजेरियाच्या सर्वात अशांत उत्तरेकडील प्रदेशात अलिकडच्या हल्ल्यांच्या मालिकेचा एक भाग आहे, जिथे स्थानिक सरकार बोको हराम आणि इस्लामिक स्टेट ऑफ वेस्ट आफ्रिका यासह अनेक दहशतवादी गटांशी लढत आहे.

◂(वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# एक लाट 'जोडी' दोघां...

कविमनाच्या माणसांकडे द्रष्टेपण असते असे म्हणतात. म्हणूनच त्यांच्या मनात उमलणाऱ्या कविकल्पना यादेखील दृष्टान्तासारख्याच असाव्यात. कवीच्या द्रष्ट्या कल्पनांना मान्यता मिळते हे खरे असले, तरी वास्तवालाही कधी कधी अपवादाचा छेद मिळतो, हेही तितकेच खरे. किंबहुना अपवादामुळेच वास्तवाचे सिद्धान्त सिद्ध होतात, असेही म्हटले जाते. 'दोन ओंडक्यांची होते, सागरात भेट, एक लाट तोडी दोघां, पुन्हा नाही गाठ' या 'गदिमां'नी गीत रामायणात उद्धृत केलेल्या दृष्टान्तालाही अपवाद ठरावा, अशा दुर्मिळ गोष्टी कधी कधी घडतात. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेल्या शिवसेनेच्या गडास गेल्या सुमारे सहा दशकांच्या वाटचालीत अनेक भगदाडे पडली. अनेक बिनीच्या मोहऱ्यांनी पक्षास जय महाराष्ट्र करून आपापल्या वेगळ्या वाटा धरल्या, पण त्यांच्या मनात बाळासाहेबांविषयीच्या ममत्वाचा हळवा कोपरा कायम जिवंत राहिला. पुढे ठाकरे घराण्यातच नेतृत्वाच्या मुद्यावरून निर्माण झालेल्या वादातून खुद्द राज ठाकरे यांनीही शिवसेना सोडली तेव्हा मात्र पक्षाची खऱ्या अर्थाने शकले झाली. या वादाच्या वादळात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांचे वेगळे होणे म्हणजे, सागरात भेटलेल्या दोन ओंडक्यांना लाटेच्या तडाख्याने दूर सारण्यासारखेच ठरले असले, तरी आता दोन दशकांनंतर त्यांनीच या कविकल्पनेस अपवाद असल्याचे सिद्ध करून दाखविले आहे.

उद्धव ठाकरे यांचे नेतृत्व स्वीकारण्यास ठाम नकार देऊन राज ठाकरे यांनी २० वर्षांपूर्वी शिवसेना सोडली आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना नावाचा स्वतंत्र पक्ष स्थापन केला. 'ज्याला दीड दमडीचेही राजकारण कळत नाही, त्या लोकांसाठी आपण शिवसेनेचे नेतेपद सोडत आहोत' असे सांगून राज ठाकरे यांनी शिवसेनेला पहिले भगदाड पाडले, त्याला दोन दशके पूर्ण झाल्यानंतर एका नव्या लाटेमुळे पुन्हा त्यांना उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेसोबत जाणे भाग पडले आहे. भाजपाप्रणीत महायुतीने महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत महाविकास आघाडी नावाची गाजराची पुंगी पुरती मोडून टाकली. या आघाडीतील अन्य पक्षाप्रमाणेच ठाकरे यांच्या शिवसेनेसाठी पराभवाच्या लाटेचा फटका बसला. त्यामुळे अन्य पर्याय जोडण्याचे सारे मार्ग संपल्यानंतर अखेरचा पर्याय म्हणूनच ठाकरे गट आणि राज ठाकरेंचा पक्ष यांच्या युतीकडे पाहावे लागेल.

'जे शिवसेना संपविण्याचा प्रयत्न करत आहेत, त्यांच्या पापाचा भागीदार होण्याची आपली इच्छा नाही' हे राज ठाकरे यांचे २० वर्षांपूर्वीचे विधान होते. एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेस सातत्याने पराभवाच्या लाटा झेलाव्या लागत असून पक्षास लागलेली गळती व गमावत चाललेला जनाधार यांमुळे ही शिवसेना संपण्याची प्रक्रिया जवळपास पूर्ण झाली आहे आणि या स्थितीच्या पापाचे खापर कोणाच्या माथ्यावर फोडले जात आहे, हेही स्पष्ट झाले आहे. राज ठाकरे यांनी त्या वेळी पक्षातून बाहेर पडण्याचा निर्णय जाहीर करताना, या पापात सहभाग नको, अशी भावना व्यक्त केली होती. आता शिवसेना संपविण्याच्या पापात आपला सहभाग नाही हे स्पष्ट झाल्यानंतरच ते पुन्हा उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेसोबत आले आहेत. ज्यांना दीड दमडीचेही राजकारण कळत नाही त्यांच्यासोबत काम करण्याची इच्छा नाही, असे त्यांनी पक्षत्यागाच्या वेळी सांगितले, तेव्हा त्या वक्तव्याचा रोख थेट उद्धव ठाकरे यांच्याकडेच होता. गेल्या २० वर्षांत शिवसेनेच्या राजकारणाच्या पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. राज ठाकरे यांनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून शिवसेनेच्या निष्ठावंतांना मोठ्या अपेक्षा होत्या. राज ठाकरे यांच्या तुलनेत तेव्हा फारच तोकडा अनुभव असलेले उद्धव ठाकरे बाळासाहेबांचा राजकीय वारसा समर्थपणे चालवून पक्ष पुढे नेऊ शकतील, याविषयी शंका असलेले अनेक निष्ठावंत राज ठाकरे यांच्याकडे अपेक्षेने पाहात होते, पण त्यांचा अपेक्षाभंग झालाच, पण उद्धव ठाकरे यांच्याविषयीदेखील भ्रमनिरास झाला. ज्यांना दीड दमडीचाही अनुभव नाही असे राज ठाकरे म्हणत होते, त्या उद्धव ठाकरेंनी बाळासाहेबांच्या राजकारणास बगल देत महाविकास आघाडीचा झेंडा हाती घेऊन राज्याच्या मुख्यमंत्री पदापर्यंत मजल मारली आणि राजकारणाचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या राज ठाकरे यांचा पक्ष मात्र, सत्तेच्या गणितात सातत्याने कच्चा राहिला. या पक्षाला राजकारणातही फारसे स्थान उरले नाही. राजकारणातला अनुभव आणि डावपेचांचा नेमका वापर या दोन वेगळ्या बाबी असल्याचे उद्धव ठाकरे यांनी दाखवून दिलेच, पण आपले राजकारण बाळासाहेबांच्या राजकारणाहूनही दोन पावले पुढचे आहे, याचीही चुणूक त्यांनी दाखविली. बाळासाहेब भोळे होते, मी भोळा नाही तर धूर्त आहे, असे जाहीरपणे सांगणाऱ्या ठाकरेंनी त्याच धूर्तपणाचा वापर करून भाजपासोबतच्या युतीला दगा देऊन शरद पवारांचे बोट धरत महाविकास आघाडीचे मुख्यमंत्री पद हस्तगत केले, तेव्हाच कदाचित राज ठाकरे यांना आपल्या २० वर्षांपूर्वीच्या त्या वक्तव्याचा पश्चात्तापही झाला असावा. तेव्हा राजकारणात दीड दमडीचाही अनुभव नसल्याची भावना व्यक्त करणाऱ्या राज ठाकरेंनी नंतरच्या दोन दशकांत उद्धव ठाकरेंच्या राजकारणातील कोलांटउड्यांसकट सारे अनुभव पाहिले आणि भाजपाच्या देशव्यापी लाटेच्या तीव्र तडाख्यामुळे ठाकरेंच्या जर्जर झालेल्या शिवसेनेसोबत पुन्हा जाण्याची वेळ राज ठाकरे यांच्यावर आली. नाराजीच्या लाटेमुळे वेगळे झालेले हे दोन भाऊ भाजपा लाटेच्या तडाख्याने एकत्र आले आणि लाटेच्या तडाख्यात वेगळे झालेले ओंडके पुन्हा भेटत नाहीत या कविकल्पनेस त्यांच्या राजकारणाने छेद दिला.

राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना गेल्या दोन दशकांत महाराष्ट्राच्या राजकारणात आपला ठसा उमटवू शकली नाहीच; उलट या पक्षाचे अस्तित्व वर्षागणीक अधिकाधिक क्षीणच होत गेले. नेतृत्वाचा एकखांबी तंबू असलेल्या कोणत्याही पक्षाची हीच अवस्था होत असते. त्यातही घराण्याच्या पुण्याईची शिदोरी घेऊन राजकारण करणाऱ्यांना ती पुण्याई असेपर्यंतच स्थान टिकविणे शक्य होत असते. ती उतरणीस लागली की, त्यांचे राजकारणही उतरणीस लागते. उद्धव ठाकरे यांच्या पाठीशी बाळासाहेबांची पुण्याई होती आणि राज ठाकरेंच्या राजकारणाही बाळासाहेबांच्या पठडीचे संस्कार होते. ही पुण्याई व संस्काराचा वारसा टिकविण्यात हे दोघेही नेते पुरेसे यशस्वी ठरले नाहीत, त्यामुळे बाळासाहेबांच्या राजकारणाचा प्रभावाने भारावलेला मतदारही या दोघांपासून दुरावत गेला. बाळासाहेबांनी कधीच मान्य केल्या नसत्या अशा अनेक तडजोडी उद्धव ठाकरे यांना अस्तित्व टिकविण्याच्या धडपडीत कराव्या लागल्या आणि त्यामध्ये त्यांच्या पक्षाची प्रतिमादेखील पणास लागली. आता राज ठाकरे यांची मनसे आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेस महाराष्ट्राच्या राजकारणातून पुरती गळती लागल्याचे स्पष्ट झाल्याने, अस्तित्वाच्या लढाईचा अखेरचा मार्ग म्हणून या दोघांना अपरिहार्य परिस्थितीने एकत्र आणले आहे आणि आपल्या अस्तित्वाच्या लढाईला मराठी माणसाच्या अस्तित्वाच्या लढाईचा मुलामा देऊन जुन्याच भावनिक मुद्यानिशी आपले उरलेसुरले अस्तित्व जपण्याची धडपड सुरू केली आहे. राज आणि उद्धव यांचे मनोमीलन हा प्रीतिसंगम आहे, असा दावा संजय राऊत यांनी केला होता. त्यावर उत्तर देताना, हा प्रीतिसंगम नसून भीतीसंगम आहे, अशी थेट खिल्ली भाजपाने उडविली होती. मराठी माणसाच्या अस्तित्वाची आणि मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याची भीती दाखविण्याचा गुळगुळीत झालेला मुद्दा हेच या उभयतांच्या राजकारणाचे भावी भांडवल असणार हे सिद्ध झाले आहे. मुंबईसारख्या महत्त्वाच्या महापालिकेवर सत्ता होती, तेव्हा मराठी माणसाचे मुंबईतून नामशेष होणारे अस्तित्व जपण्यासाठी उद्धव ठाकरेंच्या पक्षाने काय केले असा सवाल मराठी माणूस आता त्यांना विचारणारच आहे. त्याचे उत्तर देऊन मगच उद्धव आणि राज यांना आपल्या मनोमीलनाच्या हेतूमागील पारदर्शकता सिद्ध करावी लागेल. अन्यथा, आपले राजकारणातून संपत चाललेले अस्तित्व टिकविण्याच्या धडपडीपायी अपरिहार्यतेने एकत्र आलेले कुटुंब एवढाच त्यांच्या युतीचा निष्कर्ष असेल. राज आणि उद्धव यांनाही त्याची जाणीव नसेल असे नाही, पण अन्य कोणताच मार्ग शिल्लक नसेल, तर भाजप लाटेच्या तडाख्यामुळे एकत्र येणाऱ्या या दोघांना आता एकमेकांसोबत राहणे हाच पर्याय शिल्लक राहिलेला असेल. ▮

## विशेष

भागा वरखडे

# 'स्थानिक' निवडणुकांचा सांगावा

राज्यात महानगरपालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका पुढील महिन्यात होणार असताना नगरपालिका आणि नगर पंचायतीच्या निवडणुकीच्या निकालाने पुढे काय होणार, याचे जणू संकेत दिले आहेत. राज्यात ज्यांची सत्ता, त्यांच्याच हाती स्थानिक स्वराज्य संस्था असे गणित आता बऱ्यापैकी रुजवण्यात राजकीय पक्ष यशस्वी झाले आहेत. केरळचा अपवाद वगळता उर्वरित राज्यांमध्ये झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतून हे सिद्ध झाले आहे. केंद्र आणि राज्याची सत्ता असणाऱ्यांकडे सत्तेची धुरा सोपविल्यास विकास कामांना पैसे कमी पडत नाही, अडवणूक केली जात नाही, हे मतदारांच्या गळी उतरवण्यात राजकीय पक्षांना यश आले आहे. मतदारांमध्ये रुजलेली ही मानसिकता दूर करण्यात विरोधकांना अपयश आले आहे. नगरपालिका, नगरपंचायत निवडणुकीच्या प्रचारादरम्यान महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी लढत होण्याची अपेक्षा केली जात असताना प्रत्यक्षात बहुतांश ठिकाणी शिवसेना (शिंदे), भाजपा आणि राष्ट्रवादी (अजित पवार) यांच्यात लढत होऊन संघर्ष झडला. एकत्र येऊन सत्तेचा फायदा घ्यायचा आणि परस्परांवर टीका करून, परस्परांविरोधात लढून विरोधकांचेही राजकीय अवकाश व्यापायाचे, ही भाजपाची रणनीती आता त्यांच्या मित्रपक्षांनीही अंगीकारली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी आपल्या पक्षांसाठी संपूर्ण राज्य पिंजून काढले. विरोधक मात्र घरातून बाहेरच पडले नाहीत.

भारतीय जनता पक्ष हा फक्त शहरी लोकांचा पक्ष आहे, हा समज या निवडणुकीच्या निकालाने पुन्हा एकदा खोडून काढला. निमशहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातही या पक्षाची पाळेमुळे रुजली आहेत. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस हे ग्रामीण भागातील पक्ष. आता ग्रामीण भागातूनही त्यांची सद्दी संपवण्यात भाजपला यश आले आहे. महायुतीला मिळालेले यश सरकारमधील तीनही पक्षांच्या प्रमुखांचे आहे. विधानसभेतील निकालाप्रमाणेच एकूण निकालाचे सूत्र आहे. विधानसभा निकालांचे प्रतिबिंब असलेल्या नगरपालिका निवडणुकांच्या निकालात भाजपा राज्यात पहिल्या क्रमांकाचा पक्ष ठरला खरा; पण त्यातून मिळालेला धडाही महत्त्वाचा आहे. अनेक नगरपालिकांमध्ये महायुतीतील भाजपा, शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) या तीन पक्षांमध्ये लढत झाली आहे. त्यामुळे हा निकाल भाजपा किंवा महायुतीतील पक्ष स्वबळावर लढल्यास निकाल कसे असतील, याची चुणूक किंवा धडा दाखवणाराही आहे. त्यातूनच भाजपाला मित्रपक्षांची गरज आहे, हे अधोरेखित झाल्याचे मानले जात आहे. निवडणुकीत इतिहास घडला, असे फडणवीस म्हणत असताना सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केलेल्या भावना पक्षाला विचारात घ्याव्या लागतील. भाजपाने नागपूर, गडचिरोली जिल्ह्यात चांगली कामगिरी केली; मात्र चंद्रपूर जिल्ह्यात काँग्रेसने भाजपला धक्का देत बाजी मारली. ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी या जिल्ह्यांमध्ये चांगली मेहनत घेतली. रायगड जिल्ह्यात शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि पुणे जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांचे वर्चस्व दिसून आले. मुक्ताईनगरमध्ये मंत्री गिरीश महाजन यांना फटका बसला. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांना रायगडने धडा शिकवला. राज्यभरात काही ठिकाणी महायुती एकत्र लढली, स्थानिक आघाड्या केल्या तर अनेक ठिकाणी महायुतीतील भाजपा, शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्यात लढत होती. महायुतीतील तीनही पक्षांनी ७५ टक्के जागा जिंकल्या. भाजपाने पहिला क्रमांक मिळविला असला, तरी सत्तेत असताना शिंदे आणि अजित पवार गटाचीही ताकद वाढली आहे. भाजपा २०२९ मध्ये स्वबळावर विधानसभा निवडणुका लढवेल, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मध्यंतरी कार्यकर्त्यांच्या बैठकीत सांगितले होते. नगरपालिकांचा निकाल अतिशय मर्यादित स्वरुपाचा आणि स्थानिक राजकारणावर आधारित असला, तरी भाजपाने पुढील काळात स्वबळाचा नारा दिला, तरी त्याला मित्रपक्षांच्या कुबड्या घ्याव्याच लागतील, असा या निकालाचा अर्थ आहे.

ताज्या निवडणुकीप्रसंगी संसाधने, पैसा, यंत्रणा आणि कार्यकर्ते अशा सर्वच बाबतीत महाविकास आघाडीपेक्षा महायुती सरस होती. महाविकास आघाडीमध्ये संवादाचा अभाव होता. राज्यात काही ठिकाणी शिंदेसेना-ठाकरे सेना, काही ठिकाणी शिंदेसेना-काँग्रेस, काही ठिकाणी भाजपाविरोधी सर्व अशा आघाड्या झाल्या. त्यातही महायुतीतील तीन पक्षांचाच फायदा झाल्याचे आकडेवारी सांगते. राज्याच्या कोकण वगळता अन्य सर्वच विभागात भाजपाने जास्त जागा मिळवल्या. शिंदे यांच्या शिवसेनेचा स्ट्राईक रेट जास्त आहे. शिवसेना आता फक्त ठाण्यापुरती मर्यादित राहिलेली नाही, तर चांद्यापासून बांद्यापर्यंत आणि धुळ्यापासून कोल्हापूरपर्यंत पसरली असल्याचे चित्र दिसले. भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे महायुतीतील तीनही पक्ष कमी-अधिक फरकाने राज्यभरात पोचले असून त्यांचे नगराध्यक्ष आणि नगरसेवक निवडून आल्याचे दिसते. नगरपालिका आणि नगर पंचायत निवडणुकीच्या निकालाने महायुतीच्या कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे, तर महाविकास आघाडीला मानसिकता बदलावी लागणार आहे.

राज्यात १५ जानेवारी रोजी २९ महापालिकांच्या आणि त्यानंतर जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात १५ जिल्हा परिषदांच्या निवडणुका होणार आहेत. त्यावर या निकालाचा परिणाम संभवतो. १५ जानेवारी रोजी होणाऱ्या बृहन्मुंबई महानगर पालिका आणि इतर २८ महानगर पालिका निवडणुकांसाठी हे निकाल जणू उपांत्य फेरी होते. महाराष्ट्रातील नगरपालिका आणि नगर पंचायतींच्या निवडणुकीत भाजपाला सर्वाधिक जागा मिळाल्या आहेत. राज्य पातळीवर युती असूनही स्थानिक पातळीवर भाजप आणि शिंदे यांच्या शिवसेना अनेक जिल्ह्यांमध्ये एकमेकांविरुद्ध लढल्या. सिंधुदुर्ग, सातारा, धाराशिव, पुणे, नाशिक, पालघर आणि ठाणे यासारख्या महत्त्वाच्या जिल्ह्यांमध्ये भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांनी एकमेकांविरुद्ध उमेदवार उभे केले, जिथे सत्ताधारी महायुतीने एकमेकांविरोधात निवडणूक लढवली, तिथे विरोधी महाविकास आघाडीत एकवाक्यता नव्हती. त्याचा महायुतीला फायदा झाला. ▮

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वेध

रेवती जोशी-अंधारे

# देव, दवा, हवा आणि पाणी!

'द ग्रेट वॉल ऑफ चायना' जगातील सात आश्चर्यांपैकी एक आणि तेही मानवनिर्मित! पण, आपल्याला निसर्गाने त्याहीपेक्षा चांगली सुरक्षा भिंत जवळपास तीन अब्ज वर्षांपूर्वीच दिली. अरावली पर्वतरांग गुजरातमधील माऊंट अबूपासून सुरू होऊन राजस्थान, हरयाणा आणि दिल्लीपर्यंत म्हणजे उत्तरेपासून पूर्वेपर्यंत सुमारे ६९० किमी पसरलेली आहे. अरावलीतील गुरू शिखर हे सर्वोच्च शिखर असून त्याची उंची सुमारे १७२२ मीटर आहे. ही जगातील सर्वात प्राचीन पर्वतरांगांपैकी एक आहे. हडप्पा संस्कृतीच्या काही वसाहती अरावलीच्या आसपास आढळतात. चित्तोडगड, कुंभलगड हे किल्ले अरावलीतच वसलेत. लूनी, बनास आणि साबरमती नद्यांचे उगमस्थान अरावलीने थारचा विस्तार वर्षानुवर्षे रोखून धरला आहे. अरावली म्हणजे पृथ्वीच्या इतिहासाचे जिवंत अवशेष, काळाच्या साक्षीने उभी असलेली भारताची सर्वात प्राचीन नैसर्गिक भिंत! भूगर्भशास्त्राच्या दृष्टीने अरावली ही प्रिकॅम्ब्रियन काळातील निर्मिती असून तिचे आजचे कमी उंचीचे स्वरूप म्हणजे कोट्यवधी वर्षांच्या नैसर्गिक क्षयाचे परिणाम आहेत. ही झीज नैसर्गिक होती; मात्र सध्याची झीज मानवनिर्मित आहे आणि ती अधिक चिंताजनक आहे. या पर्वतरांगेने उत्तर भारताला भौगोलिक ओळख तर दिलीच; सोबत हवामान संतुलनाचे कामही केले. थार वाळवंटाचा विस्तार रोखणे, पावसाच्या ढगांची दिशा बदलणे आणि अनेक नद्यांना जन्म देणे ही सर्व कामे अरावली शांतपणे करत आली. शत्रूंपासून संरक्षण करणारी ही पर्वतरांग आज मात्र स्वतःच्या संरक्षणासाठी आक्रोश करतेय.

अरावलीचे आध्यात्मिक महत्त्वही आहे. आदिवासी बांधवांसाठी हे पर्वत 'भाखर देवता' आणि 'आबू राज' म्हणून पूजनीय आहेत. अरावलीचा विनाश त्यांच्या दैवताचा अपमान आहे. अरावलीच्या लहान-मोठ्या गुहांमध्ये दुर्मिळ औषधी वनस्पती असून त्या आयुर्वेदिक उपचार पद्धतीचा मुख्य आधार आहेत. अरावली शुद्ध प्राणवायू, औषधी, पाणी आणि आध्यात्मिक साधनेच्या संधी देणारी अरावली एक परिपूर्ण नैसर्गिक रुग्णालय आहे. नैसर्गिक अनियंत्रित खणन, कल्पनेपलिकडचं शहरीकरण आणि अफाट जंगलतोड, अरावलीच्या मुळावर उठले आहेत. 'ऊस गोड लागला म्हणून मुळापासून खायचा नसतो' ही पूर्वजांची शिकवण साफ विसरून आपण अरावलीला कुरतडत आलोय. काही स्क्वेअर फुटांचा हिशोब मांडणाऱ्या यच्चयावत मानवजातीला अरावलीचा अतिविशाल व्याप, त्यातील नैसर्गिक परिसंस्था आणि त्याचा विनाश समजून घेण्याचा आवाकाच उरलेला नाही. नैसर्गिक अधिवास वेगाने कमी झाल्यामुळे वन्यजीव-मानव संघर्ष वाढतोय. राजधानीत दररोज प्रदूषणाचे नवे विक्रम तयार होत असताना अचानक पूर, दुष्काळ, कडाक्याची थंडी, धुकं किंवा जीवघेणा उकाडा अशा बदलत्या ऋतुचक्राकडे बघायलाही आम्हाला वेळ नाही. उकडतंय मग लावा एसी, हवा प्रदूषित झाली तर लावा प्युरिफायर, थंडी वाढली लावा हिटर... सुखाच्या अतर्क्य कल्पनांसोबत मानव निसर्गाच्या जिवावर उठला आहे. अरावलीचा प्रश्न केवळ पर्यावरणाचा नाही तर पुढील पिढ्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे. कायदे आहेत, न्यायालयांचे आदेश आहेत मात्र, अंमलबजावणीचा अभाव स्पष्टपणे दिसतो. संवर्धनाचे कागदी वाघ नाचवणे आम्ही कधी बंद करणार आहोत? आधीच खूप उशीर झालाय. आता निर्णय प्रत्यक्षात उतरवण्याची वेळ आली आहे.

अरावलीची झुंज निसर्गाशी नाही तर माणसाच्या अमर्याद लोभाशी आहे. काळ, वारा, पाऊस यांना समर्थपणे तोंड देणारी अरावली आज बुलडोझर, स्फोटके आणि प्रशासकीय निष्क्रियतेपुढे हतबल आहे. अरावली ही केवळ पर्वतरांग नाही; ती उत्तर भारताची हिरवी ढाल आहे. या विशाल पर्वतांच्या 'टेकड्या' होणं, हे अपयश केवळ प्रशासनाचे नाही, तर संपूर्ण व्यवस्थेचे नैतिक अपयश आहे. प्रश्न इतकाच की, आपण प्रगती करतोय की, पायाखालची जमीनच उखडतोय? कालच्या निर्णयांवर आज कृती केली नाही तर, उद्या उरणारच नाही. निसर्गाशी संघर्ष करून माणूस कधीच जिंकलेला नाही आणि यावेळीही तो जिंकणार नाहीच. अरावली ही भूतकाळाची आठवण नाही, तर भविष्याचा इशारा आहे. अन्यथा इतिहासात अरावलीचा उल्लेख 'होती एक पर्वतरांग' असा होण्यास फारसा काळ लागणार नाही. अरावली वाचवणे म्हणजे भूतकाळ जपणे नव्हे, तर भविष्य सुरक्षित करणे होय. ▮

९८५०३३९२४०

## दखल

मोरेश्वर बडगे

# ठाकरे बंधूंचा प्रीतिसंगम नव्हे, भीतिसंगम!

महाराष्ट्राच्या राजकारणात बरेच काही घडतंय. एकत्रीकरणाचे वारे फिरतेय. राजकीय पक्ष एकत्र येत आहेत. काँग्रेसला स्वबळ आठवले आहे. अनेक दिवसांपासून चर्चेत असलेल्या उबाठा शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना म्हणजेच मनसे यांच्या महापालिका निवडणूक युतीची घोषणा झाली आहे. शरद पवार आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे दोन गट पुण्यात एकत्र येत आहेत. ठाकरे बंधूंचे एकत्रीकरण हा प्रीतिसंगम आहे, असे ठाकरे सेनेचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. प्रत्यक्षात हा 'भीतिसंगम' आहे. भाजपाच्या भीतीने दोन चुलत भाऊ एकत्र आले आहेत. २०१९ मध्ये आणि नंतर सत्तेच्या राजकारणाने खूप तोडफोड पाहिली. भाजपाला सोडून उद्धव ठाकरे हे शरद पवार आणि काँग्रेसकडे जाऊन बसले. त्यांनी महाआघाडीचे सरकार बनवले. अडीच वर्षातच ते कोसळले. शिवसेना फुटली. ४० आमदारांसह बंड करून एकनाथ शिंदे यांनी सत्तेचे नवे गणित बसवले. नंतर अजितदादा पवार यांनी काकांविरुद्ध तलवार उपसली. तेही आपल्या आमदारांसह महायुतीकडे आले. अशा हवेत कित्येक वर्षांनंतर महापालिकेच्या निवडणुका लागल्या आहेत. त्या पृष्ठभूमीवर पुन्हा उलथापालथ होत आहे. तोडलेले, तुटलेले नेते पुन्हा एकत्र येत आहेत. मुंबईतले जागावाटप ठाकरे बंधू अजून जाहीर करू शकलेले नाहीत. बंडखोरी होऊ नये म्हणून अखेरच्या टप्प्यात ते जाहीर केले जाईल असे दिसते. तिकडे राष्ट्रवादीचे दोन्ही गट म्हणजे काका-पुतण्या एकत्र काम करणार म्हणत आहेत. ते 'घड्याळा'वर लढणार की 'तुतारी'वर याची उत्सुकता असेल. अजितदादा हे महायुती सरकारमध्ये भाजपासोबत असले, तरी पुण्यात भाजपाच्या विरोधात लढणार आहेत. त्याच वेळी मुंबईत भाजपासोबत त्यांची चर्चा सुरू आहे. शरद पवारांचा पक्षही अन्यत्र ठाकरे सेना आणि काँग्रेससोबत आघाडीला उत्सुक आहे. भांडून वेगळे झालेले हे पक्ष एकत्र का येत आहेत हा प्रश्न मतदारांना नक्कीच पडला असणार. त्यांना भाजपाची भीती आहे का? सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटल्याप्रमाणे भाजपाची अवस्था शनी शिंगणापूरसारखी आहे. शनी शिंगणापूरला दरवाजे सदैव उघडे असतात. निवडणुका जाहीर झाल्या असतानाही भाजपाने इनकमिंग थांबवलेले नाही. भाजपाचे तिकीट म्हणजे विजयाची गॅरंटी. त्यामुळे साऱ्यांना भाजपाचे तिकीट हवे आहे. 'एक फूल, पचास माली' अशी परिस्थिती आहे. अशा प्रकारची निवडणूक प्रथमच लोक पाहात आहेत. काय होणार?

किती वातावरण पेटवले होते विरोधकांनी? अनेक महिने मनोज जरांगे पाटील चालवले. बच्चू कडू यांना शेतकरी नेते केले. लोकसभा, विधानसभा



निवडणुकीत विरोधकांनी व्होट चोरी, ईव्हीएममधली गडबड तसेच मतदार याद्यांचा गोंधळ हे मुद्दे लावून धरले होते.

मतदार याद्यांमधला घोळ दूर झाल्याशिवाय निवडणुका होऊ देणार नाही, असे खुद्द राज ठाकरेंनी जाहीर केले होते. पण निवडणुका जाहीर होताच ठाकरे बंधू सारे विसरले आणि चूपचाप निवडणुकीच्या कामाला लागले. नुकत्याच झालेल्या नगर परिषद निवडणुकीच्या निकालांनी विरोधकांची तोंडं बंद केली. जिंकले तर लोकांनी जिंकवले आणि हरले तर निवडणूक आयोग काम करतो असे म्हणायचे. नगर परिषद निवडणुकीच्या निकालांनी विरोधकांचा दुटप्पीपणा उघडा पडला. उद्धव ठाकरे नगर परिषद निवडणूक हरले, असे म्हणायची सोय नाही. कारण ते निवडणूक लढलेच नाहीत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र पालथा घातला. विकास कामांच्या जोरावर मतं मागितली. कोमट पाणी पिऊन निवडणूक जिंकता येत नाही, हे ठाकरेंनी समजून घेतले पाहिजे. तुम्ही घराच्या बाहेरच पडणार नाही तर मग लोकांकडून कसली अपेक्षा बाळगता? 'अकेला देवेंद्र क्या करेगा?' असे सुप्रिया सुळे एकेकाळी म्हणाल्या होत्या. अकेला देवेंद्र काय काय करू शकतो ते पाच वर्षांत राज्याने पाहिले. नगर परिषद निवडणुकीची त्यांची रणनीती तर मास्टरस्ट्रोक होती. विरोधकांची जागा संपवण्याची रणनीती यशस्वीपणे राबविली गेली. महायुतीतले घटक पक्ष भांडत नव्हते, भांडल्यासारखे दाखवत होते. विरोधकांना अखेरपर्यंत हा गेम समजलाच नाही. मराठी आणि मराठी माणसाच्या मुद्यावर ठाकरे बंधू ही निवडणूक लढवणार आहे. मराठी अस्मितेच्या मुद्यासाठी आम्ही एकत्र आलो आहोत, असे ठाकरे बंधूंनी म्हटले आहे. त्यात नवे काही नाही. यांच्याकडे दुसरा मुद्दाच नाही. गेली २५ वर्षे शिवसेना मराठीचाच मुद्दा चालवत आली आहे. दिल्लीला मुंबईचे तुकडे पाडायचे आहेत, हा ठाकरे कुटुंबाचा आवडता आरोप. अगदी बाळासाहेब ठाकरे हेही हेच बोलत. 'फुटाल तर संपाल' या शब्दात यावेळी राज ठाकरे कडाडले आहेत. इतकी वर्षे ठाकरे कुटुंबाकडे मुंबईची सत्ता होती. काय केले यांनी मराठी माणसासाठी? यांच्याच काळात मराठी माणूस मुंबईबाहेर फेकला गेला. महापालिकेचे ठेके कोणाला दिले? यांचे बिझनेस पार्टनर कोण? हे तपासले तर यांचे बेगडी मराठी प्रेम लक्षात येते.

मराठीचा एवढा कळवळा आहे तर राज्यसभेवर पाठवायला यांना अमराठी माणूसच का दिसतो? ठाकरे बंधूंनी आता 'इमोशनल ब्लॅकमेलिंग' सुरू केले आहे. निवडणूक त्यांना भावनात्मक लाटेवर न्यायची आहे. हे काम ते वर्षनुवर्षे करत आले आहेत, पण आता मराठी माणूस भुलणार नाही. मुळात ठाकरे बंधू किती भावनाप्रधान आहेत? ते शुद्ध हिशोबी आहेत. ठाकरे बंधू मराठी अस्मितेसाठी नाही, तर स्वतःच्या अस्तित्वासाठी एकत्र आले आहेत. अन्यथा जे भाऊ २० वर्षे एकत्र येऊ शकले नाहीत त्यांना आज एकत्र यायची गरज वाटावी असे काय आभाळ कोसळले होते? ठाकरे शरद पवारांकडे गेले तेव्हाच 'ठाकरे ब्रँड' संपला होता. पित्याचे कडवे हिंदुत्व सोडून मुस्लिमांचे लांगूलचालन सुरू केले तेव्हा 'ठाकरे ब्रँड' संपला होता. खऱ्या अर्थाने हे दोन भावांचे मनोमिलन नाही. गड वाचवण्याची ही धडपड आहे; पण उशीर झाला. मराठी माणूस हा 'कालचा' राहिलेला नाही. आजचा मराठी माणूस शिकला आहे. नोकरीसाठी इंग्रजी शिकावे लागते हे त्याला उमगले आहे. आजचा मराठी माणूस स्वतःकडे 'हिंदू' म्हणून आधी बघतो. हिंदुत्वाला बाधा आणणाऱ्या शक्ती त्याला अजिबात पसंत नाहीत. त्यामुळे 'ठाकरे ब्रँड' म्हणून जी चर्चा चालते तो ब्रँड चालण्याची किंवा धावण्याची शक्यता दूर दूरपर्यंत नाही. उद्धव ठाकरे यांची मदार मुस्लिम मतांवर आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत त्यांना मुस्लिम मतं मिळाली. आपण 'मुस्लिम हृदयसम्राट' झालो असे त्यांना वाटते. म्हणून यावेळी उद्धव 'ममू फॉर्म्युला' चालवू पाहत आहेत. म म्हणजे मराठी आणि मु म्हणजे मुस्लिम. मुंबईत मराठी टक्का ३८ टक्के आहे आणि मुस्लिम टक्का २० ते २३ आहे. पण मुस्लिम मतांचे मोठ्या प्रमाणावर विभाजन होणार आहे. काँग्रेस तसेच एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजितदादांची राष्ट्रवादी यांना हेच काम करायचे आहे. निवडणुका चौरंगी करण्याचा भाजपाचा डाव भाजपाचा गेमप्लॅन यशस्वी झाला आहे. ठाकरे सेना आली तर एखादा खान महापौर होऊ शकतो, असे सांगून भाजप नेते अमित साटम यांनी आग लावलीच आहे. आता मुंबई महापालिका एका कुटुंबाचा व्यवसाय नाही असे भाजपाकडून सांगितले जात आहे. तुम्ही लिहून ठेवा. ठाकरे बंधूंसाठी ही निवडणूक शेवटची असेल. ▮

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## आजचे संघगीत-८४

शुक्रवार, २६ डिसेंबर २०२५

### दिशादिशांतुन कोटि मुखांतुन निनाद एकच आता

दिशादिशांतुन कोटि मुखांतुन निनाद एकच आता
अजिंक्य आमुची भारतमाता, जय जय भारतमाता ॥धृ॥

इथे जान्हवी नित्य वाहते घेउन अमृतधारा
इथे झुळझुळे मलयगिरीचा शीतल गंधित वारा
धवल हिमालय या भूमीचा जगात उन्नत माथा ॥१॥

इथे जन्मले राम दाविण्या कर्तव्याचा पंथ
कृष्ण सांगती धनंजयाला अमोल गीताग्रंथ
वेदामधुनी इथे वाहती ज्ञानसुधेच्या सरिता ॥२॥

बालशिवाही इथे न झुकवी अधमापुढती मान
प्रतापराणा रणराणीचा असे अम्हा अभिमान
इतिहासातुन इथे रंगते पुरुषार्थाची गाथा ॥३॥

मानवतेची चाड अम्हां परि दानवतेची चीड
सत्यासाठी मनी न कधिही धरू भीति वा भीड
प्राणदीप हा विझवू हासत आम्ही देशाकरिता ॥४॥

### वर्षाअखेरची गर्दी

यावर्षी नाताळ, वीकेंड, इयर एंड हे सगळे ओळीने आल्यामुळे तसेच शासनाच्या निर्णयामुळे काही सुट्या या दिवसात जाहीर केल्यामुळे शाळा, कॉलेजला सुट्या मिळाल्या आहेत. ख्रिसमस आणि नवीन वर्षाच्या सेलिब्रेशनसाठी अनेक लोक उत्सुक आहेत. विदेशात राहणारे लोक याच दिवसात मायदेशी येतात. अनेकांचे पर्यटनाचे बेत आखले जातात. त्यामुळे बस प्रवास, रेल्वे प्रवास, विमान प्रवास यात आयत्या वेळी काढलेल्या तिकिटांसाठी भरपूर भाडे आकारले जाते. तसेच पर्यटन स्थळे, जवळपासचे पिकनिक स्पॉट्स येथेही सगळे गर्दी करतात. धार्मिक स्थळी देवळात भली मोठी रांग असते तसेच भक्त निवास गच्च भरलेले दिसतात. याच दिवसात सुट्या असल्याने असे कार्यक्रम आखणे साहजिकच आहे. पण त्याच बरोबर खरोखरीच इतक्या गर्दीत लहान मुलांना किंवा ज्येष्ठांना नेऊन गैरसोय करणे कितपत योग्य आहे याचा विचार व्हावा. या सगळ्या गर्दीचा, पर्यटकांना येणाऱ्या समस्यांचा गैरफायदा घ्यायला गुन्हेगार टपून बसले असतात. डिजिटल अरेस्टचे प्रकारही वाढू शकतात. त्यामुळे अशा प्रकारचे कार्यक्रम आखताना योग्य काळजी घ्यावी. बरेचदा खिशाला परवडत नसतानाही उत्साहात लोक प्रवास करतात. पण गैरसोय झाली तर अतिरिक्त पैशाचा भार सहन करूनही निराशा पदरी पडते. या सगळ्या शक्यता घेऊनच प्रवासाला किंवा एक दिवसीय सहलीला निघावे आणि आनंद घ्यावा.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

## वाचक पत्रे

●● ●●

### शिक्षणात स्वैराचाराचा शिरकाव

महाराष्ट्र विधान मंडळाचे हिवाळी अधिवेशन नुकतेच झाले. अनेक मुद्दे चर्चिले गेलेत. या संपूर्ण चर्चेत राज्यातील शाळा, महाविद्यालयांचे विद्यार्थी व्यसनाधीनतेच्या आहारी जात असल्याची चिंता सभागृहाने व्यक्त केली. हे सत्य आहे की अनेक विद्यार्थी मद्य, मादक पदार्थ, धूम्रपानाच्या मार्गी लागले आहेत. अनेक पालकांना, शिक्षकांना याची साधी कल्पना सुद्धा नाही. हे सर्व समाज विघातक आहे, वेळीच नियंत्रण घालणे शहाणपणाचे ठरेल. मागील एक दोन महिन्यांत घडलेल्या काही घटना बघा. नांदेड जिल्ह्यातील शेकापूर शाळेतील शिक्षकाने वर्गामध्ये दारू पिऊन धिंगाणा घातला. मलकापूर येथे एका शिक्षकाने अल्पवयीन विद्यार्थिनीवर अत्याचार केला. राजगुरूनगर खेड येथे दहावीतील विद्यार्थ्याकडून वर्गमित्राचा खून करण्यात आला. नागपूर जिल्ह्यातील राष्ट्रीय मनोविकास दिव्यांग शाळेतील मुख्याध्यापकाचे शिक्षिकेसोबत लज्जास्पद वर्तन. अशाप्रकारच्या अनेक घटना समाज माध्यमावर आपण पाहिल्या. शाळा, महाविद्यालयात कर्मचाऱ्यांच्या टेबल, कपाटातून तंबाखू, सिगारेट, गुटखा, मद्य, अश्लील साहित्य, सीडीज, मेमरी कार्ड्स, मोबाईल्ससारख्या आक्षेपार्ह वस्तू आढळल्या. भांडणे, मारामारी नवीन नाही. काहींनी तर आत्महत्येपर्यंतचे पाऊल उचलले आहे. शासन वेळोवेळी कर्मचाऱ्यांकरिता मूल्यवर्धन प्रशिक्षण सुद्धा आयोजित करतात त्याचं हेच का फलित? विद्यार्थ्यांचे वर्तन सुधारण्यासाठी शाळेला प्रमाणात शिक्षा करता आली पाहिजे आणि ती पालकांनी सुद्धा मान्य करायला पाहिजे. त्याचप्रमाणे शाळा कर्मचारी यांचे आपसातील आणि विद्यार्थ्यांसोबतचे वर्तन योग्य राखण्याकरिता कठोर नियमावली आणि शिक्षा करण्याची गरज आहे. कर्मचारी, विद्यार्थी आपल्या बॅगमध्ये, कपाटात काय ठेवतात? काही आक्षेपार्ह वस्तू असतात काय? यावर सातत्याने तपासण्या, नियंत्रण कोण ठेवणार? शासनाने आणि शिक्षण व्यवस्थापनाने यावर गंभीर विचार करून पावले उचलावीत.घ्यावा. ▮

**प्रा. विलास डोईफोडे**/सावनेर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### एस. पी. प्रतिष्ठानतर्फे सामुदायिक विवाह सोहळा

**सोलापूर, दि.२५ डिसेंबर-**

एस.पी. प्रतिष्ठान व भीम युवक क्रीडा मंडळाच्या वतीने सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आला होता. यंदाचे विवाह सोहळ्याचे ८ वे वर्ष असून या सोहळ्यात या सोहळ्यात ८ जोडप्यांनी रेशीमगाठ बांधत आयुष्याला सुरवात केली. सिध्देश्वर पांडगळे यांच्या मार्गदर्शनाखाली व समीर पांडगळे यांच्या नेतृत्वाखाली हा विवाह सोहळा पार पडला. रमाबाई पाडंगळे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी पद्मश्री खा.उज्वल निकम, डॉ. सूर्यप्रकाश कोठे, प्रा. शंकर नवले, शशिकांत कांबळे, बाबुराव जमादार, माजी नगरसेवक प्रथमेश कोठे, जगन्नाथ बनसोडे, सुरेश बिद्री, शशिकांत कंची, श्रीकांत गायकवाड, संजय कोळी, बाळासाहेब नष्टी, राजकुमार पाटील, प्रणव लोंढे, जोडभावी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरज मुलाणी, डॉ. ऋत्विक जायकर, अंबदास नडगेरी, दीपक बनसोडे, संघपाल काकडे, योगेश शिंदे उपस्थित होते.



### गैबीपीर उर्दू प्राथमिक शाळेत फुड फेस्टिव्हल संपन्न

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

होटगी रोड येथील गैबीपीर उर्दू प्राथमिक शाळेत फुड फेस्टिवलचे उदघाटन ॲड. अहमदसाब सिराजअहमद बिराजदार यांच्या हस्ते करण्यात आले. या फुड फेस्टिवलच्या उपक्रमांत शाळेतील विद्यार्थ्यांनी वेगवेगळे चवीचे बनवलेल्या खाद्य पदार्थांचे विद्यार्थ्यांनी ५० स्टॉल लावण्यात आले होते. या कार्यक्रमास वाइस ऑफ मिडियाचे प्रमुख तौफिक नदाफ, समाजसेवक हाजी कासीम सय्यद, हाजी सादिकभाई पिरजादे, मौलाना मुजमिल आदी प्रमुख पाहुणे उपस्थित होते. पाहुण्याचे स्वागत शाळेचे मुख्याध्यापक अ. मजीद शेख यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षिका निलोफर शेख, तहसीन चाँदा, शबाना जमादार, अकबर मुतवल्ली, सलमा नदाफ, मसरत शेख, शब्बीर शेख, आदिनी परिश्रम केले.



### 'एसव्हीसीएस'मध्ये गणित दिनानिमित्त विद्यार्थ्यांचा सत्कार

**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर-**

एस. व्ही. सी. एस. हायस्कूल एमआयडीसी येथे थोर गणिततज्ञ श्रीनिवास रामानुजन यांची जयंती राष्ट्रीय गणित दिवस म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. सुरुवातीस मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे यांच्या हस्ते रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी उपमुख्याध्यापक धनंजय नकाते व पर्यवेक्षण संतोषकुमार तारके यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यानंतर ज्येष्ठ शिक्षिका सुलोचना विजपुरे यांनी रामानुजन यांनी गणित विषयांमध्ये मांडलेल्या संकल्पनेविषयी विस्तृत माहिती दिली. गणित संबोध स्पर्धा परीक्षेत प्रशालेतील ७० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. प्रशालेचा निकाल १००% लागला असून ४ गुणवंत विद्यार्थ्यांना शहर गणित अध्यापक मंडळाकडून सुवर्णपदक, प्रमाणपत्र व शाळेला एक सन्मानचिन्ह म्हणून ट्रॉफी देण्यात आली होती त्याचप्रमाणे श्रद्धा संस्था सोलापूर यांच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय अबॅकस व वैदिक गणित स्पर्धेत सूयश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा गणित दिनाचे औचित्य साधून मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीची
# मतमोजणी होणार विविध ७ ठिकाणी



### ईव्हीएम व मतदान साहित्य वितरण, स्ट्राँग रूम व मतमोजणी ठिकाणे निश्चित

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२५ डिसेंबर-**

सोलापूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान व १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे.

निवडणूक प्रक्रियेसाठी आवश्यक असलेले ईव्हीएम मशीन, मतदान साहित्य वितरण व स्वीकृती, मतदानानंतर ईव्हीएम मशीन सुरक्षित ठेवणे तसेच मतमोजणीची ठिकाणे निश्चित करण्यात आले आहे.

सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी व राजकीय प्रतिनिधींनी निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण, पारदर्शक व सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

त्या अनुषंगाने आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी सोलापूर महानगरपालिकेच्या अधिपत्याखाली असलेल्या इमारतींमधील खोल्या व खुल्या जागा अधिकृत केल्या आहेत.

या ठिकाणांचा वापर मतदान साहित्य वितरण व स्वीकृती, ईव्हीएम मशीनसाठी स्ट्राँग रूम तसेच मतमोजणीसाठी करण्यात येणार असल्याचे डॉ. ओंबासे यांनी यावेळी सांगितले.

**निवडणूक निर्णय अधिकारी व त्यांना नेमून दिलेल्या जबाबदाऱ्या याप्रमाणे**

**निवडणूक निर्णय अधिकारी क्र. १ भैरप्पा राजू माळी**

प्रभाग क्रमांक १, २, ३ व ४.

मतमोजणी ठिकाण : वेलणकर हॉल, दयानंद कॉलेज, सोलापूर.

ईव्हीएम स्ट्राँग रूम : वेलणकर हॉल येथील रूम नं. १ (पहिला मजला) व रूम नं. २, दयानंद कॉलेज, सोलापूर .

**निवडणूक निर्णय अधिकारी क्र. २ विजया पांगरकर**

प्रभाग क्रमांक ५, ६, ७ व १५.

मतमोजणी ठिकाण : सेंट्रल लायब्ररी बिल्डिंग, सिंहगड कॉलेज, केगाव, सोलापूर.

ईव्हीएम स्ट्राँग रूम : मॅनेजमेंट बिल्डिंग, तळमजला, सिंहगड कॉलेज, केगाव, सोलापूर.

**निवडणूक निर्णय अधिकारी क्र. ३ सचिन इथापे**

प्रभाग क्रमांक ८, ९ व १४

मतमोजणी ठिकाण : शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर

ईव्हीएम स्ट्राँग रूम : रूम नं. ४ व ५, शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर.

**निवडणूक निर्णय अधिकारी क्र. ४ अंजली मरोड**

प्रभाग क्रमांक १०, ११, १२ व १३.

मतमोजणी ठिकाण : कुचन प्रशाला कनिष्ठ महाविद्यालय इमारत, सोलापूर.

ईव्हीएम स्ट्राँग रूम : मातोश्री आशाताई अंबादास सरगम शाळा, रूम नं. ३, नर्सरी स्ट्रॉबेरी, कुचन प्रशाला, सोलापूर.

**निवडणूक निर्णय अधिकारी क्र. ५ अभिषेक देशमुख**

प्रभाग क्रमांक १६, १७, १८ व २१.

मतमोजणी ठिकाण : विलासचंद मेहता माध्यमिक प्रशाला, जुळे, सोलापूर.

ईव्हीएम स्ट्राँग रूम : विलासचंद मेहता माध्यमिक प्रशाला, तळमजला, जुळे सोलापूर.

**निवडणूक निर्णय अधिकारी क्र. ६ सदाशिव पडदुणे**

प्रभाग क्रमांक १९, २० व २५. मतमोजणी ठिकाण : नूतन मराठी विद्यालय, सोलापूर.

ईव्हीएम स्ट्राँग रूम : नर्सरी फुलपाखरू कलादालन, नूतन मराठी विद्यालय.

**निवडणूक निर्णय अधिकारी क्र. ७ जयश्री आव्हाड**

प्रभाग क्रमांक २२, २३, २४ व २६.

मतमोजणी ठिकाण : शहीद राहुल शिंदे बहुउद्देशीय सभागृह, एसआरपीएफ कॅम्प, विजापूर रोड, सोलापूर.

ईव्हीएम स्ट्राँग रूम : शहीद राहुल शिंदे बहुउद्देशीय सभागृह, एसआरपीएफ कॅम्प, विजापूर रोड, सोलापूर.

## महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्यावतीने विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान




**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२५ डिसेंबर-**

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ सोलापूरच्या वतीने विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान व जिल्हास्तरीय पुरस्कार वितरण सोहळा हॉटेल सेंटर पॉइंट येथे मोठ्या थाटात संपन्न झाला. सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते तर अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, शहर मध्येचे आ. देवेंद्र कोठे, पत्रकार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष मनीष केत, राष्ट्रवादीचे शहर प्रमुख संतोष पवार, शहाजी पवार, सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, गुरुशांत धुत्तरगावकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंग राजपूत, श्रीकांत मोरे, सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. सिद्धांत गांधी, प्रा.प्रमोद अवताडे, अक्षय खताळ, किरण मस्तानी, निसार शेख, पत्रकार भगवान परळीकर, छायाचित्रकार रामदास काटकर, वसीम आत्तार, अय्युब कागदी, विजय आवटे, श्रावणी सूर्यवंशी आदी मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले तर आभार जिल्हाध्यक्ष अभिषेक आदेप्पा यांनी मानले.



## जिजाऊ गुरुकुलच्या चार विद्यार्थ्यांची पुणे विभागीय आष्टे-डू आखाडा स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि.२५ डिसेंबर**

जिल्हास्तरीय शालेय आष्टे-डू आखाडा स्पर्धेत जिजाऊ गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. या कामगिरीवर १४ व १७ वयोगटातील प्रथम क्रमांक प्राप्त राजवर्धन पारेकर, आर्यन गाडेकर, स्वागत शेळके व प्रथमेश भजनावळे यांची पुणे येथे होणाऱ्या विभागीय आष्टे-डू आखाडा स्पर्धेसाठी निवड झाली.

या सर्व यशस्वी खेळाडूंचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संभाजी घाडगे, सचिवा वर्षाताई घाडगे, प्रशासकीय अधिकारी किशोर कदम, डायरेक्टर संदेश कदम फिजिकल कोच जे. बी. शिंदे मेजर तसेच मार्गदर्शन करणारे आयाज शेख, गणेश वडेकर, दत्ता झांबरे आदींनी अभिनंदन करून विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

**जिल्हा कामगिरी : १४ वर्षाखालील :** २७ ते ३० किलो : राजवर्धन पारेकर (प्रथम), ३१-३५ किलो : समर्थ गुंजाळ ( द्वितीय), वैभव पवार ( तृतीय). **१७ वर्षाखालील :** ३५ ते ४० किलो : आर्यन गाडेकर (प्रथम), समर्थ पवार (द्वितीय). ४१ ते ४५ किलो : स्वागत शेळके ( प्रथम) मंथन चौधरी ( द्वितीय). ४५-५० किलो : प्रथमेश भजनावळे (प्रथम).



### सोलापुरातील पूरग्रस्तांना मदत

**सोलापूर, दि.२५डिसेंबर-**

सोलापूर : उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेने सोलापूर येथे अलिकडच्या पुरामुळे बाधित झालेल्या समुदायांना आपत्तीत मदतीचा हात पुढे केला आहे. उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेने प्रभावित भागातील १ हजार कुटुंबांना रेशन किटचे वाटप केले. प्रत्येक किट एका महिन्यासाठी चार जणांच्या कुटुंबाला आधार देण्यासाठी तयार केले होते. ज्यामुळे पुनर्प्राप्ती टप्प्यात आवश्यक अन्नपदार्थांची उपलब्धता राखण्यास मदत होते. उपक्रमामुळे ४ हजारहून अधिक व्यक्तींना मदत मिळाली आणि २ डिसेंबर २०२५ रोजी हे वितरण पूर्ण झाले आहे.



## 'सहस्त्रार्जुन'च्या वतीने वार्षिक स्नेहसंमेलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५डिसेंबर-**

येथील सहस्त्रार्जुन प्रशालेच्या वतीने हुतात्मा स्मृती मंदिर येथे वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. सहस्त्रार्जुन शिक्षण संस्थेचे सचिव गजाननसा गोयल हे अध्यक्षस्थानी होते. उद्योजक सुनील मेंगजी यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी नृत्य, नाट्य, समूहगीत, देशभक्तीपर गीत सादरीकरण उपस्थितांची मने काबीज केली.

याप्रसंगी संस्थाध्यक्ष राजुसा भूमकर, ट्रस्टचे सचिव जयकुमार कोल्हापुरे, भरतकुमार शालगर, श्रीरामपवार, गणेश दामजी , संजीवसा रंगरेज, सहस्त्रार्जुन शैक्षणिक संस्थेचे सदस्य तुकाराम पवार, विद्या गोयल, गीता हबीब, राजश्री बंकापूर, मुख्याध्यापक भगवंत उमदीकर, मुख्याध्यापिकाद्वय मंजुषा माने, सविता हातवळणे आदी उपस्थित होते. शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन प्रशांती काटवे यांनी केले. धनश्री महाजन यांनी आभार मानले.

### ओलाचे हायपरसर्व्हिस सेंटर्स सुरू

**सोलापूर :** पात्र ग्राहकांना कोणत्याही अतिरिक्त खर्चाशिवाय त्याच दिवशी सेवा हमी देण्यासाठी डिझाइन केलेले समर्पित हायपरसर्व्हिस सेंटर्स लाँच करून ओलाने त्यांच्या हायपरसव्हिस उपक्रमाचा विस्तार करण्याची घोषणा केली. या विस्ताराचा एक भाग म्हणून, ओला त्यांच्या विद्यमान सेवा केंद्रांना हळूहळू हायपरसर्व्हिस सेंटर्समध्ये अपग्रेड करेल, ज्याची सुरुवात बंगळुरूपासून होईल.

**CHANGE IN NAME**

I HAVE DECLRAE THAT MY OLD NAME IS **RAISA BEGAM SARDARKHN PATHAN** HAS BEEN CHANGED TO **RAISA RAHIM PATHAN**

Resi. - 216, Shastri Nagar, Solapur

**KINDLY NOTE**

**THE SAME. (62215 Dtd.24.12.2025)**

## मुळेगाव तांडा येथे धाड; दारूच्या भट्ट्या उध्वस्त!

### सोलापूर ग्रामीण पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीच्या अनुषंगाने मुळेगांव तांडा ता. दक्षिण सोलापूर येथील ०३ अवैध हातभट्टी दारुच्या भट्ट्या उध्दवस्त करुन ०३ गुन्हे दाखल करण्यात आले असून एकूण १४ हजार ६०० लि. गुळमिश्रित रसायन व साहित्य असे एकूण ६ लाख १८ हजार ४०० रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीच्या अनुषंगाने अतुल कुलकर्णी, पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामीण यांनी सोलापूर ग्रामीण जिल्हयामध्ये अवैध दारु निर्मिती भागात छापाकारवाई करुन हातभट्टी दारुची वाहतूक होणार नाही या करीता कारवाई करणेबाबत स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जगताप यांना आदेशीत केले होते. त्याप्रमाणे दिनांक २५/१२/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे वेगवेगळे ०४ पथके तयार करुन स्वत: पोलीस निरीक्षक संजय जगताप यांचेसह स्थानिक गुन्हे शाखेकडील पथकांनी मुळेगांव तांडा येथील हातभट्टी दारु निर्मिती व विक्री होत असलेल्या ठिकाणांची माहिती काढून एकूण ०३ अवैध हातभट्टी दारु निर्मितीच्या ठिकाणी छापे मारुन हातभट्टी दारु तयार करण्याकरीता लागणारा गुळमिश्रीत रसायन साठा असा एकूण ७३ बॅरेलमधील १४,६०० लिटर गुळमिश्रित रसायन साठा मिळून आल्याने



जागीच नाश करुन कारवाई करण्यात आली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीच्या कालावधीमध्ये अवैध दारुधंदयावर कडक कारवाई करण्यात येणार असून वारंवार गुन्हे करणाऱ्या इसमांविरुध्द कडक प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.ही कामगिरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जगताप यांचे नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि विशाल वायकर, नागनाथ खुणे, विजय शिंदे, भिमगोंडा पाटील यांचेसह एकूण २४ पोलीस अंमलदार यांनी सदरची कारवाई केली आहे.

जा.क्रं.बांध १४४४/२०२५
दि. २४/१२/२०२५

**माढा नगरपंचायत, माढा**

ई-निविदा प्रसिध्दीकरण सुचना क्रं. MCMDH/ /2025

मुख्याधिकारी माढा नगरपंचायत यांचेकडून शासनाच्या महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान योजने अंतर्गत अ. क्र ०१ योजने अंतर्गत हाती घेण्यात आलेल्या विकासकामाची ई-निविदा शासनाकडील नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार-अर्हता प्राप्त निविदा धारकाकडून तांत्रिक ब-१ नमुन्यात स्पर्धात्मक निविदा ई निविदेद्वारे मागविण्यात येत आहे. सदरच्या ई निविदेमध्ये एकुण ०१ काम आहेत. निविदा फॉर्म ऑनलाईन उपलब्ध दि. २६/१२/२०२५ ते दि. ०४/०१/२०२६ पर्यंत सायं ०५ वाजेपर्यंत असुन कामाच्या किंमतीबाबत तसेच निविदा किंमत निविदा स्वीकृती अटी व शर्ती इत्यादींची माहिती http// mahatenders.gov.in या संकेस्थळावर उपलब्ध आहेत.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**माढा नगरपंचायत**

**जाहीर समन्स**

**सोलापूर येथील. मा. श्रीमती. एस. डी. मुक्कनवार, न्यायाधिश, सहकार न्यायालय, सोलापूर यांचे कोर्टात**

**श्री. मलिक सयाजी रोकडे**
रा.२२, श्रेयश हौसिंग सोसायटी, -- वादी
शिवाजी नगर, बाळे ता. उत्तर सोलापुर, जि. सोलापुर

**विरुध्द**

०१. महात्मा बसवेश्वर नागरी सहकारी पतसंस्था मर्या. सोलापूर
रा. १६, व्यंकटेशवर कॉम्पलेक्स, न्यू पाच्छा पेठ, -- प्रतिवादी
अशोक चौक सोलापूर

| अ. क्र. | सहकार केस नंबर | प्रतिवादीचे नांव नंबर व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| ०१ | ४८/२०२२ | **०२. आप्पासाहेब यशवंत नामदास** रा.तळे हिप्परगा रोड, बाकळे नगर, प्लॉट नं. बी ५९, शेळगी, सोलापुर | ४,६७,२२८/- | ०५.०१.२०२६ |

ज्याअर्थी वादी यांनी तुमच्या विरुध्द या न्यायालयामध्ये दावा दाखल केलेला आहे त्यामुळे या जाहीर समन्स/नोटीसीव्दारे आपणांस असे सूचित करण्यात येते की, आपण व्यक्तिशः अथवा योग्य रितीने अधिकार प्रदान करण्यात आलेला अधिकृत प्रतिनिधी, जो या दाव्याच्या संदर्भातील सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे देवू शकेल, असा अधिकृत प्रतिनधीमार्फत या न्यायालयामध्ये दि. ०५/०१/२०२६ रोजी सकाळी ११.00 वाजता सदरील दाव्यामधील आपल्या विरुध्द करण्यात आलेल्या मागणीच्या संदर्भात आपले म्हणणे व पुरावे दाखल करण्यासाठी हजर रहावे. वर उल्लेखिलेल्या तारखेस व वेळेवर आपण हजर न राहिल्यास सदरील दाव्याचा निकाल आपले गैरहजेरीमध्ये करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

दि. १५/११/२०२५ रोजीच्या मा. न्यायाधिश साहेब यांचे हुकूमान्वये हे जाहीर समन्स दिले असे.

**कार्यालयाचा पत्ता :-**
सहकार न्यायालय सोलापूर
सोलापूर जिल्हा महसूल कर्मचाऱ्यांची सहकारी पतसंस्थेची इमारत, पहिला मजला, जिल्हाधिकारी कार्यालयाचे आवारात, सोलापूर

**सही/-**
**(एन.एस.देवराज)**
**न्यायलयीन लिपीक**
**सहकार न्यायालय, सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### कपिल शर्मा शोमधून स्मृती मंधाना गायब



**मुंबई** : ट्रेलरमध्ये कर्णधार हरमनप्रीत कौर, जेमिमाह रॉड्रिज व शेफाली वर्मा यांसारखे प्रमुख चेहरे दिसत असले तरी, स्मृती मंधाना या कार्यक्रमात गैरहजर असल्याचे चाहत्यांच्या लगेच लक्षात आले. मंधानाच्या अनुपस्थितीचे मुख्य कारण तिच्या वैयक्तिक आयुष्याशी संबंधित असल्याचे मानले जात आहे. नेटफ्लिक्सवरील द ग्रेट इंडियन कपिल शोच्या अलीकडील प्रोमोजमधून हे निश्चित झाले आहे की, भारतीय महिला क्रिकेट संघ पाहुणा म्हणून येणार असला तरी, स्टार फलंदाज स्मृती मंधाना त्यात अनुपस्थित आहे. द ग्रेट इंडियन कपिल शोचा (हंगाम ४) आगामी भाग, शनिवार, २७ डिसेंबर, २०२५ रोजी प्रसारित होणार आहे, तो भारतीय महिला क्रिकेट संघाच्या ऐतिहासिक विश्वचषक विजयाचा उत्सव साजरा करण्यासाठी चित्रित करण्यात आला होता.



### पाच किलोमीटर धावण्याच्या स्पर्धेत साईश्वर व श्रद्धा गुंटूक यांना सुवर्ण

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर -**

स्पोर्ट्स अथोरिटी ऑफ तेलंगाणा, हैदराबाद डिस्ट्रिक्ट अ‍ॅथलेटिक असोसिएशन व उस्मानिया युनिव्हर्सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने अवेअरनेस ऑन स्पोर्ट्सवर आधारित या इंटरनॅशनल स्पर्धेत राष्ट्रीय धावपटू साईश्वर व श्रद्धा गुंटूक बंधू भगिनीनी खुल्या पुरुष गटात ५ किलोमीटर अंतरमध्ये साईश्वर व खुल्या महिला गटात श्रद्धा प्रथम क्रमांक पटकाविला. ही स्पर्धा हैदराबाद येथील सर्वात जुने असलेले उस्मानिया युनिव्हर्सिटी येथील सिंथेटीक ट्रॅकवर सकाळी पार पडली. नॅशनल आर. अ‍ॅथलेटीक फौंडेशन हैदराबादच्या वतीने साईश्वर व श्रद्धाला मेडल, ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेत १७८२ स्पर्धक सहभागी झाले होते. सोलापुरात सिंथेटीक ट्रॅक नसल्याने साईश्वर व श्रद्धा आठवड्यातून तीन दिवस विजयपुराच्या सिंथेटिक ट्रॅकवर धावण्याचा सराव करतात. दोघे गेल्या ५ ते ६ वर्षांपासून धावण्याचा सराव करतात. २०२८ मध्ये होणाऱ्या ऑलिम्पिकच्या धावण्याच्या स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करून देशासाठी पदक मिळविण्याचा ध्यास त्यांनी घेतला आहे. त्यांचे सोलापूर अ‍ॅथलेटिक्स असोसिएशनचे अध्यक्ष सुरेश पवार यांनी अभिनंदन केले. साईश्वर व श्रद्धा यांना सिनियर ऑलिम्पियन केशवराज सिंह, स्वामी विवेकानंद प्रशालेचे प्राचार्य अंबादास पांढरे, प्राचार्य चिदानंद माळी, क्रीडा प्रशिक्षक कृष्णा कोळी आदींचे मार्गदर्शन लाभत आहे.



### इंडियन मॉडेल स्कूलच्या अपुर्वा अंधारेला राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेत दोन पदके


**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

दिल्ली येथे झालेल्या शालेय राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेत इंडियन मॉडेल स्कुल स्टेट बोर्डच्या अपुर्वा अंधारे हिने १७ वर्षाखालील मुलींच्या गटात १ मीटर स्प्रिंग बोर्डमध्ये रौप्य व हायबोर्डमध्ये कांस्य पदक मिळविले. तिला प्रशिक्षक श्रीकांत शेटे व क्रीडा शिक्षक अक्षय माने यांचे मार्गदर्शन लाभले. तिचे शाळेचे संस्थापक अध्यक्ष ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका सुजाता बुट्टे व ममता बसवंती यांनी अभिनंदन केले.

# भारताच्या आडकर, माया, वैदेही, श्रीवल्ली यांचा उपांत्य फेरीत प्रवेश

## जामश्री-इलिझियम सोलापूर ओपन महिलांच्या आयटीएफ टेनिस स्पर्धा





**सोलापूर, २५ डिसेंबर-**

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना व सोलापूर जिल्हा लॉन टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या ओॲसिस, प्रिसीजन, इलिझियम-जामश्री व बालाजी अमाईन्स पुरस्कृत जामश्री -इलिझियम सोलापूर ओपन २०२५ महिलांच्या ३० हजार रकमेच्या आयटीएफ टेनिस स्पर्धेत भारताच्या वैष्णवी आडकर, माया राजेश्वरन रेवती, वैदेही चौधरी, श्रीवल्ली रश्मिका भामिदिप्ती यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून आगेकूच कायम राखली.

जिल्हा क्रीडा संकुल कुमठा नाका येथील एमएसएलटीए टेनिस सेंटर येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत मुख्य ड्रॉमध्ये दुसऱ्या फेरीत आठव्या मानांकित भारताच्या वैष्णवी आडकर हिने बेलारूसच्या पोलिना बखमुतकिनाचे आव्हान ६-१, ६-१ असे एकतर्फी मोडीत काढले. चुरशीच्या लढतीत भारताच्या युवा टेनिसपटू माया राजेश्वरन रेवती हिने रशियाच्या एना सेडीशेवाचा ४-६, ७-५, ६-३ असा तीन सेटमध्ये पराभव करून आपली विजयी मालिका कायम ठेवली. सहाव्या मानांकित भारताच्या वैदेही चौधरीने रशियाच्या मारिया कल्याकिनाचा ३-६, ६-२, ७-५ असा संघर्षपूर्ण पराभव केला. दुसऱ्या मानांकित भारताच्या श्रीवल्ली रश्मिका भामिदिप्ती हिने कझाकस्तानच्या अरुझान सगंडिकोवाचा ६-१, ६-१ असा सहज पराभव करून उपांत्यपूर्व फेरी गाठली.

काल अव्वल मानांकित खेळाडूवर सनसनाटी विजय मिळवणाऱ्या रशियाच्या मारिया गोलोविना हिने क्वालिफायर भारताच्या सोनल पाटीलचा ६-२, ६-४ असा पराभव केला. फ्रान्सच्या सेनिया इफारमोव्हाने रशियाच्या व्लादा मिन्चेवाचा ६-१, ६-२ असा तर, जपानच्या होनोका कोबायाशीने नेदरलँडच्या एम्मा व्हॅन पॉपेलचा ६-२, ६-४ असा पराभव केला. संघर्षपूर्ण लढतीत जपानच्या मिचिका ओझेकीने रशियाच्या एकतेरिना याशिनाचे आव्हान ६-७(९), ६-४, ६-४ असे मोडीत काढले.

दुहेरीत उपांत्यपूर्व फेरीत जपानच्या होनोका कोबायाशी व मिचिका ओझेकी या जोडीने जपानच्या अव्वल मानांकित मना कावामुरा व हिरोको कुवाटा यांचा ७-५, ६-२ असा पराभव करून सनसनाटी निकाल नोंदवला.

भारताच्या दुसऱ्या मानांकित वैष्णवी आडकर व अंकिता रैना यांनी रशियाच्या एना सेडीशेवा व नेदरलँडच्या एम्मा व्हॅन पॉपेलचा ६-१, ६-४ असा पराभव केला. भारताच्या चौथ्या मानांकित श्रीवल्ली रश्मिका भामिदिप्ती व वैदेही चौधरी या जोडीने थायलंडच्या लुंडा कुम्होम व तनुचापोर्न योंगमोडचा ६-३, ६-० असा पराभव करून उपांत्य फेरी गाठली.

भारताच्या झील देसाईने एलिना नेपलीच्या साथीत डेन्मार्कच्या एलेना जम शिदी व मारिया मिखाइलोवा यांचा ६-४, ६-४ असा पराभव केला.



## कठोर ट्रेनिंग हेच आपल्या यशाचे खरे गमक

### नेदरलँड्सची अव्वल मानांकित टेनिसपटू एम्मा व्हॅन पॉपेल

**सोलापूर, दि. २५ सप्टेंबर-**

कडक शिस्त, सात्विक आहार, कुटुंबीयांकडून मिळणारे सातत्यपूर्ण प्रोत्साहन आणि दररोज किमान ६ तास न थकता केलेली कठोर ट्रेनिंग हेच आपल्या यशाचे खरे गमक असल्याचे, नेदरलँड्सची अव्वल मानांकित टेनिसपटू एम्मा व्हॅन पॉपेल हिने स्पष्ट केले.

जामश्रीइलिझियम सोलापूर ओपन महिला आंतरराष्ट्रीय टेनिस स्पर्धेच्या निमित्ताने खास नेदरलँड्स येथून आलेली जागतिक क्रमवारीतील अव्वल मानांकित टेनिसपटू एम्मा व्हॅन पॉपेल सोलापूर विकास मंचच्या सत्कारानंतर बोलत होती.

सोलापूरबाबत बोलताना ती म्हणते, सोलापूरची हवा, वातावरण आणि येथील लोक अतिशय छान आहेत. ती पहिल्यांदाच भारतात आली असून, इथले आदरातिथ्य पाहून ती मनापासून भारावून गेली आहे. सोलापूरमधील शाकाहारी तसेच मांसाहारी खाद्यपदार्थ तिला फारच आवडले.

सोलापूरची थेट विमानसेवा सुरू झाल्याबद्दल समाधान व्यक्त करताना एम्मा व्हॅन पॉपेल म्हणाली, ''मी नेदरलँड्स येथून मुंबईला उतरले आणि तेथून थेट विमानाने सोलापूरला पोहोचले. त्यामुळे माझ्या प्रवासाचा मोठा वेळ वाचला आणि मला सोलापूरमध्ये सरावासाठी अधिक वेळ मिळाला.

आज तिचा सामना संपल्यानंतर तिला सोलापूरची चादर भेट देण्यात आली. विशेष बाब म्हणजे आज ख्रिसमसचा दिवस असल्याने, आपल्या देशापासून व कुटुंबापासून दूर असलेल्या परदेशात अशा प्रकारच्या आपुलकीने केलेल्या सत्कारामुळे ती भावूक झाली. ''भारत आणि सोलापूरच्या लोकांना मी माझ्या आयुष्यात कधीच विसरणार नाही,'' हे तिचे शब्द ऐकून उपस्थितांच्या मनाला विशेष समाधान वाटले. या संपूर्ण स्पर्धेच्या यशस्वी आयोजनामागे सोलापूर डिस्ट्रिक्ट लॉनटेनिस असोसिएशनचे सचिव राजीव देसाई आणि त्यांच्या संपूर्ण टीमने गेल्या १० वर्षांपासून घेतलेली अथक मेहनत मोलाची ठरली आहे. या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्पर्धेसाठी १३ देशांतील ४६ अव्वल मानांकित महिला टेनिसपटू सोलापूरात दाखल झाल्या आहेत. यावेळी सोलापूर विकास मंचचे विजय कुंदन जाधव, अ‍ॅड.दत्तात्रय अंबुरे, अर्जुन रामगिर, डॉ. दिलीप जोशी, राजेश नाईक, कार्तिक अंबुरे आदी मान्यवर उपस्थित होते.

## जिल्हा लंगडी स्पर्धेत लोहारवस्ती शाळा प्रथम



**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा, लोहारवस्ती, करजगी (ता.अक्कलकोट) शाळेने जिल्हा परिषदेच्या क्रीडा स्पर्धेत लहान गटात मुलांच्या लंगडी स्पर्थेत विजेतेपद पटकाविले.

जिल्हा परिषद,सोलापूर व पंचायत समिती शिक्षण विभाग, पंढरपूर यांच्या वतीने आयोजित ही स्पर्धा सतू कृष्णा केणी विद्यालय, अनवली येथे झाली. यशस्वी खेळाडूंना ट्रॉफी, प्रमाणपत्र देऊन पंढरपूर तालुक्याचे गटविकास अधिकारी अमोल जाधव, मुख्यालय शिक्षण विस्तार अधिकारी. गोदावरी राठोड, पंढरपूर तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी मारुती लिगाडे साहेब, शिक्षण विस्तार अधिकारी विष्णू चव्हाण साहेब, केंद्रप्रमुख हनुमंत भोसले या मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. करजगी बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी लक्कप्पा पुजारी यांनी खेळाडूंना २ हजार १०० रुपयांचे रोख बक्षीस दिले.

यशस्वी खेळाडूंचे खेळाडूंचे आणि त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक बसवराज परतबादी, इसाक नागणसुरे यांचे शिक्षणाधिकारी (प्राथ) कादर शेख, अक्कलकोट तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे, करजगी बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी लक्कप्पा पुजारी, मैंदर्गी बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी सोमशेखर स्वामी, करजगी केंद्राचे केंद्रप्रमुख श्री.मल्लिकार्जुन पाटील यांनी अभिनंदन केले. या स्पर्धेचे पंच म्हणून बाबासाहेब दराडे, गजेंद्र पवार, नागनाथ क्षीरसागर, अविनाश कदम, पांडुरंग कुंभार, राहुल बनसोडे, धनाजी जाधव, संदीप खेडकर यांनी उत्कृष्ट नियोजन करून क्रीडा स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडली.

**विजयी संघ** : वसीम मुबारक कोरबू (कॅप्टन), सुशांत सिद्धाराम पुजारी (उपकॅप्टन), आहील दस्तगीर शेरीकर, प्रवीण नरसप्पा नायकोडी, सरवर्ष श्रीशैल नायकोडी, रहिमान सादिक शेरीकर, साजीद इब्राहिम मदरी, चरण चंद्रशेखर नायकोडी, वेद पिरोजी माळी, विलास शरणप्पा नायकोडी, ऋषिकेश परशुराम संकद, प्रितम परशुराम नायकोडी, प्रमोद नरसप्पा नायकोडी, विनायक नागप्पा नायकोडी.



## अमेरिकेतील शिक्षण पद्धती विद्यार्थ्यांनी अवगत कराव्यात : डॉ. खंडागळे

### राष्ट्रसंत शाळा, विश्वभूषण विद्यालयात क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

अमेरिकेतील शिक्षण पद्धती संशोधनाच्या संधी अभ्यासातील शिस्त इत्यादी सर्व बाबी भारतीय विद्यार्थ्यांनी अवगत करून घ्याव्यात जेणेकरून भारतीय विद्यार्थी जगाच्या पटलावर कुठेही मागे राहणार नाही.भारताचे नाव निश्चितच उज्वल करतील असे विचार अमेरिकेत वैद्यकीय उच्च शिक्षण घेणाऱ्या डॉ. क्रांती खंडागळे यांनी मांडले.

त्या सदसंकल्प शिक्षण समूह सोलापूर संचलित राष्ट्रसंत प्राथमिक शाळा आणि विश्वभूषण विद्यालयात नामदेवराव (बापू) भालशंकर यांच्या ८७ व्या जयंतीनिमित्त आयोजित क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन करतेवेळी बोलत होत्या. अध्यक्षस्थानी विश्वभूषण विद्यालयाचे मुख्याध्यापक सत्यवान पाचपुडवे हे होते. सुरुवातीला डॉ. क्रांती खंडागळे यांचा अस्मिता भोसले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

डॉ. क्रांती खंडागळे यांच्या हस्ते नाणी उडवून खो-खो सामन्याचे उद्घाटन करून सामना सुरू करण्यात आला , खेळाच्या सामन्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी डॉ. क्रांती खंडागळे यांना कुतूहल पूर्वक अनेक प्रश्न विचारले. तितक्याच सहजतेने डॉ. क्रांती यांनी सर्व प्रश्नांना मनमोकळेपणाने उत्तरे दिली. त्यांनी खो-खोच्या सामन्यांमध्ये स्पर्धक म्हणून भागही घेतला. या क्रीडा सप्ताहाच्या वेळी शाळेचे मुख्याध्यापक सत्यवान पाचकुडवे, ज्येष्ठ शिक्षक मिलिंद भालशंकर, प्रविण पाटील, रामचंद्र व्हनकडे,क्रीडा शिक्षक भोजराज गायकवाड तसेच शाळेतील इतर सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# सोलापूरच्या दोन्ही संघाची विजयी सलामी

## ३९ वी किशोर-किशोरी राज्य अजिंक्यपद खो खो स्पर्धा





**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २५ डिसेंबर-**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने तसेच मुंबई खो-खो असोसिएशन व श्री समर्थ व्यायाम मंदिर, दादर यांच्या संयुक्त विद्यमाने ३९ वी किशोर व किशोरी (सब ज्युनिअर-१४ वर्षाखालील) राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ, सहकारनगर, वडाळा, मुंबई येथे दणक्यात सुरु झाली असून गुरुवारी सोलापूरच्या किशोर व किशोरी संघाने दणदणीत विजय मिळविले. किशोर गटात सोलापूरने परभणीवर २० गुणांनी मात केली. किशोरी गटात सोलापूरने रायगडवर एक डाव ३० गुणांनी दणदणीत विजय मिळविला.

**किशोर गट : ठाण्याचा जळगाववर वर्चस्वपूर्ण विजय** : किशोर गटातील सामन्यात ठाण्याने जळगाववर सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत ३९-१० असा स्पष्ट विजय मिळवला आणि एक डाव २९ गुणांनी सामना खिशात घातला. ठाणे संघाकडून साई धोंडकर (२.४५ व २.२० मि. संरक्षण), सचिन हुले (२.२० मि. संरक्षण व ६ गुण), अरुण गरेल (२.५० मि. संरक्षण व ४ गुण), अभय सावंत (३ मि. संरक्षण व २ गुण) यांनी सलग प्रभावी कामगिरी करत विजय निश्चित केला, तर जळगावकडून प्रीतम पावरा (१ मि. संरक्षण) याने एकाकी झुंज दिली.

**पुण्याची लातूरवर धडाकेबाज सरशी** : पुण्याने लातूर विरुद्ध सर्वांगीण खेळाचे दर्शन घडवत ४४-८ असा विजय नोंदवला आणि एक डाव ३६ गुणांनी सामना जिंकला. पुण्याकडून कर्तव्य गांडेकर (३ मि. संरक्षण, व २ गुण), सोहम देशमुख (३ मि. संरक्षण), ओम वाघ (३.२० मि. संरक्षण), श्रीराज तांगडे (१.५५ मि. संरक्षण व ६ गुण), वेदांत गायकवाड (नाबाद २ मि. संरक्षण व ८ गुण) यांनी आक्रमण व संरक्षणात सातत्य राखले. लातूर संघाकडून श्रीराम कदम (१ मि. संरक्षण, २ गुण) याने चांगला प्रतिकार करीत एकाकी लढत दिली.

**सांगलीचा सिंधुदुर्गवर प्रचंड फरकाने विजय** : सांगलीने सिंधुदुर्ग विरुद्ध ५४०४ असा दणदणीत विजय मिळवत एक डाव ५० गुणांनी सामन्यावर विजयी शिक्कामोर्तब केले. सांगलीकडून दक्ष जाधव (६.०५ मि. संरक्षण व ४ गुण), शुभम माने (४.४५ मि. संरक्षण व ४ गुण), समर्थ जाली (१४ गुण) यांनी उत्कृष्ट खेळ केला, तर सिंधुदुर्गकडून गौरांग मालंदकर (१ मि. संरक्षण संरक्षण) याचे एकाकी प्रयत्न अपुरे पडले.

**किशोरी गट : सांगलीची लातूरवर मात** : किशोरी गटात सांगलीने लातूर विरुद्ध ३३-१४ असा विजय मिळवत एक डाव १९ गुणांनी सामना जिंकला. मध्यंतराला सांगलीकडे २६०६ अशी आघाडी होती. सांगलीकडून वेदिका तामखडे (२.२५ मि. संरक्षण व २ गुण), श्रावणी माने (२.३० मि. संरक्षण), आराध्या पाटील (२.३० मि. संरक्षण व ८ गुण) यांनी प्रभावी खेळ केला, तर लातूरकडून सायली देशमुख (१.३० मि. संरक्षण), संस्कृती शिंदे (१.०५ मि. संरक्षण व २ गुण) यांनी झुंज दिली.

**धाराशिवचा सिंधुदुर्गवर एकतर्फी धक्का** : धाराशिवने सिंधुदुर्ग विरुद्ध ५३-१० असा एक डाव ४३ गुणांनी मोठा विजय मिळविला. धाराशिवकडून मुग्धा सातपुते (२.५० मि. संरक्षण व ६ गुण), भार्गवी बागल (२.५० मि. संरक्षण व ४ गुण), राही पाटील (१.२० मि. संरक्षण व ६ गुण), पियुषा पालमलकर (२.५० मि. संरक्षण व ४ गुण) यांनी दमदार कामगिरी केली, तर सिंधुदुर्गकडून ऋतिका परब (१ मि. संरक्षण संरक्षण) हिने एकहाती लढत दिली.

**पुण्याची जळगाववर ठसठशीत सरशी** : पुण्याने जळगाव विरुद्ध ४०-१२ असा विजय मिळवत एक डाव २८ गुणांनी बाजी मारली. पुण्याकडून सई गरड (४.१० मि. संरक्षण), सुप्रिया करे (३.२५ मि. संरक्षण व ४ गुण), प्राप्ती देशमुख (२.३० मि. संरक्षण व १० गुण), अपर्णा वर्धे (१४ गुण) यांनी चमकदार कामगिरी केली. जळगावकडून सोनाली खेनगट (१, १.२५ मि. संरक्षण) हिने चांगले योगदान दिले.

### उर्वरित सामन्यांचे संक्षिप्त निकाल

**किशोर गट** : सातारा विरुद्ध हिंगोली सातारा एक डाव २२ गुणांनी विजयी; नाशिक विरुद्ध धुळे नाशिक एक डाव ०९ गुणांनी विजयी; छत्रपती संभाजीनगर विरुद्ध नांदेड संभाजीनगर एक डाव ०२ गुणांनी विजयी;

**किशोरी गट** : नाशिक विरुद्ध बीड नाशिक एक डाव १६ गुणांनी विजयी; सातारा विरुद्ध हिंगोली सातारा एक डाव ४२ गुणांनी विजयी; ठाणे विरुद्ध परभणी ठाणे एक डाव १० गुणांनी विजयी; रत्नागिरी विरुद्ध नांदेड नांदेड ०७ गुण व ३० सेकंद राखून विजयी

# अकलूजमध्ये ७० वर्षांच्या प्रस्थापित सत्तेला भाजपाची तगडी धडक

## १० हजार मतांसह भाजपाचा 'नैतिक विजय'

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २५ डिसेंबर-**

गेल्या ७० वर्षांपासून अकलूजमधील राजकीय व्यवस्थेवर असलेल्या वर्चस्वाला यंदा भारतीय जनता पार्टीने जोरदार आव्हान दिले. अकलूज नगरपरिषदेच्या इतिहासात पहिल्यांदाच प्रस्थापित व्यवस्थेविरोधात भाजपाने 'कमळ' चिन्हावर आपले पॅनल उभे करून निकराची लढत दिली. जरी पूर्ण सत्ता मिळाली नसली, तरी मिळालेला जनादेश हा आमचा 'नैतिक विजय' असून हा प्रस्थापितांच्या पतनाचा प्रारंभ आहे, अशी भूमिका भाजपा माजी आमदार राम सातपुते यांनी मांडली.

अकलूज येथे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते. यावेळी भाजप अकलूज मंडळ अध्यक्ष सुजयसिंह माने पाटील, शहर अध्यक्ष महादेव कावळे, शैलेश कोतमिरे, नूतन नगरसेवक राहुल लोंढे, महेश शिंदे, नगरसेविका दिपाली वाघमोडे, जयश्री एकतपुरे व सर्व प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.



या निवडणुकीत भाजपाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार पूजाताई कोतमीरे यांना अकलूजच्या जनतेने सुमारे १० हजार मतांचा भरघोस कौल दिला. विजयी उमेदवाराला ५१ टक्के मते मिळाली असली, तरी एकट्या भाजपाने कोणाचीही मदत न घेता ४१ टक्क्यांहून अधिक मते मिळवून विरोधकांच्या गोटात धडकी भरवली आहे. अनेक प्रभागांमध्ये भाजपाचे उमेदवार अवघ्या २० ते ३० मतांच्या फरकाने पराभूत झाले असल्याचे मा.आ.सातपुते यांनी सांगितले. कोणतेही संस्थात्मक पाठबळ, साखर कारखाने किंवा मोठी आर्थिक रसद नसताना भाजपाचे चार सामान्य पार्श्वभूमीचे उमेदवार निवडून आले आहेत. नूतन नगरसेवक महेश शिंदे चळवळीतील कार्यकर्ता म्हणून आक्रमक विरोधी आवाज मांडणार असून दिपाली वाघमोडे या एका सामान्य रिक्षाचालकाच्या पत्नी असून त्यांनी जनतेचा विश्वास संपादन केला. राहुल लोंढे हे बौद्ध समाजातील आणि दलित चळवळीतील कार्यकर्ता, ज्यांनी सामान्यांच्या प्रश्नांसाठी लढा दिला तर जयश्रीताई एकतपुरे या माळी समाजातून निवडून आलेल्या सक्षम महिला प्रतिनिधी आहेत.

माजी आमदार सातपुते म्हणाले की, 'विरोधकांना विजयासाठी गल्लीबोळात फिरावे लागले. हा विजय म्हणजे एखादा पेशंट 'आयसीयू' मधून 'जनरल वार्ड' मध्ये शिफ्ट झाल्यासारखा आहे. त्यांची सत्ता आता खिळखिळी झाली आहे. कार्यकर्त्यांवर होणारे हल्ले आणि राऊत नगरमधील दगडफेकीसारख्या घटना खपवून घेतल्या जाणार नाहीत. संविधानाच्या मार्गाने या विकृत राजकारणाचा प्रतिकार केला जाईल. अकलूजमध्ये लवकरच भाजपाचे भव्य कार्यालय सुरू होणार असून, सर्व नगरसेवक तिथे जनतेच्या कामासाठी उपलब्ध असतील. बांधकाम परवाने किंवा जमिनींचे दाखले यासाठी अकलूजच्या जनतेला एक रुपयाही कोणाला द्यावा लागणार नाही, याची काळजी भाजपाचे चारही नगरसेवक घेतील. या लढ्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिलेल्या पाठबळाबद्दल त्यांचे आभार मानत ही केवळ निवडणुकीची सांगता नसून, अकलूजमधील नव्या पर्वाची सुरुवात आहे, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

## महत्वाचे...



### स्व. गायक मोहम्मद रफी यांच्या जयंतीनिमित्त बार्शीतील हौशी कलाकाराकडून आदरांजली

**बार्शी, दि.२५ डिसेंबर-**

स्वर्गीय गायक मोहम्मद रफी यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त बुधवारी बार्शीतील हौशी कलाकार गृप यांनी मोहम्मद रफी यांना रफीच्या गीतांचा आदरांजली पर कार्यक्रम घेतला. सदर कार्यक्रम फक्त हौशी कलाकार ग्रुप सदस्य गोविंद तापडिया यांच्या तापडिया टी सेंटर, घोडे गल्ली येथील हॉलवर पार पडला. या कार्यक्रमात मेजर अविनाश हिंगमीरे, अशोक डहाळे, गोविंद तापडिया, राहुल झोंबाडे, अजय खंडेलवाल आणि सुनिल फल्ले या सदस्यांनी तसेच सौ. सुजाता हिंगमीरे, सौ. लक्ष्मी तोरड, सौ. रुपाली पवार, सौ स्वाती डोळे, सौ. निमा कांबळे या महिला सदस्यांनी एकापेक्षा एक सरस, दर्जे दार रफी यांची लोकप्रिय, गाजलेली गीते सादर केली. बार्शीतील एक नवीन गायिका स्मिता बोरा गेस्ट कलाकार म्हणून यांनीही दोन सुंदर गीते गायली. ग्रुपमधील सर्व सदस्यांनी २-२ गीते गायली. सदर कार्यक्रमात मस्त बहारो का आशिक, ओ मेरी मेहबुबा, मेरे देश प्रेमियो, मुझे कितना प्यार तुमसे, मुझे दुनिया वाले शराबी ना समझो, डफफली वाले, छुप गये सारे नजारें, बदन पे सितारे, मांग के साथ तुम्हारा, वादा करले साजना, जनम जनम का साथ हो, मै जिंदगी का साथ निभाता, ये दिल तुम बिन लगता नहीं इत्यादी गीते गायली. गोंविंद तापडिया यांनी कार्यक्रमासाठी हॉल उपलब्ध करुन दिल्याबद्दल अशोक डहाळे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे नियोजन सुनिल फल्ले आणि गोविंद तापडिया यांनी केले होते.



### केंद्रिय मंत्री रामदास आठवले यांच्या वाढदिवसानिमित्त रुग्णांना फळे वाटप

**श्रीपूर, दि. २५ डिसेंबर-**

श्रीपूर (ता.माळिशरस) येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट चे राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांचे वाढदिवसानिमित्त डॉ. सुहास बनसोडे यांच्या श्रीसेवा रुग्णालयामध्ये आरपीआय श्रीपूर शहर शाखा यांचे वतीने रुग्णांना फळे वाटप करण्यात आली. श्रीपाद ऊर्फ भाऊसाहेब कुलकर्णी व आरपीआयचे जिल्हा संघटक तुकाराम बाबर यांच्या हस्ते फळे वाटप झाले. जिल्हा सचिव भारत आठवले,बी.टी.शिवशरण,गणेश सावंत रमेश भोसले, गौतम आठवले, भालचंद्र शिंदे पाटील, के.बी. शिखरे, राजू पाटील, समाधान साठे, पोपट आखाडे, गटू वजाळे उपस्थित होते. यावेळी डॉ. सुहास बनसोडे यांनी परिवर्तन घडवून पक्षाला मजबूत करण्याचे काम आठवले यांनी केल्याचे सांगितले. त्यामुळे आरपीआयची ताकद तळागाळा पर्यंत पोहोचली आहे.

# वैराग पोलिस ठाण्याची गुन्हेगारी नियंत्रणात मोठी झेप

## पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्याकडून कौतुक

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.२५ डिसेंबर-**

विस्तीर्ण आणि संवेदनशील असलेल्या वैराग पोलीस ठाण्याने यावर्षी सर्व प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये अत्यंत समाधानकारक कामगिरी केली आहे. विशेष म्हणजे गेल्या वर्षभरात या परिसरात दरोडा आणि जबरी चोरी यांसारखा एकही गंभीर गुन्हा दाखल झालेला नाही. पोलिसांच्या या चोख कामगिरीचे जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी कौतुक केले आहे.

वैराग पोलीस ठाण्याच्या वार्षिक निरीक्षणासाठी मंगळवारी (दि.२४) आले असता ते पत्रकारांशी बोलत होते. यावेळी त्यांनी पोलीस ठाण्यातील अद्ययावत कार्यप्रणालीची पाहणी करून समाधान व्यक्त केले.यावेळी बार्शीचे उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक सायकर, वैरागचे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वजीत जगदाळे, पोलीस उपनिरीक्षक प्रतापसिंह जाधव, शिवाजी



वैराग पोलीस ठाण्याची व्याप्ती मोठी असूनही यावर्षी येथील गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यात पोलिसांना मोठे यश आले आहे. दरोडा आणि जबरी चोरीसारखे गंभीर गुन्हे शून्य असणे, हे पोलिसांच्या अथक परिश्रमाचे फळ आहे. आम्ही आता 'ग्राम सुरक्षा यंत्रणा' अधिक मजबूत करण्यावर भर देत आहोत. तंत्रज्ञानाचा वापर वाढवून सीसीटीव्हीच्या माध्यमातून शहरावर तिसरा डोळा ठेवला जाईल, जेणेकरून गुन्हेगारांवर वचक बसेल.
**-अतुल कुलकर्णी, जिल्हा पोलीस अधीक्षक, सोलापूर**

हाळे व इतर पोलीस कर्मचारी उपस्थित होते. पोलिसांच्या सतर्कतेमुळे गेल्या वर्षभरात दरोडा, जबरी चोरी आणि इतर गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटले आहे.नवीन कार्यप्रणाली आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे, ज्यामुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेत वाढ झाली आहे. महत्त्वाच्या आणि मोठ्या चौकांमध्ये लवकरच सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येणार आहेत. संवेदनशील भागांमध्ये गस्त (पेट्रोलिंग) वाढवण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, ग्राम सुरक्षा यंत्रणेला अधिक सक्रिय करण्यात आले आहे. संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी व्हॉट्सप ग्रुप्स तयार करण्यात आले असून, याद्वारे माहितीची देवाणघेवाण केली जात आहे.




## बार्शीच्या किरण मस्तानीचा सोलापुरात पालकमंत्री गोरे यांच्या हस्ते गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि.२५ डिसेंबर -**

सोलापूर येथील महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघातर्फे समाजासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या बार्शीच्या पारलिंगी (तृतीयपंथी) किरण मस्तानी हिचा पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

स्मार्ट ॲकॅडमीचे संचालक सचिन वायकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली तृतीयपंथी किरण मस्तानी यांचे सामाजिक कार्यात मोठे योगदान आहे. यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी, संतोष पवार, राकेश टेळे व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष मनीष केत, पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे उपस्थित होते. या पुरस्काराबद्दल जिल्ह्यासह बार्शी परिसरातून किरण मस्तानी यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. विविध सामाजिक, राजकीय व पत्रकार बांधवांकडून त्यांच्या कार्याचे कौतुक केले जात आहे. हा सन्मान केवळ एका व्यक्तीचा नसून, समाजातील सर्वसामान्य घटकांच्या संघर्ष व योगदानाची पावती असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.



# सीना नदी काठच्या गावात वीजपुरवठा सुरळीत करा

## मनसेचा आंदोलनाचा इशारा; महावितरणला दिले निवेदन

**मोहोळ,दि.२५ डिसेंबर-**

सीना नदीच्या पुरामुळे खंडित झालेला विद्युत पुरवठा अद्यापही चालू करण्यात आला नाही. त्यामुळे नदीकाठच्या गावातून संताप व्यक्त होत आहे. लवकर विद्युत पुरवठा सुरळीत केला नाही तर मनसेच्या वतीने तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने शहर प्रमुख शाहू राजे देशमुख यांच्या नेतृत्वाखाली महावितरणचे अभियंता यांना निवेदन देण्यात आले. सीना नदीला मागील ३ महिन्यापूर्वी आलेल्या महापुरामुळे आष्टी, भांबेवाडी, शिरापूर यासह नदीकाठच्या १२ गावांचा विद्युत पुरवठा खंडित झाला होता. काही अपवाद वगळता अद्यापही नदीकाठची गावे अंधारात आहेत. एक तर पूराने शेतकऱ्याची शेती उध्वस्त झाली. पिके वाहून गेली इतकंच काय जमीन ही खरडून गेली. विद्युत पुरवठा सुरू असल्याशिवाय शेतकऱ्याला कोणतीही कामे करता येत नाहीत.महावितरणच्या अधिकाऱ्यांनी आता शेतकऱ्यांचा अंत पाहू नये. अन्यथा १० दिवसांत तीव्र आंदोलन करावे लागेल असा इशारा शाहूराजे देशमुख यांच्या नेतृत्वाखालीं उप आभियंता पटवेगार यांना देण्यात आला. यावेळी नागनाथ सोडगे, बबन खरात, किसन सोडगे, अभिमान खरात, गोदावरी सोडगे उपस्थित होते.

# वेळापूर-अकलूज मार्गावर झाले रस्ता रोको आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.२५ डिसेंबर-**

वेळापूर-अकलूज रस्ता अत्यंत खड्डेमय व जीर्ण झाल्याने तो कायम स्वरूपी दुरुस्त करावा तसेच माळिशरस तालुक्यातील विविध प्रमुख रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी या मागणीसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) माळिशरस तालुक्याच्या वतीने अकलूज-वेळापूर मार्गावर रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.


अकलूज येथील अशोका चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, शिवामृत ते उदयनगर, निमगाव पाटी ते यशवंतनगर अकलूज, वेळापूर-धानोरे, वेळापूर-उघडेवाडी-माळखांबी-चव्हाणवाडी, तसेच मंजूर असूनही प्रलंबित असलेला वेळापूर-निमगाव म्हेत्रे मळा-पिसेवाडी रस्ता तातडीने दुरुस्त करण्याची मागणी आंदोलकांनी केली. रिपाइं तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन झाले. यावेळी रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व वाहनचालकांना येणाऱ्या अडचणींबाबत एन. के. साळवे,



सोमनाथ भोसले, किरण धाईजे,बाळासाहेब धाईजे, सरपंच रजनीश बनसोडे, विजय बनसोडे,रणजित सरवदे, गोपाळ घार्गे,स्वप्निल सरवदे आदींनी मनोगत व्यक्त केले. एस. एम. गायकवाड, शामराव भोसले,रमेश धाईजे, दादाराजे घाडगे, संजयकाका देशपांडे, मारुती खांडेकर, गोपाळकाका घार्गे, आबा बनसोडे, बापूसो पोळके, भास्कर बनसोडे, दिलीप सरतापे, संतोष कांबळे, पोपट गेजगे, सुनील ओवाळ, दादासाहेब नामदास, शिवाजी बनसोडे, भागवत गायकवाड, अशोक बनसोडे, शरद साठे, विनायकराव माने, राजकुमार शिंदे, धनाजी धांडोरे, अजितदादा साठे, डॉ.धनंजय म्हेत्रे, राहुल सराटे, विनायक भगत, शिवाजी मोहिते, प्रदीप सरवदे, बॉबी वाघमारे, जहांगीर आतार, गौतम वाघंबरे, संतोष बनसोडे, शरद साबळे, राहुल गायकवाड, मिलिंद गायकवाड, महेश साठे, महेंद्र धांडोरे, वैभव बनसोडे, लखन साळवे, ऋतिक लोंढे, गणपत कदम, राहुल सातपुते, मनोज सुरवसे, दिलीप वाघमारे, प्रवीण साठे, दीपक भोसले, महादेव नाईकनवरे, गोपी भगत, चंद्रकांत चंदनशिव, राजू नाईक उपस्थित होते. दरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता ए. डी. पवार यांनी आंदोलकांचे निवेदन स्वीकारले. कार्यकारी अभियंता सुनीता पाटील यांनी दूरध्वनीद्वारे दोन दिवसांत बैठक घेण्याचे आश्वासन दिले. आंदोलनाची तातडीने दखल घेऊन रस्त्यांच्या कामास सुरुवात करून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अन्यथा पुढील टप्प्यात बांधकाम विभागाच्या कार्यालयाला टाळे ठोकून हालगीनाद आंदोलन करण्याचा इशारा श्री.सरतापे यांनी दिला.

## निधन वृत्त...

### बलभीम धावणे



**मंगळवेढा, दि.२५ डिसेंबर-**

मोहोळ तालुक्यातील डिकसळ येथील बलभिम शंकर धावणे (वय-८६) यांचे बुधवार दि. २४ डिसेंबर रोजी पहाटे सहाच्या सुमारास हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. डिकसळ व मंगळवेढा येथील डॉ. हणमंत धावणे यांचे ते वडिल होत.

### सविता शहा



**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

राघवेन्द्र नगर मुरारजी पेठ येथील सविता कांतीलाल शहा, आष्टीकर (वय ८०) यांचे गुरुवारी याचे दुपारी सल्लेखनापूर्वक समाधी निधन झाले. त्यांचा १२ वर्षाचा सल्लेखनाचानियम होता. त्यांचय पार्थिवार मोदी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. प्रा. सत्यजित शहा व रणजित शहा यांच्या त्या मातोश्री होत.

### माजी सर्कल अधिकारी मच्छिंद्र भालशंकर



**वैराग, दि. २५ डिसेंबर-**

महसूल विभागातील निवृत्त अधिकारी कै. मच्छिंद्र भाऊसाहेब भालशंकर यांचे निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, नातू असा परिवार आहे. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, नातू असा परिवार आहे. वैराग नगरपंचायतीचे विद्यमान नगरसेवक श्रीशैल(पप्पू) भालशंकर यांचे ते वडील होत. निवृत्तीनंतरही त्यांचा सामाजिक कामात मोठा सहभाग असायचा.

### क्रीडा शिक्षक तुळशीराम शेतसंदी



**सोलापूर, दि. २५ डिसेंबर -**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विंचूर येथील शिक्षक तुळशीराम शेतसंदी (वय ५२) यांचे गुरुवारी हृदयविकाराच्या झटक्याने आकस्मित निधन झाले. सायंकाळी त्यांच्या पार्थिवावर विंचूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी व दोन मुली असा परिवार आहे. अनेक राज्यस्तरीय खो-खो घडवित असताना त्यांनी अंत्रोळी व विंचूरमध्ये जिल्हा अजिंक्यपद खो-खो स्पर्धेचे उत्कृष्ट आयोजनही केले होते. सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे ते सदस्य होते.

# कलासाधना मंडळातर्फे वक्तृत्व स्पर्धा व कलोत्सवाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२५ डिसेंबर -**

येथील कलासाधना सांस्कृतिक मंडळातर्फे विवेकानंद जयंतीनिमित्त वक्तृत्व तसेच कलोत्सव अंतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा या स्पर्धा दि. ९, १० व ११ जानेवारीला पांडुरंग भवन व आदर्श विद्यालयात होणार असल्याची माहिती मंडळाचे श्रीकांत बडवे यांनी दिली.

यासाठी रोख रक्कम, मानचिन्ह, सहभाग प्रमाणपत्र असे पारितोषिकाचे स्वरुप आहे. वक्तृत्व स्पर्धेचे विषय व गट याप्रमाणे : **अ गट- इयत्ता १ली ते ५ वी** - १) माझी शाळा स्वच्छ शाळा सुंदर शाळा २) स्वामी विवेकानंद ३) माझे बाबा ४) माझे आवडते कार्टून ५) माझे गाव ६) माझा आवडता खेळ. **ब गट--इयत्ता ६ वी ते १० वी** - १) स्वच्छ भारतअभियान एक जनआंदोलन २) मला आवडलेले विवेकानंद ३) देशभक्त राजगुरु ४) माझ्या स्वप्नातील भारत ५) माझी आवडती कला ६) आरोग्य हीच खरी संपत्ती. **क गट--इयत्ता १२वी ते खुला गट** - १) पुरस्कारांचा बाजार की खरेच प्रोत्साहन. २) स्वा.सावरकरांची मार्सेलीस समुद्रातील ऐतिहासिक उडी ३) अखंड भारताचे प्रणेते -सरदार वल्लभभाई पटेल ४) स्पर्धा आणि संधी यात अडकलेला युवावर्ग ५) भारतीय परंपरा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन ६) शिवरायांचे सागरी आरमारी धोरण ७) वृध्दाश्रम -एक सामाजिक कलंक की काळाची गरज? ८) ए. आय. (कृत्रिम बुद्धिमत्ता) व आपला भविष्यकाळ ९) भारतीय लोकशाही समोरील आव्हाने.

यासोबतच सुंदर हस्ताक्षर,नृत्य, रांगोळी, विविध वेशभूषा याही स्पर्धा होतील. बक्षिस वाटप १५ फेब्रुवारी रोजी मा. आमदार प्रशांत परिचारक यांच्या हस्ते होईल. अध्यक्ष बडवेंसह उपाध्यक्ष प्रा. विनायक परिचारक, ज्ञानेश्वर मोरे, डॉ. कैलाश करांडे, अमरसिंह चव्हाण, अभियंता राजेंद्र माळी, रणजीत पवार, अरिहंत कोठाडिया, अक्षय बडवे, डॉ. किरण बहिरवाडे, अभिराज बडवे, प्रा. राजेंद्र मोरे, राजकुमार शहा, प्रा. मंदार परिचारक, राजकुमार आटकळे, बसवराज बिराजदार, महेश अंबिके, डॉ. बसवराज सुतार, डॉ. आनंद भिंगे, अमृतभाई शहा, अनंता नाईकनवरे, महेश देशपांडे, नारायण बडवे, मंदाकिनी देशपांडे, डॉ.मैत्रेयी केसकर, प्रतिभा यादव, आरती बोरखेडकर, वैष्णवी देशपांडे, गौरी देशपांडे, अशोक आवताडे, संतोष कुलकर्णी, अनिरुध्द बडवेपाटील, वा. गो. भाळवणकर, प्रा. सी.जी. जगताप, सारिका कोठाडिया आदी सदस्य विशेष प्रयत्नशील आहेत.



## 'ओंकार'चे चेअरमन थेट फडात; जाणून घेतल्या समस्या

**पिलीव, दि.२५ डिसेंबर-**

ओंकार साखर कारखान्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील यांनी निमगाव म (ता. माळशिरस) येथील शेतकरी सुखदेव मगर यांच्या ऊसाच्या फडात जात एकरी १०० टनाच्या पुढे उत्पन्न कसे काढले. एका ऊसाला ४७ कांड्या आहेत हे जाणुन घेत शेतकरी मगर, वाहन मालक अरूण मगर, महिला कामगारांचा सन्मान केला.

ऊसाची पाहणी करून त्यांनी सर्वांच्या समस्या जाणून घेतल्याबद्दल सर्वजण भारावुन गेले. उच्चांकी दर दिल्याबद्दल बोत्रे-पाटील यांचा शेतातच सन्मान करण्यात आला. ज्यांनी एकरी १०० टन उत्पन्न काढले त्यांच्या परिश्रामाचे कौतुक केले. उच्चांकी दर देण्यास कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार बोत्रे-पाटील यांनी केला. यावेळी मॅनेजर भिमराव वाघमोडे, शरद देवकर, शेतकरी सर्जेराव पवार, प्रकाश मगर, शांतिलाल काटकर , सुरेंद्र मगर, अशोक मगर, मल्हारी मगर ,महावीर मगर, शेखर मगर, आण्णा जाधव, सुनिल पांढरे, संतोष पाटील, तानाजी साठे, रामचंद्र पवार व तोडणी कामगार उपस्थित होते.

ऊसाच्या फडात येऊन आमची विचारपुस करून आमचा सन्मान करणारे बोत्रे-पाटील एकमेव आहेत. यापूर्वी असे कधीच घडले नाहे.
-बिभीषण कांबळे, ऊसतोड मजूर.



# ‘मराठी’ भारताची भौगोलिक, ऐतिहासिक वारसा जपणारी अभिजित भाषा : श्रीकांत मोरे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

आपली मराठी भाषा खऱ्या अर्थाने भारताची भौगोलिक, ऐतिहासिक वारसा जपणारी अभिजित भाषा आहे. त्यामुळे भाषेचे सर्व निकष जाणवतात. संत ज्ञानेश्वर महाराजांनी म्हटल्याप्रमाणे मराठी असे आमची मायबोली, अमृताची खाण, मातीचा अभिमान, स्वराज्याची शान, मायबोली माझी अशी आपली मराठी भाषा आहे, असे प्रतिपादन मनोरमा मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्रीकांत मोरे यांनी केले.

मनोरमा बँक परिवार आणि मनोरमा सोशल फाऊंडेशन संचलित मनोरमा साहित्य मंडळी, सोलापूर, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा पश्चिम (मनोरमा) सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मनोरमा एकदिवशीय साहित्य संमेलनात ते बोलत होते. व्यासपीठावर ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील, कुलगुरु डॉ.प्रकाश महानवर, अ.भा.साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा.मिलिंद जोशी, गोवा अकादमीचे अध्यक्ष अनिल सामंत, मराठी विश्वकोष मंडळाचे अध्यक्ष रवींद्र शोभणे, माजी कामगार उपायुक्त संभाजीराव काकडे, वात्रटीकाकार रामदास फुटाणे, संमेलनाचे स्वागताध्यक्षा शोभा मोरे, कार्याध्यक्षा अस्मिता गायकवाड, कार्यवाह संतोष सुरवसे, संयोजक डॉ.सुमीत मोरे, ॲड. सुरेश गायकवाड, बी.पी. रोंगे, व्यंकटेश कुलकर्णी, डॉ.चैतन्य भंडारी, डॉ.आदित्य पाटील आदींची उपस्थिती होती. महाराष्ट्र राज्याला साहित्यिक, धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा लाभला आहे.

**मनोरमा मराठी साहित्य संमेलन**

सोलापूर हे बहुभाषिक, संस्कृती व संस्कृतीचे सुंदर संगम असलेले शहर आहे. धार्मिक स्थळे व ऐतिहासिक वारसा लाभला आहे. येथे कन्नड, हिंदी, तेलुगू, उर्दू, दखनी, गुजराती यांसह अन्य भाषा बोलल्या जातात. सोलापूर हे स्वातंत्र्यपूर्व काळातील कापडासाठी भारतासह आशिया खंडात प्रसिध्द होते. सोलापूर जिल्ह्यात चालुक्य, राष्ट्रकुट, यादव, बहामनी या राजवंशाने राज्य केले होते. जिल्ह्यामध्ये सापडलेल्या शिलालेखामुळे येथील साहित्याला वेगळेपण, वैविध्य आहे, असेही ते म्हणाले.

सोलापूर जिल्ह्याला भक्ती साहित्याचीही समृध्द परंपरा लाभलेली आहे. सिध्दरामेश्वर यांचे शिवयोगी पीठ, वारकरी संप्रदायाचे केंद्र पंढरपूर, वीरशैव साहित्यामध्ये सिध्दरामेश्वरांनी ६८ हजार वचने लिहिली आहेत. संत जनाबाई, संत चोखामेळा, संत सावता माळी, संत दामाजी, संत कान्होपात्रा, संत कुर्मदास, शुभराय महाराज यांनी श्रेष्ठ दर्जाचे लेखन करून जागतिक साहित्य व्यवहारात सोलापूरच्या भाषेचे आणि साहित्याचे स्थान अधोरेखित केले आहे. पेशवाईच्या काळात शाहीर राम जोशी, स्वामी निगडीकर, श्रीधर स्वामी नाझरेकर यांचे योगदान विचारात घेण्यासारखे आहे. आधुनिक काळात कवी कुंजविहारी यांची राष्ट्रीय कविता आणि साहित्यिक लेखन यांनी सोलापूरच्या साहित्याच्या दबदबा निर्माण केला, असेही त्यांनी सांगितले.

● **साहित्य, संगीतावर प्रेम करणारा राज्यातील पहिलाच जिल्हा :** जेष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांनी राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन भरविणाऱ्या मनोरमा परिवाराचे कौतुक केले. राज्यातील मराठी शाळा चांगल्या पध्दतीने चालाव्यात, ग्रामीण भाग, वाडी-वस्तीवर पटावर शिक्षक न ठेवता कायमस्वरूपी शिक्षक ठेवावेत, अशी मागणी केली. एकही विद्यार्थी असला तरी त्या ठिकाणी शिक्षक कायमस्वरूपी नेमावा, अशी अपेक्षा त्यांनी संमेलनाद्वारे व्यक्त केली. विश्वास पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास थोडक्यात विशद केला. पाटील यांनी आजवर लिहिलेल्या काही पुस्तक, कादंबऱ्यातील आशयही यावेळी थोडक्यात मांडला. सोलापूर जिल्ह्यातील वाचक, साहित्यिकांचेही त्यांनी भरभरून कौतुक केले.

● **राज्यातील जिल्हा परिषद शाळांचा दर्जा सुधारावा :** वात्रटीकाकार रामदास फुटाणे यांनीही आपल्या काही काव्यात्मक पंक्ति सादर करीत उपस्थितांच्या टाळ्यांनी दाद मिळविली. राज्यातील अस्थिर नेत्यांच्या राजकारणावरही त्यांनी खंत व्यक्त केली. राज्यातील जिल्हा परिषद शाळांचा दर्जा सुधारणे गरजेचे असल्याचे सांगितले. कारण खासगी शाळांतील विद्यार्थी आणि शासनाच्या शाळात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांत आजही मोठी तफावत दिसून येत आहे. या शाळांतील वास्तवता त्यांनी आपल्या चारोळ्याच्या कवितांतून सादरीकरण केले. एकंदरीत, शासनाने मराठी शाळांतील मुलांकडे लक्ष दिल्यास मराठीचा भविष्यकाळही उज्वल राहील, असा आशावादही त्यांनी व्यक्त केला.

● **काव्यसंमेलनाने संमेलनाची सांगता :** मनोरमा बँक परिवार आणि मनोरमा सोशल फाऊंडेशन संचलित मनोरमा साहित्य मंडळी, सोलापूर, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा पश्चिम (मनोरमा) सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मनोरमा एकदिवशीय साहित्य संमेलन व राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार सोहळा होटगी रोडवरील पंचतारांकित हॉटेल बालाजी सरोवर येथे पार पडला. या संमेलन सोहळ्यातील प्रमुख उद्घाटन कार्यक्रमानंतर दुपारच्या सत्रात जेष्ठ साहित्यिक विश्वास पाटील, मनोरमाचे सर्व्हेसर्वा श्रीकांत मोरे यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम पार पडला आणि महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील मराठी भाषा या विषयावर परिसंवाद कार्यक्रम झाला. या परिसंवादात डॉ. राजशेखर शिंदे, महाराष्ट्र शासनाच्या मराठी विश्वकोष मंडळाचे अध्यक्ष रवींद्र शोभणे, माजी शिक्षणाधिकारी प्रदीप मोरे यांनी सहभाग नोंदविला. यानंतर काव्य संमेलन पार पडल्यानंतर पुरस्कार सोहळाही तितकाच रंजक होवून संमेलनाची सांगता झाली.

## महत्वाचे...

### एसीएस हॉस्पिटलच्यावतीने हृदयरोगाशी संबंधित जनजागृती प्रदर्शन व प्रात्यक्षिक

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

अत्याधुनिक आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञानाने सुसज्ज असलेल्या भैय्या चौक येथील एसीएस हॉस्पिटलतर्फे शनिवारी (दि. २७) सकाळी ९.३० वाजता डफरीन चौकातील आयएमए सभागृहात येथे सर्वसामान्य नागरिकांसाठी हृदयरोगाशी संबंधित जनजागृती प्रदर्शनी व थेट प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले आहे.या प्रदर्शनी आणि प्रात्यक्षिकाचे उद्धाटन प्रिसिजन कॅमशाफ्टचे व्यवस्थापकीय संचालक यतीन शहा, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष मनिष केत, तसेच आर.एम. ई. ए. चे चेअरमन नीलकंठ वाकचौरे यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी हृदयविकार तज्ञ डॉ. प्रमोद पवार, डॉ. सिद्धांत गांधी, डॉ. दीपक गायकवाड - पाटील, डॉ. राहुल कारीमुंगी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.यावेळी प्रगत हृदयविकार उपचार तंत्रज्ञान व अत्याधुनिक यंत्रसामग्री सोलापूरकरांना पाहता येणार आहे. तसेच एन्जोप्लास्टी म्हणजे नेमके काय, ती कशी केली जाते, स्टेंट कसा बसवतात, हृदयाचे छिद्र बंद करण्याची शस्त्रक्रिया कशी केली जाते, आर्टिफिशियल हार्ट म्हणजे काय, हृदयरोगावरील उपचारासाठी ए आय चा वापर कसा होतो याची माहिती नागरिकांना देण्यात येणार आहे. तसेच प्रगत उपचार पद्धतीचे थेट प्रात्यक्षिक, आंतरराष्ट्रीय दर्जाचे तंत्रज्ञान प्रत्यक्ष पाहण्याची संधी सोलापूरकरांना मिळणार आहे.सध्या हृदयरुग्ण असलेले, यापूर्वी हृदयरोगावर उपचार घेतलेले नागरिक तसेच ज्याला स्वतःच्या आणि आपल्या जिवलगांच्या हृदयाची काळजी आहे, असा प्रत्येकजण या प्रदर्शनीला भेट देऊ शकतो.सोलापूरकरांनी हृदयरोगाबाबत पडणाऱ्या प्रश्नांची सोप्या भाषेत उत्तरे मिळवण्यासाठी या जनजागृती प्रदर्शन आणि प्रात्यक्षिकांना उपस्थित रहावे, असे आवाहन डॉ. प्रमोद पवार, डॉ. सिद्धांत गांधी, डॉ. दीपक गायकवाड - पाटील, डॉ. राहुल कारीमुंगी यांनी केले आहे.

Hruday Sankalp Pvt. Ltd. एसीएस हॉस्पिटल



### प्रधानमंत्री आदर्श गाव योजनेमुळे किरनळ्ळी गावचा विकास : सरपंच संगीता भंडारे

**अक्कलकोट, दि. २५ डिसेंबर-**

अक्कलकोट तालुक्यातील मौजे किरनळ्ळी गावात प्रधानमंत्री आदर्श गाव योजना ही सन २०२१-२२ मध्ये मंजूर झाली होती. यातील आराखड्याप्रमाणे किरनळ्ळी गावात सर्व कामे ग्रामपंचायत मार्फत करण्यात आल्याची माहिती किरनळ्ळी गावच्या सरपंच संगीता भंडारे यांनी दिली. अक्कलकोट तालुक्यातील किरनळी गाव हे सोलापूर जिल्ह्यातील मराठवाड्याच्या सीमेवर आहे. किरनळ्ळी गावच्या सरपंच पदाची धुरा संगीता भंडारे यांच्याकडे आल्यानंतर त्यांनी गावच्या विकासाचा ध्यास घेतला आहे. सरपंच संगीता भंडारे यांनी किरनळी गावात विविध विकास कामे करत ग्रामस्थांना सुविधा दिल्या आहेत. गावांमध्ये मागासवर्गीय समाजाच्या स्मशानभूमीमध्ये पाणी पुरवठ्याची सोय, मिरगे प्लॉटमध्ये काँक्रिटीकरण, अंगणवाडी वॉल कंपाऊंड चे बांधकाम, अड्डीकद्दूयाजवळ काँक्रिटीकरण रस्ता करणे, आवश्यक ठिकाणी हायमास्ट दिवे बसविणे आदी कामे करण्यात आल्याची माहिती सरपंच संगीता भंडारे यांनी दिली. शासनाच्या विविध योजनांमुळे किरनळ्ळी गावातील घराघरात लाईट, पाणी, शौचालय ही व्यवस्था करण्यात आली आहे. सरपंच संगीता भंडारे यांच्या विकासाच्या दृष्टीमुळे आज किरनळी गावचे रुपडे बदलले आहे. विकास कामांमुळे ग्रामस्थांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. किरनळी गावच्या विकासासाठी ग्रामस्थांसह ग्रामपंचायत सदस्य यांचे सहकार्य लाभल्याची माहिती सरपंच संगीता भंडारे यांनी दिली. या कामास ग्रामसेवक शिवपुत्र ढोपरे ,ग्रामपंचायत सदस्य पद्माकर भंडारे, राम भंडारे,तंटामुक्त समिती अध्यक्ष हुसेनबाशा सुभेदार, माजी सरपंच अरुण भंडारे, सुभाष भंडारे, राजेंद्र कणमुसे, साहेबलाल सुभेदार, शंकर गुमते, सिद्धेश्वर सोनकांबळे, मल्लिनाथ उणदे, चंद्रकांत सोनकांबळे, शंकर उणदे, डॉक्टर शिवाजी गायकवाड, प्राध्यापक कैलास भांगे, प्राध्यापक कमलाकर सोनकांबळे आदींचे सहकार्य लाभले आहे.

## फिरण्यास गेलेल्या व्यक्तीचा दुचाकीच्या धडकेत मृत्यू

**बार्शी, दि. २५ डिसेंबर**

बार्शी-पानगाव रोडवर सौंदरे गावाजवळ आज पहाटे एका भरधाव दुचाकीने दिलेल्या धडकेत ५८ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. राजेंद्र जनार्धन जाधव (रा. सौंदरे, ता. बार्शी) असे मृत व्यक्तीचे नाव असून, याप्रकरणी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात दुचाकी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी अनंत राजेंद्र जाधव यांचे वडील राजेंद्र जाधव हे दररोजच्या प्रमाणे बुधवारी (दि. २४ डिसेंबर) पहाटे ५.३० वाजता बार्शी-पानगाव रोडने पायी फिरण्यासाठी गेले होते. पहाटे ५.४५ च्या सुमारास सौंदरे गावाजवळ समोरुन (पानगाव बाजूकडून) येणाऱ्या एका विनापरवाना व भरधाव दुचाकीने (क्र. एमएच १३ डीझेड ८२८१) त्यांना जोरदार धडक दिली. ही दुचाकी चुकीच्या बाजूने येत असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.या भीषण अपघातात राजेंद्र जाधव यांचा डावा पाय मोडून त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. अपघातानंतर दुचाकी चालक विजय रावसाहेब चव्हाण आणि त्याच्यासोबत असलेला अजय भीमराव जाधव (दोघे रा. पानगाव) यांनी जखमीला तातडीने बार्शी येथील जगदाळे मामा हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले. मात्र, डोक्याला झालेल्या गंभीर दुखापती मुळे उपचार सुरु असतानाच राजेंद्र जाधव यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी मृताचा मुलगा अनंत जाधव याने दिलेल्या फिर्यादीवरुन दुचाकीचालक विजय रावसाहेब चव्हाण याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

## ‘सहकार महर्षि’चा ग्रीन वर्ल्ड को-प्राईड पुरस्काराने सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज,दि.२५ डिसेंबर-**



सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखाना लि., शंकरनगर-अकलूज या कारखान्याने ऊस उत्पादक सभासदांच्या आर्थिक हिताचे रक्षण करताना, ऊसाला दिलेला यथोचित व स्पर्धात्मक दर, कारखान्याचे सुयोग्य प्रशासन व पारदर्शकता, साखर उत्पादनातील तांत्रिक गुणवत्ता, उत्पादन खर्च बचत आणि कारखाना व्यवस्थापनातील विश्वासार्हता यांचा उत्तम संगम व समन्वय साधल्याने जागतिक सहकार वर्षानिमित्त कारखाना सहकार क्षेत्रात उत्कृष्ट योगदानाबद्दल ग्रीन वर्ल्ड पब्लिकेशन व कॉसमॉस को-ऑप बँक लि., यांच्या संयुक्त विद्यमाने कारखान्यास रविवार दि. २१ डिसेंबर २०२५ रोजी ग्रीन वर्ल्ड को प्राईड २०२५ पुरस्काराने गौरविण्यात आले.

सहकार महर्षि कै.शंकरराव मोहिते-पाटील उर्फ काकासाहेब यांनी सन १९६० मध्ये या सहकारी साखर कारखान्याची उभारणी करून माळिशरस तालुक्याचे नंदनवन केले तसेच याबरोबर विविध सहकारी संस्थांची व उद्योगांची उभारणी केलेली आहे. यामुळे कारखाना कार्यक्षेत्रात शेतकरी सभासदांचे आर्थिक जीवनमान उंचावले आहे. या उद्योग समूहा मुळे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती झालेली आहे त्यामुळे कुटुंबांना आर्थिक हातभार लावण्यास मदत झालेली आहे. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व कारखान्याचे चेअरमन साहेब मा.श्री.जयसिंह मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली सदरचा कारखाना प्रगतीपथावर वाटचाल करीत आहे. कारखान्याच्या संचालिका मा.कु. स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील यांच्या संकल्पनेतून सहकारी कारखाना व संलग्न असणाऱ्या सर्व संस्थांमधून सर्व घटकांना सोयी, सवलती व सेवा सुविधा देण्याचा प्रयत्न अविरतपणे करून सामाजिक बांधिलकी जोपासली जात आहे. तसेच विविध उपक्रमाचेही आयोजन करण्यात येत आहे. सहकार महर्षि कारखान्याने सहकाराच्या माध्यमातून ३३ मे.वॅट सहवीज निर्मिती प्रकल्प (वीज उत्पादन), प्रेसमड व बायो फर्टीलायझर, डिस्टिलरी, ईएनए, इथेनॉल, ॲसेटीक ॲसिड, बायोगॅस या उत्पादन प्रकल्पांची यशस्वीपणे उभारणी करून सर्व प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित केले आहेत याचे सहकारामध्ये शाश्वत विकासाचे रोल मॉडेल निर्माण केले आहे.

सहकार मूल्यांवर आधारित या प्रगत, पारदर्शक आणि समाजाभिमुख कारखाना व्यवस्थापनाच्या गुणांचा अभ्यास करून राज्यातील नामवंत सहकारी साखर कारखाना म्हणून कारखान्यास सदरचा पुरस्कार कॉसमॉस बँकेच्या सहकार सभागृहात महाराष्ट्र राज्यातील विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत पार पडला. सदरचा पुरस्कार कारखान्यास महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री मा.बाबासाहेब पाटील, राज्याचे साखर आयुक्त मा. विजय कोलते साहेब व महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई प्रशासकविद्याधर अनास्करसो. व कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक लि, अध्यक्ष ॲड. प्रल्हाद कोकरे यांचे शुभहस्ते प्रदान करण्यात आला. कारखान्याच्या वतीने व्हाईस चेअरमन मा.श्री.शंकरराव रामचंद्र (आबासाहेब) माने-देशमुख व सेक्रेटरी अनिल काटे यांनी उपस्थित राहून तो स्वीकारला. या ८पुरस्काराने कारखान्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला असून संचालक मंडळ व्यवस्थापनावरील विश्वास सार्थ झाला आहे. कारखान्यास पुरस्कार प्राप्त झाल्याने सर्व सभासद शेतकरी, अधिकारी, कामगार यांच्यामध्ये आनंदाचे वातावरण आहे.

## प्लिंथ इंटिमेशन आता सक्तीचे; नियमभंग केल्यास दंडात्मक कारवाई

### आयुक्त डॉ. ओम्बासे यांचा महत्त्वपूर्ण निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

सामासिक अंतरातील अनधिकृत बांधकामास आळा घालण्यासाठी प्लिंथ इंटिमेशन सक्तीचे करण्यात आले आहे. नियमभंग केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. सोलापूर महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या दि. १ डिसेंबर २०२१ रोजीच्या आदेशानुसार सोलापूर महानगरपालिकेत युडीसीपीआर नियमावलीनुसार संगणकीय प्रणालीद्वारे बांधकाम परवानगी विविध विकास परवाने प्रस्ताव संबंधित मिळकतधारकांच्या कागदपत्रांच्या आधारे नोंदणीकृत लायसन्स इंजिनीअर/आर्किटेक्ट यांच्यामार्फत सादर केले जात आहेत. हा प्रस्ताव सादर करताना नोंदणीकृत लायसन्स इंजिनीअर/आर्किटेक्ट यांच्याकडून "' APPENDIX ‘B’ – Form for Supervision स्वाक्षरीसह सादर करण्यात येतो. या प्रस्तावांची छाननी करून नगर रचना विभागाकडून मंजुरी देण्यात येते. मंजूर नकाशानुसार जागेवर बांधकाम करताना आवश्यक सामासिक अंतर (Setback) राखणे बंधनकारक आहे.मात्र, अलीकडील काळात मंजूर नकाशाप्रमाणे सामासिक अंतर न ठेवता



त्या जागेत वाढीव बांधकाम केल्याचे प्रकार निदर्शनास येत असून, त्यामुळे अनियमित व अनधिकृत बांधकामासंदर्भातील तक्रारींमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. या प्रकारांना आळा घालण्यासाठी आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ११ जुलै २०२५ रोजी परिपत्रक जारी करून कार्यपद्धती निश्चित करण्यात आली होती.

तथापि, प्लिंथ इंटिमेशनबाबतची कार्यवाही अधिक प्रभावीपणे अंमलात आणण्याच्या दृष्टीने सदर परिपत्रकात सुधारणा करण्यात आली आहे. यानुसार, नगर रचना विभागाकडून मंजुरी देण्यात येणाऱ्या प्रत्येक प्रकरणात UDCPR नियम २.८.४ नुसार Appendix-F नमुन्यात प्लिंथ इंटिमेशन देणे बंधनकारक करण्यात आले आहे. प्लिंथ इंटिमेशन ही Architect / Licensed Engineer / Supervisor यांच्याकडून प्रमाणित करण्यात येणार असून, मंजूर नकाशानुसारच प्रत्यक्ष बांधकाम होत असल्याची खात्री यामध्ये दिली जाणार आहे.

प्लिंथ इंटिमेशन सादर करताना संबंधित नोंदणीकृत लायसन्स इंजिनीअर/आर्किटेक्ट यांनी - फोटोसह पोर्टलवर ऑनलाईन प्रमाणित माहिती सादर करणे आवश्यक राहील. जे नोंदणीकृत लायसन्स इंजिनीअर/आर्किटेक्ट या कार्यवाहीचे पालन करणार नाहीत, त्यांच्याविरुद्ध संबंधित कनिष्ठ अभियंता यांच्याकडून नोटीस बजावण्यात येईल. नोटीशीद्वारे खुलासा मागवून त्यांना सुनावणीची संधी देण्यात येणार असून, हा खुलासा समाधानकारक नसल्यास संबंधितांवर ऑनलाईन दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.या निर्णयामुळे सामासिक अंतरातील अनधिकृत बांधकामास आळा बसून, मंजूर नकाशानुसार शिस्तबद्ध बांधकाम होण्यास मदत होणार असल्याचे सोलापूर महानगरपालिकेच्या नगर रचना विभागाने स्पष्ट केले आहे.

**निश्चित केलेली दंडात्मक कारवाई याप्रमाणे**

५०० चौ.मी. पर्यंत क्षेत्रफळाच्या बांधकामासाठी पहिला टप्पा ५ हजार रुपये, दुसरा टप्पा २५ हजार रुपये व तिसरा टप्पा १ लाख रुपये. ५०० चौ.मी. पेक्षा अधिक क्षेत्रफळाच्या बांधकामासाठी पहिला टप्पा १० हजार रुपये, दुसरा टप्पा ५० हजार रुपये व तिसरा टप्पा २ लाख रुपये. चौथ्या वेळेस संबंधित इंजिनिअर/आर्किटेक्ट यांची नोंद ६ महिन्यांसाठी निलंबित करण्यात येऊन बीपीएमएस प्रणालीवर नोंद “Hold” करण्यात येईल. पाचव्यांदा इंजिनिअर/आर्किटेक्ट यांची नोंदणी पाच वर्षे कालावधी करिता निलंबित केली जाईल.

## बार्शीत रिक्षाचालकावर कोयत्याने जीवघेणा हल्ला

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २५ डिसेंबर**

शहरातील लहुजी चौक परिसरात मंगळवारी पहाटे सहा वाजण्याच्या सुमारास कोयता हातात घेऊन दहशत माजवणाऱ्या इसमामुळे एकच खळबळ उडाली. विनाकारण शिवीगाळ करत एका रिक्षाचालक तरुणावर जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न करण्यात आला. नागरिकांच्या प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला असून आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

आदित्य नारायण जाधव (वय २३, रा. लहुजी चौक, बार्शी) हे पहाटे घरी असताना एक अनोळखी इसम हातात धारदार लोखंडी कोयता घेऊन त्यांच्या घरासमोर आला. कोणतेही कारण नसताना तो जोरजोरात अश्लील शिवीगाळ करत दहशत निर्माण करु लागला. आरडाओरड ऐकून परिसरातील रोहित तेलंग, अभिजित लोंढे, योगेश लोंढे तसेच इतर नागरिक घटनास्थळी जमा झाले. यावेळी आदित्य जाधव यांनी त्या इसमाला शिवीगाळ करण्याबाबत जाब विचारला असता, संतप्त झालेल्या आरोपीने कोयता उगारत आदित्य व जमावाच्या दिशेने धाव घेतली व सर्वांना जीवे मारण्याची धमकी दिली. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे लक्षात येताच नागरिकांनी आरोपीला रोखण्याचा प्रयत्न केला. आरोपी ऐकण्याच्या मनःस्थितीत नसल्याने त्याच्या हातातील कोयता हिसकावून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी झालेल्या झटापटीत कोयत्याची धार लागून आदित्य जाधव यांच्या पाठीच्या उजव्या बाजूला, कमरेजवळ गंभीर जखम झाली, तसेच भिंतीला लागून त्यांच्या उजव्या हाताच्या मनगटालाही दुखापत झाली. नागरिकांनी तत्काळ सतर्कता दाखवत आरोपीला पकडून ठेवले. बार्शी शहर पोलीस काही मिनिटांत घटनास्थळी दाखल झाले व आरोपीला ताब्यात घेतले. चौकशीत आरोपीने आपले नाव लहु सोमनाथ फोपले (वय ४०, रा. निजाम जवळा, ता. परांडा, जि. धाराशिव) असे सांगितले. आरोपी लहु फोपले याच्याविरुद्ध विनाकारण शिवीगाळ, धारदार शस्त्रासह अंगावर धावून जाणे व जीवे मारण्याची धमकी या कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## विज्ञान प्रदर्शनात कृष्णा चौगुलेची सुवर्णभरारी

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, २५ डिसेंबर :** शिक्षण विभाग, पंचायत समिती लातूर व श्री गोदावरीदेवी लाहोटी कन्या शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५३ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन दि. २३ व २४ डिसेंबर रोजी उत्साहात पार पडले.

या प्रदर्शनात स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालय, लातूर येथील इयत्ता सातवीतील चि. कृष्णा सोमनाथ चौगुले याने दिव्यांग गटातून प्रथम क्रमांक मिळवत आपल्या गुणवत्ता व जिद्दीचा ठसा उमटविण्याचे कार्य केलेले आहे. कृष्णा याने जलविद्युत प्रकल्प या विषयावर सादर केलेला प्रयोग सर्वांचे लक्ष वेधून घेणारा ठरला.

पाण्याच्या ऊर्जेपासून वीज निर्मिती कशी करता येते, हे त्याने सोपी, शास्त्रीय व प्रात्यक्षिक पद्धतीने मांडले. त्याच्या कल्पक सादरीकरणामुळे परीक्षकांनी विशेष प्रशंसा केली. या यशामागे मार्गदर्शक शिक्षिका शितल वाडीकर यांचे मार्गदर्शन लाभले.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी सूर्यवंशी, माधव गीते, सोनाली पाटील, शुभांगी बेरुळे, ज्योती मठपती, सर्व शिक्षकवृंद व पालकांनी कृष्णा चौगुले याचे अभिनंदन करून जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला.



# यशस्वीतेचे कोणतेही मोजमाप नसते : देशमुख

## श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे थाटात उद्घाटन

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, २५ डिसेंबर :** मानवी जीवनात यशस्वीतेचे कोणतेही मोजमाप नसते. तसेच कुठल्याही चांगल्या कामाला उशीर झालेला नसतो, असे प्रतिपादन माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी केले.

लातूर येथील अभिनव मानव विकास संस्थाद्वारा संचालित श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उदघाटन गुरुवारी दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून आपले विचार व्यक्त करत होते. याप्रसंगी व्यासपीठावर अभिनव मानव विकास संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, उपाध्यक्ष प्रकाश कासट, विवेक रेड्डी, शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर, कोषाध्यक्ष जयेश बजाज, सहसचिव सूर्यप्रकाश धूत, सुभाष कासले, संचालक हुकूमचंद कलंत्री, शांतीलाल कुचेरिया, मुख्याध्यापक रमाकांत स्वामी आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती प्रतिमेचे पूजन करण्यात आले. हे वर्ष माजी मंत्री




दिलीपराव देशमुख यांचे अमृत महोत्सवी वर्ष आहे. त्यानिमित्त संस्थेच्या वतीने त्यांचा ताम्रपटावरील सन्मानचिन्ह, हिराबाई बडोदेकरांवरील पुस्तक, विद्यालयातील विद्यार्थ्याने रेखाटलेले त्यांचे छायाचित्र देऊन सन्मान करण्यात आला.

दयानंद सभागृहात आपण आतापर्यंत अनेक कार्यक्रमांना अध्यक्ष, प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती लावली असली तरी आजच्या या कार्यक्रमाची अनुभूती अतिशय वेगळी आहे, असे सांगून दिलीपराव देशमुख म्हणाले की, श्रीकिशन सोमाणी विद्यालयाचा चढता आलेख सर्वांनाच प्रेरणा देऊन जाणारा आहे. या विद्यालयात विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासोबतच त्यांच्या सुप्त कलागुणांना जो वाव दिला जातो, तो विद्यार्थ्यांना यशस्वी करण्याबरोबरच एक चांगले नागरिक बनविण्यासाठी अतिशय उपयुक्त आहे. आजचे युग माहितीचे युग आहे. एका क्लिकवर जगातील सगळी माहिती उपलब्ध होते. पण कोणत्याही गोष्टीसाठी सामान्य ज्ञान, कॉमन सेन्स अतिशय आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. ज्याप्रमाणे विमानाचे टेक ऑफ आणि लँडिंग एखादा सफल पायलट व्यवस्थितरीत्या करत असतो, त्याप्रमाणे विद्यालयाच्या मुख्याध्यापकांचीही जबाबदारी असते. संस्था चालकांनी कितीही सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या तरी मुख्याध्यापकांकडून त्या कशा प्रकारे कार्यान्वित केल्या जातात ते खूपच महत्वाचे असते. जन्माला आलेल्या प्रत्येकाला कधी ना कधी हे जग सोडून जायचे आहे. जाताना आपण काय सोडून जातोय,? याचे भान प्रत्येकाला असणे गरजेचे आहे. आपल्या पाठीमागे सुसंस्कृत समाज सोडता आला पाहिजे, या दृष्टीने प्रयत्न व्हायला हवेत. या पृथ्वीतलावर आपण केवळ प्रवासी म्हणून आलो आहोत. जाताना पृथ्वीची कचरा कुंडी करू नका, असा मोलाचा सल्ला त्यांनी यावेळी दिला. संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा यांनी स्वागतपर मनोगतात दिलीपराव देशमुख हे सिद्धहस्त व्यक्तिमत्वाचे धनी असल्याचे सांगितले. त्यांच्या परीस स्पर्शाने संस्थेचे सोने झाल्याचे गौरवपर उदगार त्यांनी काढले.

संस्थेच्या भावी उपक्रमांची माहितीही त्यांनी दिली. शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर यांनी दिलीपराव देशमुख हे अनेकदा काहीही न बोलता खूप काही बोलून जातात असे मत व्यक्त करून लातूरच्या जडणघडणीत अनेकांचा हातभार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांनी केले. सूत्रसंचालन चक्षुपाल कांबळे यांनी तर आभार प्रदर्शन सचिव कमलकिशोर अग्रवाल यांनी केले.

याप्रसंगी आबासाहेब पाटील सेलूकर, संभाजी सूळ, लक्ष्मण मोरे यांच्यासह पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या विविध कलागुणांचे उत्कृष्ट प्रदर्शन करून उपस्थितांची मने जिंकली.



## आ. देशमुखांचा नागरिकांशी संवाद

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, २५ डिसेंबर :** गुरुवार दि. २५ डिसेंबर २०२५ राज्याचे माजी मंत्री तथा आ. अमित देशमुख यांनी गुरुवार दि. २५ डिसेंबर रोजी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेले विविध संस्था तसेच संघटनाचे पदाधिकारी, काँग्रेस पक्ष पदाधिकारी, नागरिक, महिला भगिनी यांच्या भेटी घेत त्यांच्याशी संवाद साधला, त्यांच्या अडीअडचणी समस्या समजून घेतल्या तसेच त्यांची निवेदने व निमंत्रनाचा स्वीकार करून संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या.

यासोबतच आगामी स्थानिक स्वराज्य संस्था, लातूर शहर महानगर पालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ अनुषंगाने काँग्रेस पक्षाचे इच्छुक उमेदवार, पदाधिकारी यांच्याशी निवडणुक संदर्भाने सविस्तर चर्चा केली. यावेळी ट्वेंटीवन शुगरचे व्हा.विजय देशमुख, लातूर शहर महानगरपालिकेचे माजी उपमहापौर कैलास कांबळे, राष्ट्रीय समाज पक्षाचे लातूर जिल्हाध्यक्ष दादा करपे, वेंकटेश पुरी, ओमकार मुळे, प्रा. शिवाजी शिंदे, सागर हुलपले, आकाश भगत, रेखाताई पुट्टेवाड, आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक, महिला भगिनी उपस्थित होत्या.

# विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करा

**अभाविपची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी । अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा**



**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, २५ डिसेंबर :** जिल्ह्यातील तसेच मराठवाडा विभागातील विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या विविध शैक्षणिक समस्यांबाबत अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले. शिक्षण प्रक्रियेमधील अडथळे, परीक्षा व निकालातील त्रुटी, शिष्यवृत्ती, वसतिगृह, आरोग्य शिक्षण आणि तांत्रिक शिक्षणातील अडचणी तातडीने दूर करून विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

अभाविपने मांडलेल्या मागण्यांमध्ये अतिवृष्टीग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे स्पर्धा परीक्षा शुल्क माफ करणे व शुल्कात कपात, मुलींच्या मोफत शिक्षण योजनेची सर्वत्र प्रभावी अंमलबजावणी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातील प्रवेश, परीक्षा आणि निकाल व्यवस्थेतील उणिवा दूर करणे, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातील रिक्त प्राध्यापक पदे तातडीने भरणे, स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठातील प्रलंबित भरती पूर्ण करणे या महत्त्वाच्या मुद्द्यांचा समावेश आहे.

तसेच महाविद्यालयांमध्ये डिजिटल सुविधांचा अभाव दूर करून अत्याधुनिक साधनसामग्री उपलब्ध करणे, प्रलंबित शिष्यवृत्ती तत्काळ विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करणे, शासकीय वसतिगृहांचे नूतनीकरण करण्याबरोबरच खप- ंशिपी व ठशीळवशपीं ऊेल- ीाी यांचा स्टायपेंड वाढविणे, आयटीआय विद्यार्थ्यांना वेळेत भत्ता देणे व प्रात्यक्षिकांसाठी आवश्यक उपकरणे उपलब्ध करून देणे, नर्सिंग विद्यार्थ्यांना रोजगारात समान संधी देणे, चऋडण उदगीर येथील प्रलंबित भरती पूर्ण करणे तसेच लातूर शहरातील ट्युशन परिसरात वाढत असलेल्या अमली पदार्थांच्या वापरावर आणि अनधिकृत बांधकामांवर कठोर कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या या सर्व मागण्यांवर तातडीने कारवाई करण्यात यावी, अन्यथा विद्यार्थ्यांच्या तीव्र रोषास प्रशासनाने सामोरे जावे लागेल, असा इशाराही अभाविपने दिला.

यावेळी उपस्थित महानगर सहमंत्री प्रतीक बारबोले, शुभम क्षीरसागर, पूर्व नगर मंत्री दीपक यादव, प्रथमेश कस्तुरे यांच्यासह अभाविपचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# भाजपाच्या विचारावर विश्वास ठेवत नगरसेवकांचा प्रवेश : आ. निलंगेकर

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, २५ डिसेंबर :** काँग्रेसचे नगरसेवक रविशंकर जाधव व पुनित पाटील यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकासाभिमुख व कल्याणकारी कार्यावर विश्वास ठेवत भाजपात प्रवेश घेतला. विकासाला पाठबळ देण्यासाठी भविष्यातही अनेकजण पक्षात येण्यास इच्छुक असल्याचे मत लातूर शहर निवडणूक प्रमुख माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी यावेळी व्यक्त केले.

गुरुवारी (दि. २५) आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, आ.अभिमन्यू पवार, आ.रमेशअप्पा कराड, ग्रामीण जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील, शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय जनता पक्षात प्रवेशाचा हा कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन




करताना आ. निलंगेकर बोलत होते. आ. संभाजीराव पाटील म्हणाले, मागील. ११ वर्षात देशात व राज्यात होत असलेली विकासकामे जनतेने पाहिली आहेत. भाजपाच्या विचारावरील सरकार देशात असून या पक्षात देशहिताला प्राधान्य दिले जाते. या काळात देशाची विकासाच्या मार्गावर घोडदौड सुरू आहे. त्यामुळे इतर पक्षात नेते व कार्यकर्त्यांनाही आता भवितव्य राहिलेले नाही. यामुळेच भाजपात येणाऱ्यांची संख्या वाढली असल्याचे आ.निलंगेकर म्हणाले.

रविशंकर जाधव व पुनीत पाटील यांच्या समवेत यांच्यासोबत सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत सोळुंके, स्वस्त धान्य दुकान असोसिएशन अध्यक्ष हंसराज जाधव, पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष अशोक देडे तसेच गनिमीकावा संघटनेचे अध्यक्ष लक्ष्मीकांत जोगदंड, धर्मेंद्र चौहान, जितेंद्र चौहान, ऋषी पाटील यांनीही यावेळी भाजपचा झेंडा हाती घेतला.

या पक्षप्रवेशामुळे लातूर शहरातील भारतीय जनता पक्षाचे संघटन अधिक बळकट झाले असून आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्र्वभूमीवर भाजपची वाटचाल अधिक मजबूत झाली आहे.

या पक्षप्रवेश सोहळ्याला माजी जिल्हाध्यक्ष शैलेश लाहोटी,देविदास काळे, शैलेश गोजमगुंडे, प्रेरणाताई होनराव, सुधीर धुत्तेकर, सरचिटणीस संजय गिर, रागिणीताई यादव, प्रविण कस्तुरे, निखिल गायकवाड, निवडणूक कार्यालय प्रमुख तुकाराम गोरे यांच्यासह पक्षाचे मंडळ अध्यक्ष, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# फेडरेशन ऑफ वुमन लॉयर्स संघटनेतर्फे चाकूरकरांना श्रध्दांजली

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, २५ डिसेंबर :** महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वुमन लॉयर्स संघटनेतर्फे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा दिवंगत माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली.

लातूर जिल्हा न्यायालयात पार पडलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वुमन लॉयर्स संघटनेच्या अध्यक्षा ॲड. जयश्रीताई पाटील ह्या होत्या.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सर्व उपस्थित महिला विधिज्ञांनी स्व. शिवराज पाटील चाकूरकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र आदरांजली वाहिली. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना ॲड. जयश्रीताई पाटील यांनी स्व. चाकूरकरांच्या जीवन




कार्यावर प्रकाश टाकला. राजकारणातील एक ऋषीतुल्य व्यक्तीमत्व असणारे शिवराज पाटील चाकूरकर एक निष्कलंक चारित्र्याचे महान नेते होते. त्यांचे कार्य कायम आपणा सर्वांना प्रेरणा देणारे आहे. २०१४ मध्ये ते महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वुमन लॉयर्स संघटनेच्या कार्यक्रमासाठी दयानंद सभागृहात आले होते. त्यावेळी त्यांनी महिला विधिज्ञ संघटनेच्या कार्याचे कौतुकही केले होते. त्यांच्याकडून मिळालेली कौतुक व अभिनंदनाची पाठिवरील थाप महिला विधिज्ञांना कायम प्रेरणा देणारी असल्याची भावना जयश्रीताईंनी व्यक्त केली.

या प्रसंगी महिला वकील ॲड. पल्लवी कुलकर्णी, ॲड. प्रतिभा कुलकर्णी, ॲड. अरुणा वाघमारे, ॲड.ड. वसुधा नाळापुरे, ॲड.बिडवे, ॲड. बोरा, ॲड.गायत्री, ॲड.प्राजक्ता, ॲड. रेश्मा, ॲड. कविता, ॲड.कोमल आदींची उपस्थिती होती. या सर्व सदस्यांनी विनम्र अभिवादन करून चाकूरकरांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

# राज्याची प्रगती साधण्याचे काम एकजुटीने करू : कव्हेकर

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, २५ डिसेंबर :** शेखमियाँ साहेब दर्गा हे सर्व धर्मियांचे आदराचे भक्तीचे असे जागरूक श्रध्दास्थान आहे. त्यामुळे आम्ही कोणताही जातीय भेदभाव न करता समाजाची निष्काम, निस्वार्थीपणे सेवा करीत आहोत. भगवत् गीता, कुराण हेच आपल्याला जीवनामध्ये चांगले काम करण्याची सद्बुध्दी देतात. हेच आध्यात्मिक ग्रंथ आपले खरे आदर्श आहेत. त्यामुळे ईश्वरभक्ती आणि अधात्म यांना जीवनाची गुरूकिल्ली समजून गाव, जिल्हा आणि राज्याची प्रगती साधण्याचे काम आपण एकजुटीने करू, असे प्रतिपादन भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.



यावेळी ते कव्हा येथील जामा मस्जिदीच्या वजूखाना व स्वच्छतगृहाच्या भूमिपूजन कार्यक्रमात बोलत होते. यावेळी या कार्यक्रमाला हाजी रज्जाक नाना अत्तरवाले, शेख पाशाभाई, भानुदास घार, सुभाषअप्पा सुलगुडले, गोपाळ वांगे, नेताजी मस्के, रसूलभाई पठाण, रसूल सय्यद, शेखसाब इंजिनियर, तस्लिम सय्यद, सालार पठाण, सादीक पठाण, हामिद सय्यद, नाजम शेख, खाजा सय्यद, लायक पाशा पठाण, आसिफ पठाण, मुन्ना सय्यद, फारूक सय्यद यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना माजी आ.कव्हेकर म्हणाले की, देशातील जनतेने कर्तबगार, व्हिजनरी पंतप्रधान मा.ना.नरेंद्र मोदी यांना तिसर्यांदा पंतप्रधान बनवले. हिंदू ही एक जात नसून तो एक विचार आहे.

या विचारातून त्रिलोकाचे कल्याण करण्याचे काम केले जाते. अशा विचारातून गेल्या ११ वर्षांच्या कार्यकाळात हिंदू बांधवांना जो न्याय दिला तोच न्याय मुस्लीम समाज व समाजातील इतर लोकांना देण्याचे काम मोदीजींनी केलेले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना, ज्येष्ठ नागरिकांना पेंशन व ८० टक्के लोकांना मोफत धान्य देऊन सर्वांना समान न्याय देण्याचे काम केलेले आहे. कश्मिरमध्ये ३७० कलम हटवून कश्मिरच्या विकासाला गती देण्याचे काम केलेले आहे, असे मतही माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख मान्यवरांचा ग्रामस्थांच्यावतीने सत्कार करण्यात आला. तसेच कव्हा गावच्या विकासासाठी जामा मस्जिदीच्या वजूखाना व स्वच्छतगृहाच्या भूमिपूजन माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर व इतर मान्यवरांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी या कार्यक्रमाला कव्हा व परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# पंतप्रधान वाजपेयींनी नवभारताची मुहूर्तमेढ रोवली : प्रा. डॉ. डोंगरगे

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, २५ डिसेंबर :** भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी त्यांच्या संपूर्ण जीवनामध्ये सामाजिक, राजकीय आणि आर्थिक धोरणांनी देशाचा विकास घडवून आणला त्यामुळे खऱ्या अर्थाने आधुनिक नवभारताची मूर्तमेढ त्यांनी रोवली असे प्रतिपादन विज्ञान शाखा समन्वयक तथा भौतिकशास्त्र विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. सिद्राम डोंगरगे यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेला प्रभारी प्राचार्य प्रोफेसर डॉ. आनंद शेवाळे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात अटलबिहारी वाजपेयी यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रोफेसर डॉ. आनंद शेवाळे, प्रोफेसर डॉ. संजय गवई, डॉ.



अरविंद पाटील, डॉ. मनोहर चपळे, डॉ. अविनाश हेडावू आणि डॉ. बसवेश्वर बेंद्रे यांची उपस्थिती होती.

यावेळी डॉ. बसवेश्वर बेंद्रे आणि डॉ. अविनाश हेडाऊ यांनीही अटल बिहारी वाजपेयी यांच्या तंत्रज्ञानाच्या योगदानावर भाष्य केले. अध्यक्षीय प्रोफेसर डॉ. आनंद शेवाळे यांनी केला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राम पाटील, योगीराज माकणे आणि अजय गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# दैठणा परिसरात विजेचा लपंडाव

## कमी दाबामुळे बागायत शेती संकटात

**त.भा. वृत्तसेवा,**
**शिरूर अनंतपाळ, २५ डिसेंबर :** २५ डिसेंबर २०२५ दैठणा व साकोळ मध्यम प्रकल्प परिसरात सध्या वीजपुरवठ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून सततचा लाईटचा लपंडाव आणि कमी दाबाने होणारा वीजपुरवठा यामुळे बागायतदार शेतकरी अडचणीत सापडले आहेत. सरकारने शेतकऱ्यांना रात्रीऐवजी दिवसा वीज देण्याचा घेतलेला निर्णय कौतुकास्पद असला तरी प्रत्यक्षात मिळणारी वीज गुणवत्तापूर्ण नसल्याने त्याचा अपेक्षित फायदा शेतकऱ्यांना होत नसल्याची तक्रार आहे.

यंदा पावसाचे प्रमाण समाधानकारक असल्याने साकोळ मध्यम प्रकल्प १०० टक्के क्षमतेने त्याच्या पाण्याने भरला आहे. मात्र सोयाबीनला समाधानकारक भाव न मिळाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी ऊस पिकाकडे मोर्चा वळवला. ऊस हे पाण्यावर अवलंबून असलेले पीक असल्याने नियमित व



स्थिर वीजपुरवठा अत्यंत गरजेचा असतो. परंतु सध्या कमी दाबामुळे वायर जळणे, किटकॅट खराब होणे, स्टार्टर न उचलणे तसेच ट्रान्सफॉर्मरमध्ये वारंवार बिघाड होणे अशा समस्यांना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत आहे.

या कडाक्याच्या थंडीतही ऊस पिकाला वेळेवर पाणी मिळत नसल्याने अनेक शेतांतील ऊस वाळण्याच्या मार्गावर आहे. वीज मंडळाच्या कर्मचाऱ्यांकडे तक्रार केल्यानंतर चाकुरहून फॉल्ट आहे, एक-दोन तासांत लाईट येईल अशी उत्तरे दिली जातात. काही वेळा लाईट सोलरवर आहे, ढगाळ वातावरणामुळे व्होल्टेज कमी आहे असे सांगून शेतकऱ्यांचे समाधान केले जाते. मात्र या उत्तरांमुळे शेतकऱ्यांचे प्रत्यक्ष प्रश्न सुटत नसल्याची भावना व्यक्त होत आहे.

लाखो रुपये खर्च करून शेती करायची आणि शेवटी वीजपुरवठ्याच्या समस्येमुळे नुकसान पदरी पडायचे, हे कुणाला सांगायचे, असा सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत. त्यामुळे दैठणा व साकोळ मध्यम प्रकल्प परिसरातील शेतकरी वर्गातून स्थानिक प्रशासन व सक्रिय राजकीय नेतृत्वाने या गंभीर समस्येकडे डोळेझाक न करता तातडीने लक्ष द्यावे, अशी जोरदार मागणी होत आहे.

## औशाच्या नूतन नगराध्यक्षांचा आज पदग्रहण सोहळा



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि. २५ डिसेंबर :** औसा नगरपरिषदेच्या निवडणुकीत १३६१ मतांनी विजय मिळवल्यानंतर अवघ्या पाच दिवसात पदग्रहण सोहळ्याचे आयोजन राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने करण्यात आले असून शुक्रवार दि. २६ रोजी ४ वा. नूतन नगराध्यक्षा परवीन शेख पदग्रहण करणार आहेत.

या निवडणुकीत नगराध्यक्ष पदाची लढत तर जिंकलीच पण २३ पैकी १७ जागा जिंकून राष्ट्रवादी काँग्रेसने एकहाती विजय मिळवला. या विजयानंतर अवघ्या पाच दिवसात पदग्रहण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यास शुक्रवार दि. २६ रोजी ४ वा उपस्थित राहवे, असे आवाहन राष्ट्रवादी काग्रेच्या वतीने करण्यात आले आहे,

# शासकीय कामकाजात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर भ्रष्टाचार रोखण्यासाठी उपयुक्त : पोलीस अधीक्षक

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, २५ डिसेंबर :** शासकीय कामकाजात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर हा भ्रष्टाचार रोखण्यासाठी उपयुक्त ठरत आहे. शासकीय कामकाजात पारदर्शकता आणण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यास अधिकारी, कर्मचारी यांनी प्राधान्य द्यावे, असे जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी सांगितले. सुशासन सप्ताह अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश पवार, सामान्य प्रशासनच्या उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, संगीता टकले, जिल्हा



पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. नागरिकांना जलद आणि पारदर्शक सेवा पुरविणे, हे आपले कर्तव्य आहे. शासकीय सेवेत काम करताना प्रत्येकाने लोकसेवक या भावनेतूनच काम करण्याची गरज आहे. नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवेच्या बदल्यात त्यांच्याकडून मोबदला स्वीकारणे हा लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा आहे. हा मोबदला आर्थिक, वस्तूच्या अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा असला तरी तो कायद्याने गुन्हा ठरतो, असे जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. तांबे म्हणाले. भ्रष्टाचार निर्मुलनासाठी शासकीय कामकाजात पारदर्शकता आणणे, त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे, शासकीय यंत्रणेत सुधारणा करणे, यासाठी सर्वच अधिकारी, कर्मचारी यांनी पुढाकार घ्यायला हवा, असे त्यांनी सांगितले.

सर्वसामान्य नागरिकांना सुलभ आणि गतिमान सेवा पुरविण्याचा संकल्प प्रत्येक अधिकारी,

**सुशासन सप्ताहानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात व्याख्यान**

कर्मचारी यांनी सुशासन सप्ताहाच्या निमित्ताने करावा. प्रत्येक कार्यालयाच्या कामकाजात पारदर्शकता आणण्यासाठी सर्व अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये जाणीवजागृती निर्माण करण्यासाठी कार्यालय प्रमुखांनी पुढाकार घ्यावा, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे म्हणाल्या.

प्रारंभी उपजिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर यांनी प्रास्ताविकामध्ये सुशासन सप्ताह आयोजनाचा हेतू विशद केला. निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांनी आभार मानले.

## निवडणुकीत नमुना मतपत्रिका छपाईवर निर्बंध

**लातूर :** राज्य निवडणूक आयोगाने १५ डिसेंबर २०२५ रोजी लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम घोषित केला आहे. त्याच दिवशीपासून या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. ही निवडणूक संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्यासाठी या निवडणूक काळात नमुना मतपत्रिका छपाईबाबत निर्बंध घालतले आहेत.

## यशवंतराव चव्हाण शाळेत साने गुरुजी यांची जयंती



**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, २५ डिसेंबर :** लातूर येथील यशवंतराव चव्हाण प्राथमिक शाळेत राष्ट्र सेवा दल लातूर शाखेच्या वतीने पूज्यनीय साने गुरुजी यांची १२६ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी राष्ट्र सेवा दलाचे लातूर जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पांडुरंग देडे यांनी साने गुरुजी यांच्या जीवन कार्यावर मार्गदर्शन केले. शिक्षक बालाजी गंथडे यांनी खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे' हे साने गुरुजींनी लिहिलेले गीत मुलांसमवेत गायीले. यावेळी मुख्याध्यापिका पुष्पा जाधव, सहशिक्षक संगीता भालेकर, बालाजी गंथडे आदीसह विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयात सुशासन दिन उत्साहात



**त.भा. वृत्तसेवा,**
**उदगीर, २५ डिसेंबर :** छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयात भारताचे माजी लोकप्रिय पंतप्रधान अटलबिहारी बाजपेयी यांचा जन्म दिवस सुशासन दिन म्हणून साजरा करण्यात आला.यावेळी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. आर. एम. मांजरे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. त्यांनी अटलबिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी त्यांनी वाजपेयी यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकताना म्हटले की त्यांचा जन्म ग्वाल्हेर संस्थानात एका शिक्षकाच्या पोटी झाला. प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्यांनी आपले जीवन घडवले. उच्च शिक्षण घेऊन कायद्याचा अभ्यास करून सुरुवातीला पत्रकारिता केली.अकरा वेळा खासदार, दोन वेळा राज्यसभा सदस्य म्हणून ते निवडून आले. ते भारताचे दहावे पंतप्रधान होते.त्यांनी आपल्या कार्यकाळात उत्तम प्रशासन सांभाळले.भारताचा नावलौकिक आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण केला. ते उत्तम वक्ते, संसदपटू राजनीतिज्ञ, लेखक, कवी आणि विचारवंत म्हणून प्रसिद्ध होते. प्रास्ताविक जयंती समितीचे प्रमुख तथा मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ. सुरेश शिंदे यांनी केले, आभार प्रदर्शन डी.बी.मुळे यांनी मानले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहूणे डॉ.रामकृष्ण बदने, डॉ. ए.सी.आकडे, डॉ. व्ही. के. भालेराव, डॉ. एस. एम.ढगे, डॉ. विजयकुमार जाधव तसेच प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नगराध्यक्षा सौ. स्वाती हुडे यांचा माऊली ग्रुपच्या वतीने सत्कार



**त.भा. वृत्तसेवा,**
**उदगीर, २५ डिसेंबर :** उदगीर नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ.स्वातीताई सचिन हुडे यांचा माऊली ग्रुप उदगीरच्यावतीने सत्कार करण्यात आला. नुकत्याच पार पडलेल्या नगरपरिषद निवडणूकीत अध्यक्षपदाच्या उमेदवार सौ.स्वातीताई सचिन हुडे या १०१४३ मताधिक्याने विजयी झाल्या.

नगराध्यक्षपदी बहुमताने विजयी झाल्याबद्दल माऊली ग्रुप उदगीरच्यावतीने निवासस्थानी भेट देऊन सौ.स्वातीताई हुडे व सचिन हुडे यांचा सपत्निक सत्कार करण्यात आला.

यावेळी माऊली ग्रुपचे अध्यक्ष चंद्रकांत डोईजोडे, मार्गदर्शक विलास बोके, उपाध्यक्ष मनोहर पांचाळ, सचिव मनोज शिवनखेडे, कुमार चौधरी, राम मोतीपवळे, शिवलिंग मठपती, संजय दुनगे, शिवशंकर जीवने,शिवाजी चिल्ले, सुनील पाटील, भरत कोयले, विजय कळसे, संतोष काळेकर, शिवशंकर मठपती, ॲड. कपिल बिराजदार, ॲड. विजय दिक्षीत, डॉ.विजय कवठाळे, मन्मथ मुळे, विजय सज्जनशेट्टे, शिवाजी बिरादार, सौ. सरस्वती पांचाळ, सौ. सविता बोके, सौ. रत्नमाला मठपती, सौ.कमल दुणगे, सौ. सुनिता चिल्ले, सौ. शितल शिवनखेडे, सौ. मिराबाई डोईजोडे, सौ.भाग्यश्री बिराजदार, सौ.गोदावरी जीवने, सौ. छाया मुळे सौ. संतोषी कळसे, सौ. विरमा चौधरी, सौ.संगीता मठपती, सौ.सुमित्रा कोयले, सौ. सुवर्णा सज्जनशेट्टी, सौ. मधुताई पाटील, सौ. सोनाली काळेकर, कल्पना बिरादार, सौ.किर्तीताई दिक्षीत इत्यादी माऊली ग्रुपचे सदस्य उपस्थित होते.

# दिव्यांग विद्यार्थ्यांचे विज्ञान प्रदर्शनात देदिप्यमान यश

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, २५ डिसेंबर :** स्वामी विवेकानंद विद्यालय, लातूर येथील विद्यार्थी चि.आगलावे अनिरुद्ध महारुद्र याने तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन २०२५-२६ मध्ये उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या लौकिकात मानाचा तुरा रोवला आहे. अनिरुद्धने सादर केलेल्या पासवर्ड प्रोटेक्टेड डोअर लॉक सिस्टिम या अभिनव विज्ञान प्रयोगाने माध्यमिक विभाग दिव्यांग गटातून तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला असून, त्याची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली आहे. या प्रयोगातून आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सुरक्षिततेचा प्रश्न सोडवण्याचा प्रभावी प्रयत्न करण्यात आला असून समाजोपयोगी दृष्टिकोन आणि नवकल्पना यांचा सुंदर संगम या प्रकल्पात दिसून येतो. या अभिनव प्रयोगाचे परीक्षकांकडून विशेष कौतुक करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या या यशामध्ये त्याचे पालक तसेच शाळेचे प्राचार्य मारुती सूर्यवंशी, प्राचार्य गोविंद शिंदे, उपमुख्याध्यापक प्रभाकर सावंत, गणेश कदम, बाळाराम पिचारे, अलका अंकुशे, विज्ञान शिक्षक भगवंत कलेढेले आणि




अफसर शेख यांचे मोलाचे योगदान व मार्गदर्शन लाभले आहे.

शाळेतील अटल टिंकरिंग लॅबच्या माध्यमातून विद्यार्थी सातत्याने नवनवीन प्रयोग करीत असून, अटल लॅब इन्चार्ज ज्योतिराम तवर यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प साकार झाला आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करून त्यांची कौशल्ये विकसित करण्यासाठी अटल लॅबचा सकारात्मक व प्रभावी उपयोग केला जात असल्याचे या यशातून स्पष्ट होते.

# अंबुलगा जि.प. प्रशालेत बाल आनंद मेळाव्यास प्रतिसाद




**त.भा. वृत्तसेवा,**
**निलंगा, २५ डिसेंबर :** तालुक्यातील अंबुलगा (बु) येथील जिल्हा परिषद प्रशाला येथे आयोजित बाल आनंद मेळावा, खरी कमाई, गणित प्रदर्शन उपक्रमास विद्यार्थी, पालक, गावातील नागरिकांचा व तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

दि. २२ डिसेंबर रोजी गणित प्रदर्शन, दि. २४ डिसेंबर २०२५ रोजी बाल आनंद मेळावा, खरी कमाई उपक्रम घेऊन जिल्हा परिषद प्रशाला अंबुलगा बु ता निलंगा येथे मोठ्या उत्साहाने गणित दिवस साजरा करण्यात आला.

गणित प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांनी तयार केलेले गणितातील साहित्य, मॉडेल पाहण्यासाठी विद्यार्थ्यांना उपलब्ध केले होते. गणिती साहित्याची प्रत्यक्ष हाताळणी करून विद्यार्थ्यांनी आनंद साजरा केला. तसेच दि. २४ डिसेंबर २०२५ रोजी बाल आनंद मेळावा, खरी कमाई हा उपक्रम घेण्यात आला यामधे विद्यार्थ्यांनी घरी बनवून आणलेले अनेक खाद्य पदार्थ विक्री साठी ठेवण्यात आले होते.

प्रशाला अंबुलगा बु येथे विविध शैक्षणिक उपक्रम राबवत असल्याबद्दल पंचायत समिती निलंगा चे गटविकास अधिकारी सतिश पाटील, गटशिक्षणाधिकारी संतोष स्वामी, केंद्रप्रमुख तेलंग यांनी कौतुक केले.

अनेक चविष्ट पदार्थ खाण्याची संधी उपलब्ध झाली होती. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष खरेदी विक्री करता आली, यातून व्यवहारात गणिती क्रियांचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या लक्षात आले व प्रत्यक्ष अनुभवले सुध्दा. कार्यक्रमाचे उद्घाटन ग्रामसेवक माने, मुख्याध्यापक शिवशंकर मिरगाळे यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी उपसरपंच जगदीश सगर शालेय व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष यशोदन कांबळे, माजी विद्यार्थी संघाचे उपाध्यक्ष आशिष पाटील, ग्रामपंचायत सदस्य महावीर काकडे, बहुजन शिक्षक महासंघाचे जिल्हाध्यक्ष दिनेश कांबळे, कुलकर्णी, गिरी, पाटील, मुळजे, बालाजी सरतापे, मिरगाळे मॅडम, बिराजदार मॅडम, शानिमे मॅडम व विद्यार्थी उपस्थित होते.

## तुळसाबाई पुंड यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**औसा :** औसा शहरातील महात्मा फुले नगरमधील रहिवासी श्रीमती तुळसाबाई बळीराम पुंड यांचे नुकतेच अल्पशः आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७२ वर्षे होते.



स्व. तुळसाबाई पुंड यांच्या पार्थिवावर मातंग समाजाच्या स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यावेळी माजी नगर सेवकांसह शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, नातू असा परिवार आहे.

# आनंदवाडी येथे महिलांसाठी सर्व रोग निदान शिबिर संपन्न

**त.भा. वृत्तसेवा,**
**शिरूर अनंतपाळ, २५ डिसेंबर :** महाराष्ट्र राज्य पंचायत राज विभागांतर्गत मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियानाच्या माध्यमातून ग्रामपंचायत कार्यालय आनंदवाडी येथे महिला स्नेही पंचायत महिलांसाठी सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

सदरील शिबिराचे उद्घाटन क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आले. उद्घाटन पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी मा. श्रीमती शितलताई खिंडे मॅडम, शिरूर अनंतपाळ तालुक्याचे पोलीस निरीक्षक मा. अनंत भंडे साहेब तसेच मा. डॉ. गोल्हेर डी.एम. (पशुसंवर्धन सहआयुक्त) यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प. धोंडीराम आण्णा कोले हे होते.

कार्यक्रमाचे अतिशय छान अशा प्रकारचे आयोजन आणि प्रास्ताविक सरपंच भागवत वंगे यांनी केले. यावेळी मार्गदर्शन करताना गटविकास अधिकारी शितलताई खिंडे मॅडम यांनी सांगितले की, गावांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी सर्वांचा सहभाग आवश्यक असून महिलांनी पुढाकार घेऊन गावविकासात सक्रिय भूमिका बजावली पाहिजे. नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून आपले गाव समृद्ध कसे होईल याकडे लक्ष द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

पोलीस निरीक्षक अनंत भंडे साहेब यांनी महिलांना कायद्याविषयी माहिती देत कोणत्याही प्रकारचा अन्याय झाल्यास तात्काळ पोलीस प्रशासनाशी संपर्क साधावा किंवा १०२ हेल्पलाईनवर कॉल करण्याचे आवाहन केले. महिलांच्या आरोग्याबाबत वैद्यकीय अधिकारी डॉ. पूजा बिडवे, डॉ. सम्राट सोमवंशी व डॉ. त्रिभुवन यांनी मार्गदर्शन करून तपासणी केली.




तसेच डॉ. गोल्हेर डी.एम. यांनी पशुसंवर्धन विषयक योजना व पशू आरोग्याबाबत सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमादरम्यान मान्यवरांच्या हस्ते महिलांना आयुष्मान भारत कार्डचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सह गटविकास अधिकारी रवींद्र साचने, गट शिक्षणाधिकारी अनिल पागे, पंचायत विस्तार अधिकारी अमोल गायकवाड, कृषी विस्तार अधिकारी प्रभू केंद्रे, उपअभियंता मा. वाहीद देशमुख, तालुका बचत गट व्यवस्थापक सुरेश सुगावे, सातपुते सर, धडे सर, वंगे विद्यालयाचे शिक्षक सुधाकर सूर्यवंशी सर, जिल्हा परिषद शाळा आनंदवाडीचे मुख्याध्यापक शिंदे सर, उपसरपंच व्यंकट कल्ले, ग्रामपंचायत अधिकारी संजय रोडेवाड, अंगणवाडी सेविका अश्रिवनी मरे, बचत गट प्रमुख अनुसया शिरूरे, ग्रामपंचायत सदस्य सारिका शिरूरे, जयश्री खरटमोल, ग्रामपंचायत कर्मचारी रंजित मरे, संगणक परिचालक लक्ष्मण नाटकरे, ग्रामरोजगार सेवक राजीव दिवेकर यांच्यासह मोठ्या संख्येने महिला, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## गुंजोटी शिवारात सोयाबीन व तुरीचे कट्टे लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ डिसेंबर -**

गुंजोटी शिवारातील पदमा इंडस्ट्रिज नावाच्या पत्र्याच्या गोदामातून सोयाबीन व तुरीचे कट्टे चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी उमरगा पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत फिर्यादी विनोद भालचंद्र पतंगे (वय ६१, रा. भाउसारपेट, गुंजोटी ता. उमरगा जि. धाराशिव) यांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.२१ डिसेंबर रोजी दुपारी २.३० ते दि.२२ डिसेंबर रोजी सकाळी ९.३० वाजेच्या दरम्यान अज्ञात व्यक्तीने गोदामात प्रवेश करून ११ कट्टे सोयाबीन व ५ कट्टे तुरीचा माल चोरून नेला.

याशिवाय याच ठिकाणाहून सुभाष जगन्नाथ पतंगे यांचे १९ कट्टे सोयाबीन व चंद्रकांत जगन्नाथ पतंगे यांचे २१ कट्टे सोयाबीन असा एकूण सुमारे ९१ हजार ५०० रुपये किमतीचा शेतमाल चोरीला गेल्याचे नमूद करण्यात आले आहे.

या घटनेप्रकरणी फिर्यादीने दि.२३ डिसेंबर रोजी दिलेल्या प्रथम माहिती अहवालावरून उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# शाकंभरी नवरात्रोत्सवात २ जानेवारीला तुळजापूरमध्ये भव्य ड्रोन शो

### ३०० ड्रोनमधून तुळजाभवानी देवींची आकाशात साकारली जाणार प्रतिकृती

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२५ डिसेंबर -**


श्री तुळजाभवानी शारदीय नवरात्र सांस्कृतिक महोत्सव २०२५ हा २२ ते ३० सप्टेंबर दरम्यान मोठ्या उत्साहात पार पडला होता. या महोत्सवाच्या कालावधीत दि.२९ सप्टेंबर रोजी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित भव्य ड्रोन शोचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, त्या वेळी सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे आणि ढगाळ वातावरणामुळे सुरक्षिततेच्या कारणास्तव हा ड्रोन शो स्थगित करण्यात आला होता.

दरम्यान, दि.२८ डिसेंबर ते ३ जानेवारी या कालावधीत श्री तुळजाभवानी देवींचा शाकंभरी नवरात्रोत्सव साजरा केला जात असून, या नवरात्रोत्सवाचे औचित्य साधत यापूर्वी स्थगित करण्यात आलेला ड्रोन शो आता शुक्रवार, दि.२ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. हा भव्य ड्रोन शो सायंकाळी ६ वाजता श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालयाच्या मैदानावर पार पडणार आहे.

या ड्रोन शोमध्ये तब्बल ३०० ड्रोनच्या सहाय्याने आकाशात श्री तुळजाभवानी मंदिर, श्री तुळजाभवानी देवी, छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासह विविध धार्मिक, सांस्कृतिक व कलात्मक प्रतिकृती साकारण्यात येणार आहेत. यामध्ये श्री तुळजाभवानी देवींची भव्य प्रतिकृती हे मुख्य आकर्षण असणार आहे.

अत्याधुनिक प्रकाशयोजना व तंत्रज्ञानाच्या साहाय्याने साकार होणारा हा ड्रोन शो भाविकांसाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरणार आहे.

विशेष म्हणजे, अशा प्रकारचा भव्य ड्रोन शो धाराशिव जिल्ह्यात प्रथमच आयोजित करण्यात येत असून, त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांमध्ये तसेच भाविकांमध्ये मोठ्या प्रमाणावर उत्सुकता निर्माण झाली आहे. देवीच्या



दर्शनासोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचा अनुभव घेण्याची अनोखी संधी भाविकांना मिळणार आहे.

या भव्य ड्रोन शोचा आनंद घेण्यासाठी धाराशिव जिल्ह्यातील तसेच परिसरातील भाविक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे. शाकंभरी नवरात्रोत्सवाच्या पावन वातावरणात हा ड्रोन शो भक्ती आणि आधुनिकतेचा सुंदर संगम ठरणार आहे.

## ‘पीएम युवा’ लेखन शिष्यवृत्तीसाठी तेरखेड्याचे प्रसाद जाधव यांची निवड

### मराठी भाषेत महाराष्ट्रातून निवड झालेल्या तीन युवकांमध्ये समावेश

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२५ डिसेंबर -**

राष्ट्रीय पुस्तक न्यास (National Book Trust) या केंद्र शासनाच्या स्वायत्त संस्थेमार्फत युवा लेखकांना प्रोत्साहन देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या ‘पीएम युवा’ लेखन शिष्यवृत्ती योजनेसाठी धाराशिव जिल्ह्यातील तेरखेडा गावचे सुपुत्र प्रसाद जाधव यांची निवड करण्यात आली आहे.



विशेष म्हणजे, महाराष्ट्रातून मराठी भाषेतील लेखनासाठी निवड झालेल्या केवळ तीन युवकांमध्ये प्रसाद जाधव यांचा समावेश असून, मराठवाडा विभागातून या प्रतिष्ठित योजनेसाठी निवड होणारे ते पहिलेच तरुण लेखक ठरले आहेत. सध्या पुणे येथे वास्तव्यास असलेले प्रसाद जाधव हे कला व संस्कृती क्षेत्रात कार्यरत असून, ‘कल्चरल कनेक्ट’ या संस्थेच्या माध्यमातून विविध सांस्कृतिक उपक्रम राबवत आहेत. ‘पीएम युवा’ योजनेसाठी त्यांनी भारताच्या कीर्तन परंपरांचा अभ्यास हा विषय निवडला होता. निवड प्रक्रियेतील मुलाखतीनंतर त्यांची अंतिम निवड करण्यात आली.

या योजनेअंतर्गत प्रसाद जाधव यांना सहा महिन्यांच्या कालावधीसाठी दरमहा ५० हजार रुपये शिष्यवृत्ती मिळणार असून, त्यांच्या संशोधनावर आधारित स्वतंत्र पुस्तक राष्ट्रीय पुस्तक न्यासामार्फत प्रकाशित करण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून युवकांना लेखन व संशोधन क्षेत्राशी जोडणाऱ्या या योजनेचे हे तिसरे वर्ष आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरातून प्रसाद जाधव यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# तुळजापूर नगरपरिषद निवडणूकीत काँग्रेसच्या तरुण शिलेदारांची इंट्री

### अनुभवी प्रतिस्पर्ध्यांवर मात करत पाच नगरसेवक प्रथमच सभागृहात...



**तभा वृत्तसेवा / अनिल आगलावे**
**तुळजापूर, दि.२५ डिसेंबर -**

धाराशिव जिल्ह्यात सर्वाधिक चर्चेत राहिलेल्या तुळजापूर नगरपरिषद निवडणुकीत भाजप विरुद्ध काँग्रेस अशी थेट आणि चुरशीची लढत पाहायला मिळाली. महाविकास आघाडीतर्फे काँग्रेस पक्षाने तरुण आणि नव्या चेहऱ्यांना संधी देत केलेला प्रयोग यशस्वी ठरला. काँग्रेसच्या तिकीटावर निवडणूक लढवलेले तरुण शिलेदार अनुभवी प्रतिस्पर्धी उमेदवारांना पराभूत करत प्रथमच नगरसेवकपदी विराजमान झाले.

संपूर्ण राज्याचे लक्ष या निवडणुकीकडे लागले होते.

प्रचाराच्या काळात दावे-प्रतिदावे, आरोप-प्रत्यारोप, स्थानिक विकासाचे प्रश्न, धार्मिक व सांस्कृतिक मुद्दे तसेच राजकीय रणनीती यामुळे निवडणूक वातावरण तापले होते. या सर्व पार्श्वभूमीवर निकाल मात्र अपेक्षेपेक्षा वेगळा आणि एकतर्फी लागला.

तुळजापूर नगरपरिषदेत काँग्रेसचे एकूण पाच उमेदवार निवडून आले असून त्यांनी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला. निवडून आलेल्या नगरसेवकांमध्ये रणजित इंगळे (१२४५ मते), आनंद जगताप (९५६ मते), अमोल कुतवळ (१३३० मते), अक्षय कदम (परमेश्वर) (१३२९ मते) आणि प्रगती लोंढे (११२९ मते) यांचा समावेश आहे. विजयी उमेदवारांनी आपल्या प्रभागात प्रभावी जनसंपर्क, स्थानिक प्रश्नांची जाण आणि तरुणाईचा उत्साह यांच्या जोरावर मतदारांचा विश्वास संपादन केला.

विशेष म्हणजे या निवडणुकीत अनेक प्रभागांत काँग्रेसच्या उमेदवारांसमोर अनुभवी व माजी नगरसेवक उभे होते. मात्र तरीही मतदारांनी बदलाला संधी देत तरुण नेतृत्वावर विश्वास दाखवला. त्यामुळे तुळजापूरच्या राजकारणात नव्या पिढीच्या नेतृत्वाचा उदय झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी नवनिर्वाचित नगरसेवकांचे अभिनंदन करत शहराच्या विकासासाठी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन केले आहे.

तुळजापूर नगरपरिषदेच्या आगामी कारभारात तरुण नगरसेवकांची भूमिका महत्त्वाची ठरणार असून विकासाभिमुख, पारदर्शक आणि लोकाभिमुख निर्णयांची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## शेतातील सोलार पंप चोरीस; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ डिसेंबर -**

पिंपळगाव लिंगी शिवारातील शेत गट क्रमांक ४३५ मधील विहिरीत बसवलेला अल्टेक कंपनीचा ३ एचपी सोलार पंप व केबल, असा २३ हजार रुपयांचा माल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली. याप्रकरणी औदुंबर गोवर्धन तावरे (वय ४९, रा. पिंपळगाव लिंगी) यांच्या फिर्यादीवरून दि. २३ डिसेंबर रोजी वाशी पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## सत्काराला तुळजाभवानीचा आशीर्वाद समजतो : समरजीतसिंह ठाकूर

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२५ डिसेंबर -**

तुळजापूर येथील भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी केलेला सत्कार हा मला तुळजाभवानी देवीच्या आशीर्वादासारखा वाटतो. राजकीय क्षेत्रात चांगले कार्य करण्यासाठी मिळालेल्या पदाचा योग्य उपयोग करू, असे प्रतिपादन परंडा नगर परिषदेचे नवनिर्वाचित नगरसेवक समरजीतसिंह सुजितसिंह ठाकूर यांनी केले.

परंडा नगर परिषदेचे नवनिर्वाचित नगरसेवक समरजीतसिंह ठाकूर यांचा भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी बोधले व ज्येष्ठ नेते बाळासाहेब शामराज यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी तुळजापूर शहराचे माजी सरचिटणीस उमेश गवते, संस्कार भारतीचे प्रदेश सह-महामंत्री डॉ. सतीश महामुनी आदी उपस्थित होते.याप्रसंगी नगरसेवक ठाकूर यांचा शाल, फेटा, तुळजाभवानी देवीची प्रतिमा, पुष्पगुच्छ व पुष्पहार देऊन गौरव करण्यात आला.



परंडा हे भारतीय जनता पार्टीचे माजी आमदार व प्रदेश सरचिटणीस सुजितसिंह ठाकूर यांचे कार्यक्षेत्र असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील काळात परंडा शहराची सेवा करण्याची संधी मला या निवडणुकीच्या माध्यमातून मिळाली आहे. या संधीचा योग्य उपयोग करून नागरिकांच्या अपेक्षांना न्याय देण्याचा प्रयत्न करू, असेही ठाकूर यांनी सांगितले.

## जळकोट ग्रामपंचायतीतील १४ वा व १५ वा वित्त आयोग निधीतील भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करण्याची मागणी

### ॲड. आशिष सोनटक्के यांचे ग्रामविकास मंत्र्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२५ डिसेंबर -**

जळकोट (ता. तुळजापूर) येथील ग्रामपंचायतीमध्ये सन २०२१ ते २०२५ या कालावधीत १४वा व १५वा वित्त आयोग अंतर्गत करण्यात आलेल्या विकासकामांच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप करत, या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित दोषींवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी तुळजापूर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ॲड. आशिष सोनटक्के यांनी राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.




निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, जळकोट ग्रामपंचायतीला सन २०२१ ते २०२५ या कालावधीत १४ वा व १५ वा वित्त आयोगाच्या माध्यमातून अंदाजे एक ते दीड कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे.

हा निधी घनकचरा व्यवस्थापन, शौचालये, बंदिस्त गटारी, कचराकुंड्या, दलित वस्ती सुधारणा, तांडा वस्ती सुधारणा, ग्रामनिधी तसेच रोजगार हमी योजनेअंतर्गत विकासकामांसाठी वापरणे बंधनकारक असताना प्रत्यक्षात गावात कोणतीही ठोस विकासकामे झाल्याचे दिसून येत नाही.

याशिवाय घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत गावात झालेल्या सर्व कामांची सखोल चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी ठाम मागणी ॲड. आशिष सोनटक्के यांनी केली आहे.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी जळकोट ग्रामपंचायतीचे उपसरपंच प्रशांत नवगिरे यांनीही ग्रामपंचायतीत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत चौकशीची मागणी केली होती. त्यानंतर आता ॲड. आशिष सोनटक्के यांनी पुराव्यांसह निवेदन दिल्याने जळकोट ग्रामपंचायतीचा कारभार पुन्हा एकदा चर्चेत आला असून प्रशासन याप्रकरणी काय कारवाई करणार, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

## गोवंशीय जनावरांची बेकायदेशीर वाहतूक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ डिसेंबर -**

नळदुर्ग पोलीस ठाण्याच्या हद्दीत गोवंशीय जनावरांची कत्तलीसाठी बेकायदेशीर वाहतूक करताना पोलिसांनी कारवाई केली आहे. याप्रकरणी धोंडीबा तुकाराम जिड्डीमणी (वय ६१, रा. मादन हिप्परगा, ता. आळंद, जि. कलबुर्गी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि.२३ डिसेंबर रोजी सायं. ४.३० वाजण्याच्या सुमारास काशिनाथ बंडगर यांच्या शेताजवळ पिकअप वाहन (क्र. एमएच ३२ एए ६८४४) मधून गोवंशीय जातीचे तीन बैल व एक खोंड, अशी एकूण सुमारे १ लाख २३ हजार रुपये किमतीची जनावरे चारा व पाण्याची कोणतीही व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीररित्या वाहतूक केली जात असल्याचे नळदुर्ग पोलिसांच्या निदर्शनास आले.

# श्रीक्षेत्र मैलारपुर येथे ४ जानेवारीला भव्य कुस्ती स्पर्धा

### खंडोबा यात्रेनिमित्त आखाडा पूजनाने तयारीस प्रारंभ...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२५ डिसेंबर -**

सालाबादाप्रमाणे याही वर्षी श्रीक्षेत्र मैलारपुर येथे श्री खंडोबा यात्रेनिमित्त दि.४ जानेवारी २०२६ रोजी श्री तीर्थक्षेत्र खंडोबा यात्रा कुस्ती आखाडा समिती, नळदुर्ग यांच्या वतीने भव्य कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर दि. २४ डिसेंबर रोजी श्रीक्षेत्र मैलारपुर येथील भव्य कुस्ती आखाड्याचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करून स्पर्धेच्या तयारीस सुरुवात करण्यात आली.

नळदुर्ग येथील श्रीक्षेत्र मैलारपुर येथे प्रसिद्ध असलेली श्री खंडोबाची यात्रा यावर्षी दि.२, ३ व ४ जानेवारी २०२६ रोजी भरत असून, या यात्रेचे प्रमुख आकर्षण असलेली कुस्ती स्पर्धा शेकडो वर्षांची परंपरा लाभलेली आहे. पूर्वी नळदुर्ग नगरपालिकेच्या वतीने ही कुस्ती स्पर्धा



आयोजित केली जात होती. सन २०१६ पर्यंत ती मर्यादित स्वरूपात होत होती.

मात्र २०१७ साली नळदुर्ग शहरातील सेवानिवृत्त सहाय्यक परिवहन अधिकारी नंदकुमार डुकरे, रणजितसिंह ठाकुर, अनिल पुदाले, बंडु पुदाले, संजय मोरे, कै. सुधाकर चव्हाण, शिवाजी वऱ्हाडे, रमेश जाधव, पद्माकर घोडके, सुहास येडगे व तानाजी जाधव यांनी एकत्र येत या कुस्ती स्पर्धेला भव्य व राज्यस्तरीय स्वरूप देण्याचा संकल्प केला. त्याच वर्षी श्रीक्षेत्र मैलारपुर येथे भव्य कुस्ती आखाड्याची उभारणी करण्यात आली. आज या कुस्ती स्पर्धेला राज्यभरात मोठी ओळख प्राप्त झाली असून, दरवर्षी लाखो रुपयांची बक्षिसे असलेल्या कुस्त्या येथे पार पडतात. आतापर्यंत अनेक वेळा महाराष्ट्र केसरी विजेत्या पैलवानांच्या कुस्त्याही या आखाड्यात झाल्या आहेत. अवघ्या आठ वर्षांत मैलारपुर येथील ही कुस्ती स्पर्धा राज्यभर गाजू लागली आहे. सुरुवातीच्या काळात काँग्रेसचे नेते अशोक जगदाळे यांनीही या स्पर्धेला भव्य स्वरूप देण्यासाठी प्रयत्न केले होते. यावर्षीच्या कुस्ती स्पर्धेसाठी समितीच्या वतीने जय्यत तयारी सुरू असून, दि.२४ डिसेंबर रोजी नळदुर्गचे नूतन नगराध्यक्ष बसवराज धरणे, नवनिर्वाचित नगरसेवक दत्तात्रय दासकर, नय्यर जहागीरदार, पांडुरंग पुदाले, बलदेवसिंग ठाकुर, स्वप्नील काळे, किशोर नळदुर्गकर, भाजप नेते सुशांत भुमकर यांच्यासह इतर मान्यवरांच्या हस्ते आखाड्याचे पूजन व श्रीफळ फोडण्यात आले.

यावेळी भाजपचे माजी शहराध्यक्ष पद्माकर घोडके, धीमाजी घुगे, मारुती घोडके, सचिन डुकरे, संजय मोरे, संभाजी कांबळे, विलास येडगे, भगवंत सुरवसे, उत्तम बनजगोळे, अमर भाळे, आयुब शेख तसेच कुस्ती आखाडा समितीचे अध्यक्ष रणजितसिंह ठाकुर, बंडु पुदाले, अनिल पुदाले, शिवाजी वऱ्हाडे, विशाल डुकरे आदी पदाधिकारी व उपस्थित होते.

## जगदाळे मामा रुग्णालयात मेंदूची किचकट शस्त्रक्रिया यशस्वी

### डॉ. किशोर गोडगे यांचे कौशल्य; रुग्णाची दृष्टी वाचली

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२५ डिसेंबर -**

येथील जाकीर काझी यांच्या मेंदूमध्ये सहा महिन्यांपूर्वी गाठ निर्माण झाल्याने त्यांच्या दृष्टीवर गंभीर परिणाम होत होता. दिवसेंदिवस दृष्टी कमी होत चालल्याने त्यांनी अनेक नेत्रतज्ज्ञांकडे तपासण्या केल्या; मात्र त्यातून ठोस निष्कर्ष निघाला नव्हता. त्यानंतर कुटुंबियांनी मेंदूविकार तज्ज्ञांचा सल्ला घेण्याचा निर्णय घेतला.



बार्शी व सोलापूर येथील डॉक्टरांकडे केलेल्या सखोल तपासण्यांमध्ये मेंदूच्या खालच्या भागात डोळ्यांना रक्तपुरवठा करणाऱ्या दोन नसांपैकी एका नस फुटून रक्त गोठल्याने गाठ तयार झाल्याचे निष्पन्न झाले. ही गाठ शस्त्रक्रियेने काढणे अत्यावश्यक असल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले. सामान्यतः अशा किचकट मेंदू शस्त्रक्रिया पुणे किंवा मुंबईसारख्या मोठ्या शहरांत केल्या जात असल्याने रुग्ण व नातेवाईक चिंतेत होते. मात्र बार्शी येथील जगदाळे मामा धर्मादाय रुग्णालयात प्रसिद्ध मेंदू व पाठीच्या मणक्याचे तज्ज्ञ डॉ. किशोर गोडगे हे अशा अवघड शस्त्रक्रिया यशस्वीपणे करतात, अशी माहिती मिळाल्याने जाकीर काझी यांना त्यांच्याकडे दाखविण्यात आले. डॉ. गोडगे यांनी सर्व वैद्यकीय अहवाल तपासून शस्त्रक्रियेचा निर्णय घेतला व शस्त्रक्रिया १०० टक्के यशस्वी होईल, अशी खात्री दिली. त्यानुसार दि. ८ डिसेंबर रोजी ही शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. या शस्त्रक्रियेसाठी डॉ. कांदे, श्रीकांत सोरेगावकर, हेमंत लांडे, नितीन इंगोले, सुजित कुंभारे, विनोद घोणे, महेश कुलकर्णी, अभिजित क्षीरसागर तसेच इतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

याप्रसंगी डॉ. किशोर गोडगे यांनी सांगितले की, यापूर्वी अशा मेंदूच्या शस्त्रक्रियांसाठी रुग्णांना मोठ्या शहरांत जावे लागून प्रचंड खर्च व मानसिक ताण सहन करावा लागत होता. मात्र आता बार्शीच्या जगदाळे मामा धर्मादाय रुग्णालयात मेंदू, हृदय व हाडांच्या शस्त्रक्रिया महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत मोफत केल्या जात आहेत.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## नळदुर्ग येथे अटल बिहारी वाजपेयी जयंती साजरी

तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.२५ डिसेंबर -

भारताचे माजी पंतप्रधान, भाजपाचे ज्येष्ठ नेते, उत्कृष्ट संसदपटू व सुशासनाचे प्रणेते श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती नळदुर्ग येथील शहर भाजप कार्यालयात उत्साहात साजरी करण्यात आली.

दि.२५ डिसेंबर हा दिवस माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्रासह संपूर्ण देशभरात साजरा करण्यात आला. याच अनुषंगाने नळदुर्ग येथेही भाजप कार्यालयात त्यांच्या



प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भाजपचे भावी शहराध्यक्ष बबन चौधरी यांच्या हस्ते अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमास भाजपचे पदाधिकारी घोडके, संतोष ठाकूर, आयुष चव्हाण, गौरव वैद्य, अबुअलहसन रजवी, प्रमोद जाधव यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### केंद्रीय मंत्री जाधव यांनी सपत्नीक घेतले श्री तुळजाभवानी देवींचे दर्शन

तुळजापूर, दि.२५ डिसेंबर -

केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार) तसेच आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रतापराव जाधव यांनी सपत्नीक श्री तुळजाभवानी देवींचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर संस्थानच्या वतीने तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने यांनी मंत्री प्रतापराव जाधव यांचे स्वागत केले. मंदिर संस्थानच्या वतीने जाधव दांपत्याचा श्री तुळजाभवानी देवींची प्रतिमा व महावस्त्र भेट देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी मंदिर संस्थानचे धार्मिक सहाय्यक व्यवस्थापक अमोल भोसले, सहाय्यक जनसंपर्क अधिकारी उमाकांत क्षीरसागर, सुजय मेश्राम, मंदिरचे भंडारपाल नागेश शितोळे, प्रक्षाळ मंडळाचे अध्यक्ष विशाल रोचकरी, सुरक्षा निरीक्षक ऋषिकेश पाटील, श्रीकांत पवार, ऋषभ रेहपांडे तसेच मंदिर संस्थानचे कर्मचारी उपस्थित होते.



### उमरगा येथे भव्य रक्तदान शिबिर; ५१ रक्तदात्यांचा सहभाग

उमरगा, दि.२५ डिसेंबर -

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथे एनसीसी व एनएसएस विभाग, एचडीएफसी बँक, श्रीकृष्ण रक्तपेढी आणि रोटरी क्लब उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या रक्तदान शिबिरात एकूण ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून एचडीएफसी बँकेचे मॅनेजर आशिष विराजदार, डॉ. धनंजय मेनकुदळे, प्रा.आर.एम. जोशी, विजय केवडकर उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. पद्माकर पिटले, डॉ. भरत शेळके, डॉ. अशोक पदमपल्ले, डॉ. विनोद देवरकर, प्रा. गुंडाबापू मोरे, प्रा. शैलेश महामुनी, बँक व रक्तपेढीचे कर्मचारी, महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका, कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने एनसीसी कॅडेट्स व एनएसएस स्वयंसेवक विद्यार्थी उपस्थित होते.



### परंड्यात विद्यार्थ्यांसाठी रस्ते वाहतूक सुरक्षा मार्गदर्शन

परंडा, दि.२५ डिसेंबर -

विद्यार्थ्यांमध्ये रस्ते वाहतूक नियमांची जाणीव व सुरक्षिततेबाबत जनजागृती व्हावी, या उद्देशाने बावची विद्यालय व वसंतराव शंकरराव काळे कनिष्ठ महाविद्यालय, परंडा येथे मंगळवारी (दि.२४) रस्ते वाहतूक सुरक्षा विषयक मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मोटार वाहन निरीक्षक व सहाय्यक निरीक्षकांनी हेल्मेट व सीटबेल्टचा वापर, वेगमर्यादा पाळणे, वाहन चालवताना मोबाईलचा वापर टाळणे आदी नियमांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रत्यक्ष उदाहरणांद्वारे रस्ते वाहतूक सुरक्षेचे महत्त्व समजावून सांगण्यात आले.



### चेअरमन नागेश स्वामी यांचा सत्कार

इटकळ, दि.२५ डिसेंबर -

तुळजापूर तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी आरबळी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षक नागेश स्वामी यांची निवड झाल्याबद्दल इटकळ ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने त्यांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष दिनेश सलगरे, नामदेव गायकवाड यांच्यासह मित्रपरिवार उपस्थित होता. पतसंस्थेच्या संचालक मंडळाची बैठक रविवार, दि.२१ डिसेंबर रोजी पार पडली. या बैठकीत चेअरमनपदी नागेश स्वामी, व्हा. चेअरमनपदी सुनीता गाढवे तर सचिवपदी प्रशांत गायकवाड यांची निवड करण्यात आली.

### देवकुरुळीत गावठी दारूची अवैध विक्री

धाराशिव, दि.२५ डिसेंबर -

देवकुरुळी येथे गावठी दारूची अवैध विक्री करणाऱ्या व्यक्तीवर पोलिसांनी कारवाई केली असून, १८ लिटर गावठी दारू जप्त करण्यात आली आहे. आरोपी समाधान नवगिरे (रा. देवकुरुळी, ता. तुळजापूर) हा दिवकुरुळी ते काटगाव जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला, ऑटेल सरपंच यांच्या बाजूच्या मोकळ्या जागेत अंदाजे १ हजार ९०० रुपये किमतीची १८ लिटर गावठी दारू अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगत असताना आढळून आला.

# समर्पणाच्या भावनेतूनचं प्रकल्प साकारला गेला : भैय्याजी जोशी

## यमगरवाडी येथे भटके व विमुक्त विकास प्रतिष्ठानतर्फे सन्मान कार्यकर्तृत्वाचा गौरव सोहळा

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२५ डिसेंबर -

भटक्या जमातींना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे सोपे नाही. पिढ्यानपिढ्या वंचित राहिलेल्या समाजघटकांना एकत्र करून, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करत समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य यमगरवाडी येथील प्रकल्पात केले जात आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारी सदस्य भैय्याजी जोशी यांनी केले.





तुळजापूर तालुक्यातील यमगरवाडी येथील एकलव्य विद्या संकुलात भटके व विमुक्त विकास प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित सन्मान कार्यकर्तृत्व पुरस्कार वितरण सोहळा गुरुवारी उत्साहात पार पडला. याप्रसंगी भैय्याजी जोशी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवगिरी प्रांताचे संघचालक अनिल भालेराव,भटके विमुक्त विकास अध्यक्ष उद्धव काळे व्यासपीठावर उपस्थित होते.

बोलताना भैय्याजी जोशी म्हणाले की, यमगरवाडी प्रकल्पासाठी केलेले कार्य हे केवळ नियोजनावर आधारित नसून, त्याग, अपार निष्ठा, त्याग आणि सेवाभाव आहे, सामाजिक क्षेत्रात कार्य करताना केवळ गणित मांडून चालत नाही. अनेकदा अव्यवहारी, स्वतःचा विचार न करता समाजासाठी झटणारे लोकच खरे परिवर्तन घडवतात.

भटके व विमुक्त समाजाला समाजजीवनाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक सर्वांगीण विकासासाठी मागील ३२ वर्षांपासून भटके व विमुक्त विकास प्रतिष्ठान अविरतपणे कार्यरत आहे.

यमगरवाडी सेवा संकुल हा या चळवळीचा पाया असून, या प्रकल्पाच्या संकल्पनेपासून ते त्याला अखिल भारतीय स्वरूप प्राप्त करून देण्यापर्यंत अनेक कार्यकर्त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत पत्थर पायातील भावनेने, निष्ठेने व चिकाटीने कार्य केले आहे. या समर्पित कार्याची दखल घेत सम जपरिवर्तनाच्या या प्रवासात मोलाचे योगदान देणाऱ्या कार्यकर्त्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

या सर्व मान्यवरांनी भटके व विमुक्त समाजासाठी शिक्षण, आरोग्य, स्वयंरोजगार, संस्कार व सामाजिक सन्मान मिळवून देण्यासाठी दीर्घकाळ निःस्वार्थपणे योगदान दिले आहे. त्यांच्या कार्यामुळे अनेक कुटुंबांचे जीवनमान उंचावले असून समाजात आत्मसन्मानाची भावना निर्माण झाली आहे.

याप्रसंगी जिल्हा संघचालक ॲड. रवींद्र कदम, कार्यवाह अजय जानराव, तालुका संघचालक अनिल जाधव, भटके विमुक्त विकास अध्यक्ष उद्धव काळे, कोषाध्यक्ष नरेश पोटे, सचिव विवेक आयाचित, संघटन मंत्री राहुल चव्हाण, अभय कुलकर्णी, अशोक संकलेच्या, राजाभाऊ गिजरे, रवी नन्नावरे, मुख्याध्यापक विठ्ठल म्हेत्रे, आण्णासाहेब कोल्हटकर आदींसह विविध सामाजिक संस्था, कार्यकर्ते, सेवाभावी संघटनांचे प्रतिनिधी, ग्रामस्थ तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सन्मान कार्यकर्तृत्वाचा गौरव...

वैजनाथअप्पा लातूरे, पद्मश्री भिकुजी रामजी (दादा) इदाते, पद्मश्री गिरीशजी प्रभुणे, महादेवराव (आबा) गायकवाड, डॉ. अभय शहापूरकर, रावसाहेब कुलकर्णी, महादेवराव सरडे, डॉ. राघवेंद्र डंबळ, कमलाकरराव पाटील, चंद्रकांतराव गडेकर, आनंद काळे, अरुणराव दाते, रघुवीर ओक (काका), सुशिल ओक (काकू), सुरेशभाऊ पवार-पाटील, कुसुमताई पवार-पाटील, सचिन चाटुफळे, तेजाताई कुलकर्णी.

## वनमाला शिंदेंची दणदणीत विजय; आ. तानाजीराव सावंत यांची सदिच्छा भेट



तभा वृत्तसेवा
परंडा, दि.२५ डिसेंबर -

माजी मंत्री व आ. तानाजीराव सावंत यांच्या नेतृत्वाखाली नुकतीच परंडा नगरपरिषदेची निवडणूक पार पडली. या निवडणुकीत पॅनल प्रमुख जाकीर सौदागर यांनी नगरपरिषदेत नगराध्यक्षपद पुन्हा एकदा काबीज केले.

या निवडणुकीत प्रभाग क्रमांक १० मधून अनुसूचित जाती प्रवर्गातून वनमाला रामा शिंदे या दणदणीत मतांनी विजयी झाल्या आहेत. त्या आ. सावंत यांचे कट्टर निष्ठावंत कार्यकर्ते व माजी नगरसेवक रत्नाकांत शिंदे यांच्या मातोश्री आहेत.

विजयानंतर वनमाला शिंदे व रत्नाकांत शिंदे यांनी नुकतीच पुणे येथे माजी मंत्री तथा आ.प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी शिंदे कुटुंबियांच्या वतीने आ. सावंत यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी हरी डिकोळे, मारुती बर्वे, छाया शिंदे, अभिजित शिंदे आदी उपस्थित होते.

## येरमाळा येथे ट्रॅक्टर ट्रॉली चोरी

धाराशिव, दि.२५ डिसेंबर -

येरमाळा पोलीस ठाणे हद्दीत अज्ञात चोरट्यांनी ट्रॅक्टरची ट्रॉली चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे.

फिर्यादी आनंद दत्तात्रय येवले (वय २५, रा. बावी, ता. वाशी) यांची अंदाजे ६० हजार रुपये किमतीची, पाच टन क्षमतेची लाल रंगाची ट्रॅक्टर ट्रॉली (क्रमांक एआय-बीएसआय-१६४४) ही दि.२२ डिसेंबर रोजी बसस्थानकाच्या बाजूला असलेल्या विठू माऊली गॅरेज दुकानासमोर उभी करण्यात आली होती. दरम्यान, अज्ञात दोन व्यक्तींनी सदर ट्रॉली चोरून नेल्याचे निदर्शनास आले. याबाबत फिर्यादी आनंद येवले यांनी दिलेल्या तक्रारीवरून येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## गर्दीच्या काळात सशुल्क व्हीआयपी दर्शन बंद करा

### भाविकांना सुलभ दर्शन देण्याची मागणी...

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.२५ डिसेंबर -

गर्दीच्या काळात मंदिरामध्ये सुरू असलेली सशुल्क व्हीआयपी दर्शन पद्धत बंद करून सामान्य भाविकांना अभिषेक हॉल मार्गे सुलभ दर्शन देण्यात यावे, अशी मागणी देवीभक्त श्रीनाथ शिंदे यांनी केली आहे. यासंदर्भात तहसीलदार तथा मंदिर व्यवस्थापक माया माने यांना धार्मिक सहाय्यक व्यवस्थापक अमोल भोसले यांच्या हस्ते निवेदन सादर करण्यात आले.

सध्या शाकंभरी नवरात्र महोत्सव तसेच नाताळाच्या सुट्ट्या सुरू असल्याने तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे. मात्र मंदिरामध्ये सशुल्क व्हीआयपीदर्शनाची व्यवस्था मोठ्या प्रमाणावर राबविण्यात येत असल्यामुळे सामान्य भाविकांना तासनतास रांगेत उभे राहावे लागत आहे. याचा सर्वाधिक त्रास वृद्ध, महिला, लहान मुले तसेच दूरवरून येणाऱ्या भाविकांना सहन करावा लागत आहे.

आई तुळजाभवानी देवी सर्व भक्तांसाठी समान असून दर्शनामध्ये कोणताही भेदभाव न करता सर्वसामान्य भाविकांना समान व सुलभ दर्शन मिळावे, हीच भाविकांची भावना असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सशुल्क व्हीआयपी दर्शनामुळे सामान्य नागरिकांवर अन्याय होत असल्याची भावना निर्माण होत असून त्यामुळे भक्तांमध्ये असंतोष वाढत आहे.

मंदिर संस्थानने सशुल्क व्हीआयपी दर्शन पद्धत पूर्णतः बंद करावी अथवा ती मर्यादित ठेवून सामान्य भाविकांना योग्य वेळेत व सुलभ पद्धतीने दर्शन मिळेल, अशी व्यवस्था करावी.

यामुळे भाविकांमध्ये समाधान निर्माण होऊन मंदिर व्यवस्थापनाबाबत आदर वाढेल, असा सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.



### बडकर तलाव प्रवेशद्वारासमोर भाविकांच्या चपलांचा ढीग

शाकंभरी नवरात्र महोत्सव व नाताळ सुट्ट्यांमुळे तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे. गर्दीवर नियंत्रण व भाविकांच्या सुलभ दर्शनासाठी मंदिर संस्थानने मुख्य महाद्वाराऐवजी बिडकर तलाव मार्गे मंदिरात प्रवेश देण्याची व्यवस्था केली आहे. मात्र या प्रवेशद्वाराजवळ चप्पल स्टॅन्डची कोणतीही सोय न केल्यामुळे प्रवेशद्वारासमोर भाविकांच्या चपलांचा मोठा ढीग साचत चालला आहे. या अव्यवस्थेमुळे बिडकर तलाव मार्गे असलेले प्रवेशद्वार उकिरड्याचे स्वरूप धारण करत असून भाविकांना चपलांमधून वाट काढत दर्शनासाठी जावे लागत आहे.

## जवाहर विद्यालयात 'कला उत्सव' संपन्न

तभा वृत्तसेवा
अणदूर, दि.२५ डिसेंबर -

जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अणदूर येथे मंगळवार (दि. २४ डिसेंबर) रोजी 'कला उत्सव' मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे सचिव रामचंद्र आलुरे, कल्याणी मुळे, ग्रामपंचायत सदस्य बालाजी घुगे, रविंद्र घोडके तसेच मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी यांच्या हस्ते रंगमंच पूजन करण्यात आले.



प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी आयोजित स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध कलागुणांनी उपस्थितांची मने जिंकली.

भावगीत, भक्तीगीत, राष्ट्रगीत, सामाजिक समस्यांवर आधारित नाटिका, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेवर आधारित नाटिका, विविध सम जातील लोकगीते, मुकाभिनय, 'ऑपरेशन शिंदूर' थीम, 'वॉटर थीम', भरतनाट्यम्, शिवगीते, कोळी नृत्य, बंजारा गीत, लावणी, समूह नृत्य, वैयक्तिक गीते तसेच 'वा-यावरती गंध पसरला' यांसारख्या सादरीकरणांनी कला उत्सव बहारदार व डोळ्यांचे पारणे फेडणारा ठरला.

या कार्यक्रमास गावातील सचिन हराळकर, आप्पासाहेब शेटे, माजी सरपंच धनराज मुळे, अविनाश मोकाशे, अण्णा महाराज घोडके, सत्तेश्वर पाटील, लिंबाजी सुरवसे, मारुती सारणे, गुरुनाथ कबाडे, राम हाडगे, सिद्धलिंग स्वामी, श्रीशैल आलुरे, सातप्पा व्हलदुरे, माजी विद्यार्थी, युवक मित्र, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष व सर्व सदस्य, तसेच पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रभावी निवेदन रोहित मोरे यांनी केले.

## दहिटणा येथे शस्त्रबंदी आदेशाचे उल्लंघन; सत्तूरसह तरुण ताब्यात

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२५ डिसेंबर -

नळदुर्ग पोलीस ठाणे हद्दीतील दहिटणा येथे शस्त्रबंदी आदेशाचे उल्लंघन करत विनापरवाना धारदार शस्त्र बाळगणाऱ्या तरुणावर नळदुर्ग पोलिसांनी कारवाई केली आहे. याप्रकरणी शस्त्र कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, आरोपी पांडुरंग अंबादास कांबळे (वय ३०, रा. दहिटणा, ता. तुळजापूर) याने दि.२४ डिसेंबर रोजी सकाळी सुमारे १०.५० वाजता दहिटणा परिसरात मा. जिल्हाधिकारी तथा दंडाधिकारी, धाराशिव यांनी जारी केलेल्या शस्त्रबंदी आदेशाचे उल्लंघन केले. लोकांच्या जीवितास धोका निर्माण होईल, असे एक सत्तूर (धारदार शस्त्र) विनापरवाना व बेकायदेशीररित्या स्वतः जवळ बाळगत असताना नळदुर्ग पोलिसांच्या पथकाने त्याला ताब्यात घेतले.

पोलिसांनी आरोपीकडील नमूद सत्तूर जप्त केला आहे. याप्रकरणी फिर्यादी नवनाथ चाबुकस्वार यांनी दिलेल्या खबरेवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.


### मिळकत खरेदीपुर्व जाहिर नोटीस

आमचे अशिल १. श्री. कालीदास बाबा ठवरे, वय ४२ वर्षे, धंदा शेती आणि २. श्री. संभाजी बाबा ठवरे, वय-३५ वर्षे, धंदा शेती, दोघे रा. कौडगांव, ता. परंडा, जि. धाराशिव यांनी मिळकत खरेदीपुर्व जाहिर नोटीस देण्यास सांगितलेवरुन तमाम लोकांना विशेषतः कौडगांव, ता. परंडा जि. धाराशिव व परीसरातील लोकांना या जाहिर नोटीसीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे:-

मौजे कौडगांव, ता. परंडा, जि. धाराशिव येथील जमीन भुमापन कं. व उपविभाग गट नं. ६४/२/अ या गटाचे पोटखराब सहित एकुण क्षेत्र ०३ हे ५५ आर, आकार ०४ रु. ७५ पैसे पैकी क्षेत्र ०० हे ९७ आर, आकार ०१ रु. ४६ पैसे ही शेतजमीन ज्याची चतुःसिमा पुर्वेस- कुशाबाई संतोष माने यांची याच गटातील जमीन, पश्चिमेस फुलचंद मुरलीधर माने यांची याच गटातील जमीन, दक्षिणेस कोळेकर यांची जमीन आणि उत्तरेस-माधव निवृत्ती ठवरे यांची जमीन येणेप्रमाणे चतुःसिमेच्या आतील विहीर बागायत शेतजमीन मिळकत तदंगभूत वस्तुसह व सर्व हक्कासह, १० शुभम संतोष माने, वय-१७ वर्षे, धंदा- शिक्षण, अज्ञान पालन कर्ती सख्खी आजी संगीता श्रावण माने रा. कौडगांव, ता. परंडा, जि. धाराशिव आणि २. दिया संतोष माने, वय-१५ वर्षे, धंदा-शिक्षण, अज्ञान पालन कर्ती सख्खी आजी संगीता श्रावण माने रा. कौडगांव, ता. परंडा, जि. धाराशिव यांचे संयुक्त मालकी व कब्जेवहिवाटीची असून सदरील मिळकत ही विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना विकण्याचे निश्चित केले आहे. सदरील मिळकतीच्या विद्यमान मालकांनी सदरील मिळकत निर्वेध व निजोखमीची असल्याचा व सदरील मिळकत आमचे अशिलांना विकण्याचा हक्क व अधिकार विद्यमान मालकांना असल्याचा निर्वाळा त्यांनी आमचे अशिलांना दिला आहे. त्याप्रमाणे आमचे अशिलांबरोबर सदर विद्यमान दोन्ही मालक अज्ञान असल्याने त्यांचेवतीने अपाक म्हणून त्यांचे पालन पोषण करणारी त्यांची सख्खी आजी सौ. संगीता श्रावण माने या स्वतः रजिस्टर्ड ताबा ईसारपावती व मे. कोर्टाची परवानगी घेतल्यानंतर खरेदीचा व्यवहार पुर्ण करणार आहेत.

सबब, या जाहीर नोटीसीने तमाम लोकांना कळविण्यात येते की, सदरील मिळकतीवर कोणाचा खरेदी, विकी, तारण, गहाण, लीज, लीन, दान, पोटगी, कोर्ट डिकी, जप्ती, बक्षीस, वहिवाट, ईसारपावती अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १० दिवसांचे आत आवश्यक त्या सर्व कागदोपत्री पुराव्यासहीत आमचे वरील पत्त्यावर आमच्याशी संपर्क साधून त्याबाबत खात्री पटवून द्यावी. अन्यथा, सदरील मिळकतीवर वरील नमूद विद्यमान मालकाव्यतिरीक्त इतर कोणाचाही कसलाही हक्क वा हितसंबंध नाही, अथवा असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा पुढील व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाची कसलीही तकार याबाबत चालणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.
यासाठी ही जाहीर नोटीस दिली.

स्थळ : परंडा
दिनांक २५/१२/२०२५

अशिलांतर्फे,
Adv. Santosh S. Suryawanshi
ॲड. एस.एस. सुर्यवंशी, परंडा
Enroll No. MH/२४४१/२००६
District Session Court
Paranda Dist Dharashiv. मो.नं. ९९२१८५००००

जाहिर नोटीस देणार...
श्री. कालीदास बाबा ठवरे
श्री. संभाजी बाबा ठवरे


## फायनान्स कर्मचाऱ्यावर हंटरने हल्ला करून २.८० लाखांची लूट

### तीन अटकेत, दोन आरोपी फरार...

तभा वृत्तसेवा
मुरूम, दि.२५ डिसेंबर -

मुरूम पोलिस ठाणे हद्दीतील मुरूमजवळ माडके जाणाऱ्या रस्त्यावर एका दाळमिलजवळ फायनान्स कंपनीच्या कर्मचाऱ्याला भररस्त्यावर अडवून हंटरने बेदम मारहाण करत रोख रक्कम व मुद्देमाल लुटल्याच्या घटनेचा छडा मुरूम पोलिसांनी लावला आहे. या प्रकरणी पोलिसांनी तीन जणांना बुधवारी (दि. २४) सायंकाळी अटक केली असून गुरुवारी त्यांना उमरगा न्यायालयात हजर केले असता २९ तारखेपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. मात्र प्रत्यक्ष लूटमार करणारे मुख्य दोन आरोपी अद्याप फरार असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत.



याबाबत सविस्तर माहिती अशी की, मुरूम येथील भारत फायनान्स कंपनीच्या शाखेतील कर्मचारी रोहित जयवंत देडे (वय २५, रा. पानवाडी) हे १७ डिसेंबर रोजी महिला बचत गटांना दिलेल्या कर्जाच्या हप्त्यांची वसुली करून रात्री साडेनऊच्या सुमारास दुचाकीवरून येणेगुरकडे जात होते. कारखान्याजवळील दाळमिल परिसरात पाठीमागून आलेल्या दुचाकीवरील दोन अज्ञात आरोपींनी त्यांची गाडी अडवली. त्यानंतर आरोपींनी रोहित देडे यांच्यावर हंटरने बेदम मारहाण करून गंभीर जखमी केले व त्यांच्याकडील बॅग हिसकावून पसार झाले. याप्रकरणी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली असता या लूटमारीच्या कटात प्रत्यक्ष लूट करणाऱ्या दोन आरोपींसह आणखी तीन जणांचा सहभाग असल्याचे उघड झाले. विशेष म्हणजे या कटात भारत फायनान्स कंपनीतील एका कर्मचाऱ्याचाही सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. या कर्मचाऱ्यासह अन्य दोघांना बुधवारी (दि.२४) सायंकाळी पोलिसांनी ताब्यात घेऊन त्यांच्याकडून निम्मा मुद्देमाल जप्त केला आहे.

मात्र मारहाण करून लूट करणारे मुख्य दोन आरोपी अद्याप फरार असून त्यांच्याकडे उर्वरित मुद्देमाल असल्याचे पोलिसांनी सांगितले.